# माणूस

शनिवार । २१ फेब्रुवारी १९८१ । एक रुपया

## हिंदी-मराठी साहित्यातील आधुनिकता

—एक शोध

पृष्ठ....१५

## आर्य चाणक्याचा भव्य जीवनपट उलगडणारी कादंबरी की एक सुंदर ललित ग्रंथ ?

पृष्ठ...१९

दोष त्याचा नाही.
तसाच तिचाही नाही.
त्यांना पडद्यावरच पाहणाऱ्या आमचाही नाही.
नि तुमचाही असू शकत नाही.
दोष एकूणच समाजव्यवस्थेचा आहे.
त्या समाजानं अंगिकारलेल्या जीवनपद्धतीचा आहे.
—क्रॅमर विरुद्ध क्रॅमर

पृष्ठ....२१

पुणे वार्ता

# चलो विद्यापीठ !

शनिवार ता. १४ फेब्रुवारी. पुण्यातल्या फर्ग्युसन कॉलेजचं आवार. सकाळी साडे-दहा पावणेअकराचा सुमार असेल. कॉलेजात शिरलं की लगेच डाव्या हाताला सुमारे दीड दोनशे विद्यार्थ्यांचा जमाव एका मोठ्या झाडाच्या सावलीत बसला होता. झाडाखाली एक टेबल व काही खुर्च्या. पुणे विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. राम ताकवले विद्यापीठ यंत्र-णेतील अडी–अडचणी व कार्यपद्धती समजा-वून देत होते. मागच्या बाजूला खुर्च्यांवर पुणे विद्यापीठाच्या परीक्षाविभागाचे नियंत्रक वसंतराव जगदाळे, विद्यापीठातील कॉम्प्यूटर पद्धती हाताळणारे श्री. काळे, फर्ग्युसन कॉले-जचे प्राचार्य बाळ गाडगीळ आणि प्रा. पुण-ताबेकर बसले होते.

पुणे विद्यापीठ विद्यार्थी संघटना, स्टुडंटस् फेडरेशन ऑफ इंडिया व प्रगतिशील विद्यार्थी संघटना याच्या वतीने आज एक मोर्चा काढ-ण्यात आला होता. त्याचंच या ठिकाणी सभेमध्ये रूपांतर झालं होतं. या विद्यार्थ्यांच्या चार प्रमुख मागण्या होत्या.

१) विद्यापीठाच्या परीक्षापद्धतीतील भयंकर गोंधळ तावडतोब थांबला पाहिजे.

२) चुकीचे निकाल, उशीरा निकाल, सरसकट नापास, एकाच दिवशी तीन परीक्षा इत्यादी प्रकारांवर कडक उपाययोजना केली पाहिजे.

३) विद्यापीठातील गैरकारभार व भ्रष्टा-चार याचा त्वरित बंदोबस्त झाला पाहिजे.

४) विद्यापीठ कारभाराची सर्वांगीण चौकशी करण्यासाठी चौकशी समिती नेम-लीच पाहिजे.

कुलगुरुंनी या चारही मागण्यांबाबत विद्या-पीठाची भूमिका, सद्यःस्थिती आणि आगामी उपाययोजना यांचं सविस्तर विवेचन केलं. पुढील शैक्षणिक वर्षापासून यापैकी बहुतेक मागण्यांची अंमलबजावणी सुरू होईल, असं आश्वासनही दिलं. मोर्चा यशस्वी ! आंदोलन स्थगित !!

अशाच प्रकारचा एक कार्यक्रम अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या वतीने सोम-वार ता. १६ फेब्रुवारी रोजी आखण्यात आला विद्यापीठीय शिक्षणातील सध्याच्या त्रुटींसंबंधी चर्चा करण्यासाठी पुण्यातल्या शिवाजी मंदिरात अभाविपतर्फे एक ‘ मागणी परिषद ’ ही आयोजित करण्यात आली. या संदर्भात प्रसिद्ध करण्यात आलेल्या मागणी-पत्रात अभाविपने पुढील चौदा मागण्या नोंदवल्या आहेत.

१) विद्यापीठ सत्रपरीक्षा पद्धतीच्या अंमलबजावणीतील असंख्य उणीवा दूर करा.

२) सत्र क्र. १ व २ च्या परीक्षा महा-विद्यालयाकडून घेतल्या जात असूनही विद्या-पीठाची परीक्षा–फी मात्र रद्द झालेली नाही. परीक्षा–फी त्वरित रद्द करा.

३) प्रत्येक शैक्षणिक वर्षाच्या आरंभी शैक्षणिक वेळापत्रक जाहीर करा. त्याची काटे-कोर अंमलबजावणी करा व परीक्षा संपल्या-पासून एक महिन्याच्या आत निकाल जाहीर करा.

४) परीक्षा-निकालातील अक्षम्य दिरंगाई-गोंधळ व राखीव निकालाचे अतिशयोक्त प्रमाण यावर आळा घाला. गोंधळास कारणी-भूत असलेल्या व्यक्तीस त्वरित कडक शासन करा.

५) विद्यापीठ अभ्यासक्रमांचे तज्ज्ञांकडून सातत्याने मूल्यमापन करा. आधुनिकता व अद्ययावत ज्ञानाचा त्यामध्ये समावेश करा.

६) विद्यापीठाचे प्रशासकीय विकेंद्रीकरण करून जिल्हास्थानी उपकेंद्रे सुरू करा.

७) कॅपिटेशन फी रद्द करा.

८) विद्यापीठातील भ्रष्टाचारी व्यक्तीस शासन करा. भ्रष्टाचाराच्या केसेस असलेल्या व्यक्तींना विद्यापीठ कारभारापासून परावृत्त करून विद्यापीठ यंत्रणेवर विश्वास निर्माण करा.

९) स्टुडंटस् वेलफेअर विनियोगाची माहिती द्या.

१०) विद्यार्थी मंडळ निवडणुकांवर नियं-त्रण बसवा. राजकीय हस्तक्षेप त्वरित थांबवा.

११) विद्यार्थी मंडळाद्वारे मिळणारा विद्यार्थी सहभाग व्यापक व परिणामकारक करा.

१२) योग्य त्या पूर्वतयारीसह व्यवसाया-भिमुख कोर्सेसचा पदवी–अभ्यासक्रमात समा-वेश करा.

१३) शुगर टेक्नॉलॉजी व लेदर टेक्नॉ-लॉजीचे कोर्सेस सुरू करा. बी. फार्म, डी. फार्म व्यवस्थितरित्या सुरू करा.

१४) अभियांत्रिकी शिक्षणात पदविका-धारकासाठी अर्धवेळ कोर्सेस सुरू करा.

या चौदा मागण्यांव्यतिरिक्त परिषदेने राज्यशासनाकडेही तीन मागण्या केलेल्या आहेत.


**साप्ताहिक माणूस**

**वर्ष : विसावे**

**अंक : अडतिसावा**

**२१ फेब्रुवारी १९८१**

**किंमत : एक रुपया**

संपादक
**श्री. ग. माजगावकर**

सहाय्यक
**दिलीप माजगावकर**
**सौ. निर्मला पुरंदरे**

वार्षिक वर्गणी :
**चाळीस रुपये**



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन अंकात व्यक्त झालेल्या मताशी चालक सहमत असतीलच असे नाही.



राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे, येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव, पुणे ३०. दूरध्वनी : ४४३४५९

१) आर्थिक मागास फी सवलतीसाठी रु. १०,०००/– ही उत्पन्नमर्यादा करा.

२) एस. एस. सी. बोर्डाच्या कार्यालयाचे विकेंद्रीकरण करा.

३) ज्युनिअर कॉलेजसाठी विद्यापीठ धर्तीवर स्पोर्टस व अवातर स्पर्धांसाठी स्वतंत्र मंडळ स्थापन करा.

आता या १७ मागण्याचा समग्र विचार केल्यास असं लक्षात येईल की, यापैकी मागण्या क्र १, ३, ४, ५, ८ आणि ११ या सहा मागण्या विद्यापीठातर्फे त्वरित 'तत्वत. मान्य' म्हणून स्वीकारल्या जातील; मागणी क्र. २, ६, ७ व ९ याचाही सहानुभूतीने विचार करून कृती केली जाईल, असं आश्वासन दिलं जाईल; मागणी क्र. १२, १३ व १४ विद्यापीठाच्या ॲकॅडॅमिक कौन्सिलकडे विचारार्थ पाठविण्याचे आश्वासन दिले जाईल. राहता राहिली मागणी क्र. १०. ती पूर्ण करण्यासाठी विद्यार्थी संघटनानीच विद्यापीठाला सहकार्य केले पाहिजे, असं काही तरी सांगून विद्यापीठ ती पुन्हा विद्यार्थ्यांच्याच गळ्यात अडकवील. एकूण काय ९५ टक्के मागण्या मान्य ! परिषद शंभर टक्के यशस्वी ! !

या दोन्ही विद्यार्थी संघटनाच्या मागण्यामध्ये चुकीच काही नाही. गेली दोन-तीन वर्षं हीच यादी चालू असली तरी या त्रुटी अजून दूर झाल्या नसल्याने मागण्या तरी *कशा बदलणार*, असा रास्त सवाल कोणीही करेल. मुद्दा तो नाही मुद्दा आहे तो असा की, या मागण्यांची 'त्वरित व कडक' अंमलबजावणी होण्यासाठी या विद्यार्थीसंघटना काय करणार ? तर एखादी परिषद, चर्चासत्र, मागणीपत्र, एखादा मोर्चा इत्यादी इत्यादी. पुन्हा त्यात गंमत अशी की विद्यापीठ यंत्रणेला अडचणीच्या वाटतील अशा मागण्या फार करायच्याच नाहीत. बहुतेक मागण्या 'तत्त्वत मान्य 'च्याच सदरात मोडतील अशा. म्हणजे एका 'यशस्वी आंदोलना'चं श्रेय पदरात घेऊन पुढल्या पावसाळ्यापर्यंत स्वस्थ बसायला हरकत नाही. जुलैमध्ये पुन्हा फी-वाढविरोधी मोर्चा आहेच अभाविपने एवढी लांबलचक यादी सादर केली आहे; पण त्यापैकी एका तरी मागणीसाठी आपलं सर्व बळ पणाला लावण्याची यांची तयारी आहे का ? विद्यापीठ *कार्यकारिणीचे* सदस्य शरद जोशी यांच्याविरुद्धच्या भ्रष्टाचाराच्या आरोपाची न्यायालयीन चौकशी चालू असताना, त्यानी विद्यापीठाच्या कामकाजात भाग घेऊ नये, या मागणीसाठी मागे एकदा अभाविपने २५–३० जणांचा मोर्चा काढला होता. भ्रष्टाचारविरोधी जोरदार घोषणा चालू होत्या. शरद जोशी सर्वांच्या समोरून निर्लज्जपणे हसत *निघून गेले; पण त्यांनाच* घेराओ घालावा असं काही कुणाला वाटलं नाही. पुन्हा लोकशाही मार्ग, स्वातंत्र्याची बूज असल्या संकल्पनांचे बुडबुडे हाताशी आहेतच. प्रश्न मागणी कोणती करावी, यापेक्षाही त्या मागणीसाठी काय किंमत मोजण्याची तयारी आहे याचा आहे. दुर्दैवाने तशी संघटना (अपवाद पतित पावन) आज तरी पुण्यात दिसत नाही.

पुण्यातल्या सर्वच विद्यार्थी संघटना आज दुबळ्या झालेल्या आहेत, हे लक्षात घेता विद्यार्थ्यांच्या मागण्यासाठी सर्व संघटनानी एकत्रितपणाने लढणं केव्हाही अधिक उपयुक्त; पण वैयक्तिक स्वार्थ आणि हेवेदावे यापायी तेही घडू शकत नाही. १४ तारखेला मोर्चा काढणाऱ्या विद्यार्थी संघटना तथाकथित डाव्या विचारसरणीच्या. त्यामुळे 'प्रतिगामी' अभाविपबरोबर लढण्याची त्याची इच्छा नाही. शिवाय दोघानाही आपापल बळ (खरे म्हणजे दुबळेपण) जोखायची भारी हौस. त्यामुळे एक दिवस या संघटना 'कॉलेज बंद' चं आवाहन करणार, दुसऱ्या दिवशी अभाविप करणार. विद्यार्थ्यांच्या व्यापक हितासाठी कटिबद्ध असणाऱ्या या प्रमुख संघटनाचा कारभार असा चालला आहे.

पुणे विद्यापीठाच्या कारभाराबद्दल तर फार काही बोलायलाच नको. प्रा. देवदत्त दाभोळकर हे कुलगुरू असताना सत्रपद्धतीचा हत्ती *या विद्यापीठाने स्वत च्या छातीवर* चढवून घेतला आणि तो हत्ती पेलता यावा म्हणून आता बळ कमवायला लागले आहेत. शक्य त्या ठिकाणी हत्तीचीच काटछाट करण्याचाही प्रयत्न चालू आहे. त्यातल्या त्यात सध्या एकच समाधानाची बाब म्हणजे विद्यापीठाचे सध्याचे कुलगुरू डॉ. राम ताकवले प्रा. दाभोलकरासारखे स्थितप्रज्ञ नाहीत. विद्यापीठाचा कारभार सुधारावा, सध्याची डागाळलेली प्रतिमा पुन्हा स्वच्छ व्हावी ही त्याची तळमळ आहे, त्यासाठी धडपडही आहे, पण एकूण प्रवासच निबिड अरण्यातून आहे. आपण तरी त्याना सदिच्छा व्यक्त करण्यापलीकडे तूर्त काय करू शकतो ?

—प्रतिनिधी

# अलिप्तांची परिषद

## आवाहनामागे बळ हवे

वा. दो. रानडे

अलिप्त देशाची संघटना जागतिक राजकारणात प्रभावी शक्ती म्हणून पुढे येण्याच्या दृष्टीने दिल्लीला काही प्रगती झाली काय ? दिल्लीतील अलिप्त देशाच्या परराष्ट्रमंत्र्याच्या परिषदेचे यश या कसोटीवर मोजायला हवे. परिषदेच्या अखेरीस सर्वसमत संयुक्त निवेदन मंजूर झाले; पण अलीकडच्या परिषदाचे एक तंत्रच ठरून गेले आहे. मतभेदाचे मुद्दे बाजूला ठेवून किंवा त्याना सौम्य स्वरूप देऊन असे निवेदन तयार करण्यात येते. परिषदेतील बहुसंख्य राष्ट्राचा कल त्यावरून समजतो हे खरे; पण त्याचबरोबर सर्वांना बरोबर घेऊन परिषद महत्त्वाच्या प्रश्नावर कोठपर्यंत जायला तयार आहे याच्या मर्यादाही कळून येतात.

अफगाणिस्तान, काम्पुचिया, इराकइराण युद्ध, *अरब-इस्राएल संघर्ष आणि* हिंदी महासागरातील बड्या राष्ट्राची लष्करी स्पर्धा हे मुख्य विषय परिषदेपुढे होते. अफगाणिस्तानातील रशियन लष्करी हस्तक्षेपास एक वर्षाहून अधिक काळ लोटला. तो देश अलिप्त न राहता बड्या राष्ट्राचे संघर्षक्षेत्र बनला. त्याची अलिप्तता पुन्हा प्रस्थापित करणे हाच हा प्रश्न सोडविण्याचा खरा मार्ग; पण एक वर्षात अलिप्त राष्ट्रे याबाबत काहीही करू शकली नाहीत. भारताने आपले दूत पाठवून अनेक देशाशी बोलणी केली; पण प्रश्न सुटण्याचे दृष्टीने प्रगती झाली नाही अलिप्त देशाच्या चळवळीचे हे मोठे अपयश आहे. अफगाणिस्तानातील रशियन लष्करी हस्तक्षेपाचा, तसेच कामपूचियातील व्हिएटनाम फौजाच्या हस्तक्षेपाचा स्पष्ट नाव घेऊन निषेध संयुक्त निवेदनात केलेला नाही. तसेच हिंदी महासागरासंबंधी परिच्छेदा दिएगो गार्शियाचा

उल्लेख वगळण्यात आला आहे. अमेरिका तेथे मोठा लष्करी तळ उभारीत आहे, तेव्हा त्याचा उल्लेख आवश्यक होता अकोल्याच्या साहित्य संमेलनात सरकारचा निषेध न करता पारितोषिकाच्या प्रश्नावर मिळमिळीत ठराव पास झाला तशीच मिळमिळीत भूमिका सर्वांचे समाधान करण्याच्या प्रयत्नात अलिप्त देशाच्या परिषदेने घेतली आहे. अफगाणिस्तानातून परकीय फौजा काढून घ्याव्यात आणि त्या देशाचे भवितव्य तेथील जनतेला कोणत्याही बाह्य हस्तक्षेपाशिवाय ठरवू द्यावे, असे आवाहन निवेदनात केले आहे. या आवाहनात नवे काय आहे ? भारताने ही भूमिका पूर्वीच माडलेली आहे; पण अलिप्त राष्ट्रपरिषदेचे मत म्हणून बडी राष्ट्रे त्याची काही दखल घेणार आहेत काय ? अफगाणिस्तानातील कार्माल सरकार फोडण्यासाठी पाश्चात्य राष्ट्रानी चालविलेला हस्तक्षेप प्रथम थाबवा, आम्ही फौजा काढून घेतो, असे आश्वासन रशियाचे नेते ब्रेझनेव्ह यांनी पूर्वीच दिले आहे; पण असा जर-तारी आश्वासनांना काही अर्थ नाही. रशियाने फौजा काढून घेणे, अफगाण बंडखोरांना मदतीच्या हालचाली अमेरिका, पाकिस्तान, चीन यांनी थाबविणे, कार्माल याच्या सरकारने खुल्या निवडणुका घोषित करणे, अफगाणिस्तानची अलिप्तता कायम राहील, त्याच्या अंतर्गत कारभारात कोणताही हस्तक्षेप केला जाणार नाही, अशी हमी रशिया व अमेरिकेने देणे या साऱ्या गोष्टी या प्रश्नावरील तोडग्याचा भाग म्हणून एकाच वेळी अंमलात आल्या पाहिजेत. बड्या राष्ट्रांचे आतापर्यंतचे धोरण लक्षात घेता त्याच्याकडून या योजनेस अनुकूल प्रतिसाद मिळेल असे दिसत नाही. एकमेकाना दोष देत अफगाणिस्तानात त्यांचा हस्तक्षेप चालूच राहील. त्यांना ही योजना मान्य करायला लावण्याइतके बळ अलिप्त देशांच्या संघटनेत नाही. अमेरिका किंवा रशिया यांपैकी कोणाच्याही गटात सामील न होता अलिप्त राहण्याचे अलिप्त राष्ट्राचे धोरण मूलतः बरोबर आहे, पण या धोरणाचा प्रभाव पडायला हवा असेल तर त्यामागे एकजुटीचे बळ उभे केले पाहिजे. अलिप्त राष्ट्रानी आपले प्रश्न आपल्याच सामर्थ्यावर सोडविण्याच्या दिशेने पावले टाकायला हवीत. यापैकी बरीचशी राष्ट्रे आज अमेरिकेच्या किंवा रशियाच्या मदतीवर अवलंबून आहेत. त्यामुळे बड्या राष्ट्राविरुद्ध कणखर भूमिका घेण्याचे धैर्य ही राष्ट्रे दाखवीत नाहीत व त्याचा प्रभाव पडत नाही.

दुसरा प्रश्न काम्पूचियाचा. काम्पूचियातील पॉलपोट राजवट जुलमी व सैतानी असेल; पण तेथील बंडखोरांच्या मदतीस व्हिएटनामने आपल्या फौजा पाठवून आपल्याला अनुकूल सरकार तेथे स्थापणे समर्थनीय ठरत नाही. या प्रकरणी व्हिएटनामच्या स्पष्ट निषेधाची भूमिका भारताने घेतली नाही. उलट तेथील नव्या राजवटीला मान्यता दिली. बंडखोराचा प्रतिकार ओसरून नवी राजवट बरीचशी स्थिर झालेली आहे, ही वस्तुस्थिती लक्षात घेऊनच भारताने हा निर्णय घेतला असे भारताच्या धोरणाचे समर्थन केले जाते; पण नव्या राजवटीला मान्यता दिल्यानंतर मग तेथील परकीय फौजा काढून घ्याव्यात,या मागणीमागे नैतिक बळ रहात नाही.

तिसरा प्रश्न इराक–इराण युद्धाचा. हे युद्ध थाबविण्यासाठी क्यूबा, भारत, झाबिया व पॅलेस्टाइन मुक्ति संघटना यानी प्रयत्न करावेत, असा निर्णय परिषदेने घेतला हे वाचून पहिला प्रश्न मनात येतो तो हा की, यात भारताचे नाव पहिले का नाही ? क्रमाच्या मानपानासाठी भारताने आडून राहावे असे येथे सूचित करायचेच नाही; पण अलिप्त राष्ट्रामध्ये भारताचे स्थान क्यूबापेक्षा दुय्यम आहे काय, असे मनात आल्याशिवाय रहात नाही. क्यूबा वास्तविक अलिप्त राष्ट्रच नव्हे. रशियाच्या गटातला तो देश आहे, पण अलिप्त राष्ट्रानी त्याला अलिप्त म्हणून मान्यता दिली एवढेच नव्हे, तर अलिप्त राष्ट्राची एक परिषदही हॅवाना येथे झाली होती. अलिप्त राष्ट्राची संघटना आता खऱ्या अर्थाने अलिप्त राहिलेली नाही. त्यातली राष्ट्रे कोणत्या तरी बड्या राष्ट्राच्या बाजूला झुकलेली आहेत. अलिप्ताचा प्रभाव पडत नाही त्याचे तेही एक कारण असले पाहिजे.

हिंदी महासागरातून बड्या राष्ट्रांनी आपले लष्करी तळ काढून घ्यावे, हा परिषदेच्या निवेदनातील उल्लेखही आवाहनस्वरूपाचाच आहे. वास्तविक हा प्रश्न गेली अनेक वर्षे चर्चिला जात आहे. संयुक्त राष्ट्रसंघटनेने त्यासाठी एक समिती नेमली होती; पण तिच्या शिफारशी बड्या राष्ट्रांनी मान्य केल्या नाहीत. यूनोचा दुबळेपणाच या बाबतीत दिसून आला. हिंदी महासागरक्षेत्रात आपला प्रभाव वाढविण्यासाठी अमेरिका व रशियाची स्पर्धा चालू आहे. ही स्पर्धा कमी करण्यासाठी उपाय योजावेत असे काही वर्षांपूर्वी ब्रेझनेव्ह आणि कार्टर याच्या वाटाघाटीतही ठरले होते; पण प्रत्यक्षात त्या दिशेने पावले टाकली गेली नाहीत. उलट अफगाणिस्तानातील रशियन हस्तक्षेपानंतर या टापूत अमेरिकेच्या लष्करी हालचाली अधिक वाढल्या आहेत. दिएगो–गार्शिया बेटावरील तळ अमेरिकेने वाढविला आहे. इराणच्या आखाताचे भागात अल्पसूचनेने आपल्या फौजा, आरमार, हवाईदल आणता यावे या दृष्टीने अमेरिकेने आपली यंत्रणा सज्ज केलेली आहे. आपल्याला अनुकूल असलेल्या आफ्रिकन राष्ट्रातून रशियाही तळ व सवलती मिळवत आहे. हिंदी महासागर विभाग हे शांतताक्षेत्र ठेवण्यात यावे, तेथील सर्व परकीय लष्करी तळ काढून घेण्यात यावे, ही अलिप्त राष्ट्राची मागणी योग्य असली तरी बड्या राष्ट्रावर दडपण आणून ती मान्य करून घेण्याइतके बळ त्यांच्याजवळ आज नाही त्यामुळे अलिप्त राष्ट्राच्या नुसत्या आवाहनानी प्रत्यक्ष परिस्थितीत फारसा फरक पडण्याची शक्यता दिसत नाही.

अलिप्त राष्ट्रांनी संघटितपणे आपले सामर्थ्य वाढविण्याच्या योजनांवरच अधिक भर द्यावयास हवा. आपसातले प्रश्न आपसातच सोडवावयाचे, बड्यांचा हस्तक्षेप त्यात होऊ द्यावयाचा नाही, आपला आर्थिक व औद्योगिक विकास एकमेकांच्या सहकार्याने घडवून आणावयाचा असा कार्यक्रम त्यांनी आखायला हवा. बड्या राष्ट्राच्या मदतीवर त्याना जोपर्यंत अवलंबून रहावे लागत आहे तोपर्यंत त्याची अलिप्तता दुबळीच राहणार ! अलिप्त राष्ट्र चळवळीने या दिशेने यापुढे पावले टाकायला हवीत. बड्या राष्ट्रावरील अवलंबित्व जेवढे कमी होईल त्या प्रमाणात अलिप्ततेच्या चळवळीला अधिक बळ येईल.

□

मुक्ताफळे

# गुरुवारचे ‘बाया’गीत

दर रविवारी सायंकाळी आमचा मुक्काम पेशवे पार्कात असतो. घरी बसून हिंदी सिनेमा टी. व्ही. वर पहाण्यापेक्षा पेशवे पार्कातील वाघ-सिंहाच्या, माकडाच्या पिंजऱ्या-समोर वेळ अधिक चांगला जातो. रविवार आहे म्हणून कुणाकडे जाणेही नको वाटते. ओळखीचे अनेकजण म्हणतात–‘ आमच्याकडे या ना–एखाद्या रविवारी !’ पण रविवारी कुणाकडे गेलो तर काय होते ? सर्वजण टी. व्ही. पुढे बसलेले असतात. आपण कुणाकडे गेलो तर असा संवाद होतो–

‘अरे वा वा. या या...सुले, जरा सरकून घे ना. काकाना बसू दे–!’

काका बसतात

‘समझमे नही आता जिंदगी क्या होती है. अगर जिंदगीमे तुम हो....’

‘वश्या, आता ते मस्त गाणं आहे का रे ? प्यार किया तो खाना क्या–’

‘चल–अे. ते गाणं यात आहे का ? ते ‘प्रेम का तराजू ’त आहे.’

गाणं सुरू–‘ प्यार किया तो गलती नही की...गलती हुअी तो रोना क्या–’

‘आम्ही तुमची मागच्या रविवारी वाट पहात होतो. म्हटलं, तुम्ही याल. ही म्हणाली सुद्धा काका खूप दिवसात आले नाहीत—’

टी. व्ही. वर आर्त सूर. नायिकेच्या बापाचे शोचनीय निधन. खोलीत भीषण शांतता !

‘माझं काम असं नव्हतं. सहज आलो होतो.’

‘बसा हो–’

‘राखी काय क्यूट दिसतेय...’ सुली.

शेवटी उठावं लागतच. तेव्हा रविवारी कुणाकडे जाता येत नाही. म्हणून आम्ही पेशवे पार्कात जातो. तिथले पशुपालक परदेशी म्हणून आहेत. त्यांची आमची यामुळेच ओळख. तिथं गेलो की आम्ही त्यांना गाठतो. ते आपल्या पशूंच्या सवयी, आजार, त्यांची भांडणं, हेवेदावे, मारामाऱ्या याच्या गमतीदार हकीगती सांगतात. आज ते घरीच येणार होते आणि आम्ही त्यांचीच वाट पहात होतो.

पण असं नेहमीच होतं. आपण कुणाची तरी वाट पाहत असतो आणि भलतच कुणी येतं. वैशंपायन तसेच आले. ते आले की नेहमी गर्जत येतात. जिना चढतानाच त्यांनी दरडावून आवाज काढला–

‘काय हो ? काय चाललंय ? लेखन–बिखन–?’

‘छे. हो ! लेखन काय करणार ?’

‘का ? *विषय संपले ? मी देतो तुम्हाला विषय*–’

‘या ना, या–’

वैशंपायन पलंगावर मांडी ठोकून बसले–

‘मुद्दाम आलो. म्हटलं तुम्हाला सांगावं. तुम्ही लिहाल यावर. दर गुरुवारी तुम्ही ‘बायागीत’ पहाता ?’

‘बायागीत !’

म्हणजे ‘छायागीत’. सारख्या बाया नाचतात ना त्यात? आम्ही त्याला बायागीत म्हणतो. नव्या पिढीवर त्याचा किती अनिष्ट परिणाम होतो आहे–कल्पना आहे तुम्हाला?’

‘नाही बुवा, म्हणजे मी टी. व्ही. वर फक्त क्रिकेटच्या मॅचेस पहातो.’

‘गुरुवार हा दत्ताचा वार. होते कुणाला त्या दैवताची त्या दिवशी आठवण ? गुरु-वारची आठवण आता अेकच–बायागीत ! काय असतो हा कार्यक्रम ! कोणताही बायल्या पुरुष कोणत्याही बाईशी अशोभनीय –असभ्य चाळे करीत असतो. लहान लहान मुले, आया–बहिणी, सगळे या गोष्टी मिटक्या मारीत पहातात. आज बलात्कार वाढत आहेत याचं कारण काय आहे असं वाटतं तुम्हाला ?’

‘सगळंच वाढतंय. किंमती वाढतायत. माणसं वाढतायत. बलात्कार वाढणारच–’

‘तसं नाही आहे. ही गुरुवारची बायागीतं पाहून–लोकांच्या वासना चाळवतात. त्यातून बलात्कार घडतात.’

‘असेल बुवा–म्हणजे माझा त्या विषयावर बोलण्याचा तसा अधिकार नाही.’

‘बंद करा ही बायागीते ! या चाळ्यांचे विद्यार्थ्यांवर अनिष्ट परिमाण होत आहेत..

‘अहो वैशंपायन पण ही गाणी हिंदी सिनेमातली असतात ना ? लोक हिंदी सिनेमा तर पहाणारच !’

‘थिएटरात जाऊन पाहू द्या. तीन तासात दहा मिनिटे किंवा पधरा मिनिट अशोभनीय असभ्य चाळे पाहिले तर हरकत नाही; पण सर्व सिनेमातले असभ्य चाळे अगदी अर्क काढल्यासारखे पाउण तासात घर बसल्या दाखवण्याचा हा उद्योग कशाला ? बंद करा ती बायागीते !’

वैशंपायनांच्या आरडाओरडयात पर-देशी दारात आले ते मला कळलेच नाही. आत शिरतानाच ते म्हणाले–

‘छायागीत कार्यक्रम बंद करू नका !’

वैशंपायन चमकले मी दोघांचा परिचय करून दिला. मग वैशंपायन परदेशींकडे वळले–

‘का, का बंद करू नका छायागीत ?’

परदेशी म्हणाले–

‘सांगतो. आमच्या पशुउद्यानात आम्ही जी हिंस्त्र श्वापदे आणतो त्यांच्या जंगला-तल्या सवयी बहुधा ती विसरलेली असतात. आता सोनालीचे उदाहरण घ्या. ही सिंहीण शहरात वाढली. आम्ही तिला प्रेमात पाड-ण्यासाठी ठिकठिकाणाहून सिंह मागवले; पण सोनाली अथवा तो आणवलेला सिंह एक-मेकाकडे ढुकून पाहिनात. हे नेहमी पशुसंग्रहा-लयात येतात. त्यांना मी हा प्रॉब्लेम सांगितला होता.’

परदेशी हा प्रॉब्लेम मला नेहमी सांगत.

‘त्याचा छायागीताशी संबंध काय ?’–

वैशंपायन कडाडले.

‘तोच सांगतोय. दोन आठवड्यापूर्वी आम्ही एका गुरुवारी प्रयोग केला. सोनाली आणि तिचा प्रियकर याना रात्री पिंजऱ्यात एकत्र ठेवले आणि पिंजऱ्यासमोर टी व्ही. ठेवला. ‘छायागीत’ सुरू झाले. पाउण तास सोनाली आणि तिचा प्रियकर एकटक ‘छाया-गीत’ पहात होती आणि काय आश्चर्य, टी. व्ही. बंद झाला...आणि’

‘कुठल्या कुठल्या सिनेमातली गाणी होती त्या दिवशी ?’ आम्ही कुतूहलाने विचारले.

‘प्रेम का तराजू, प्यार ही प्यार, चार प्रेमी, *मोहब्बतकी शिकार. अहो*, तुम्हाला सांगतो. पुढचे दोन तास सोनाली आणि तिच्या प्रियकराने पिंजरा दणाणून टाकला ! दोघे एकमेकाना धक्के मारू लागली. एकदा सोनाली उताणी पडायची, मग तिचा प्रिय-कर गडबडा लोळायचा. धक्काबुक्की तर इतकी की पिंजऱ्याची दारं तुटतात की काय अशी भीती वाटू लागली ! कालच सोनालीची डॉक्टरी तपासणी झाली. ‘शी इज प्रेग्नंट !’ अहो, जंगली प्रेमाची त्यांना एकदम आठवण झाली ! एकमेकाविषयी जे वाटतं ते व्यक्त कसं करावं हे त्यांना कळत नव्हतं. ‘छायागीत’ बंद करू नका. आम्ही आता सर्व पिंजऱ्या-समोर एक टी. व्ही. सेट ठेवण्याच्या विचारात आहोत–!’

— श्यानवा

अवतीभवती । शरद कृष्णन्

□

# तेजाळलेला क्रिकेटदौरा

आपल्याला बाद देणाऱ्या पंचाविरुद्ध केवळ निषेध नोंदवून न थांबता चेतन चव्हाणला मैदान सोडण्याचा सल्ला देणाऱ्या सुनिलवर झालेली आगपाखड वाचली होती. आज नेमके काय झाले ते प्रत्यक्ष टी. व्ही. वर बघणार होतो. १० च्या बातम्या संपल्या आणि क्रिकेट सुरू झाले. चेतन आणि सुनील दोघेही कसलेही दडपण न घेता मोकळेपणाने खेळत होते. ज्या आक्रमक पद्धतीने चेतन चेंडूवर तुटून पडत होता ती पाहून लिलीसारखा सामर्थ्यशाली गोलंदाजही बोथट वाटत होता. ही जमलेली जोडी चांगली रंगात आली होती. नाबाद १६५ धावा बोर्डावर असताना लिलीची ती वादळ उडवणारी फेक खेळण्यास गावसकर सरसावला. चेंडू चक्क त्याच्या बॅटला लागून आतल्या अंगाला येऊन पायावर आदळला. 'स्लो मोशन पद्धतीने ही गोष्ट वादातीत असल्याचे स्पष्ट झाले. चेंडू बॅटला लागून गेल्याचे सुनिलने सांगून पाहिले. लिलीबरोबर वादावादी झाली आणि काही निष्पन्न होण्यासारखे नाही, हे लक्षात आल्यावर तो खवळून उठला. आपण काय करतो आहे याचे त्याला भान राहिले नाही. दौऱ्यात त्याने व्यक्तिगत अपयश प्रचंड झेलले होते. बिचारा पहिल्यांदाच चांगला सेट झाला होता आणि ज्या पद्धतीने त्याने आज आपली बाजू लावून धरली होती ती पद्धत, सुनिलच्या नावावर आणखी एक शतक नोंदले जाणार असल्याची ग्वाही देत होती. अशा परिस्थितीत पंचाचे काम करणारे व्हाईटहेड खुशाल हात वर उचलतात, ते आपल्याला चक्क खोटं बाद देतात हे लक्षात आल्याने तो संतापला आणि त्याने चेतनलाही आपल्याबरोबर चलण्याची खूण केली. तो काय करणार? तोही तितकाच संतापला होता, परंतु तरीही सुनील खेळ सोडेल असे त्याला वाटत नसावे असे टी. व्ही. पहाताना जाणवले, त्यामुळे सुनिलने त्याला चलण्याची खूण केल्यावर तो काहीसा बिचकला. पण कर्णधाराचे म्हणणे प्रमाणे मानून पॅव्हिलिअनकडे परत निघाला. पुढे काय झाले हे सगळ्यानाच माहित असल्याने त्याबद्दल पुन्हा लिहिण्याचे प्रयोजन नाही. त्याने खेळ सोडायचे ठरवले, तो त्याचा सताप होता. तबूत येईपर्यंत सुनील शांत झाला. व्यवस्थापक विंग कमांडर शहीद दुराणी यानी चेतनला मैदानात थांबण्याची खूण करून, वेंगसरकरला मैदानात पाठवल्यावर सुनिलने कोणतीही प्रतिक्रिया नोंदली नाही. खेळ चालू राहिला; पण खेळ सोडण्याचा हा जो तमाशा झाला तो झाला नसता तर आज या विजयाची शान जास्त वाढली असती! खेळ सोडण्याच्या प्रकरणी सुनील दोषी खरा, परंतु खोटा बाद दिल्याबद्दल त्याने जी नाराजी नोंदवली त्याबद्दल मी त्याला दोष देणार नाही. वेस्ट इंडीजच्या एका दौऱ्यात कसोटीमालिकेत हजार धावा फटकावणारा शास्त्रशुद्ध फलंदाजीच्या बाबतीत आदर्श घालून देणारा हा सुनील या दौऱ्यात किती अयशस्वी ठरावा याला काही सुमार! पण असे होते. क्रिकेटमध्ये भल्याभल्याचे असे झाले आहे. भारतीय गोलंदाजीची पूर्ण खिल्ली उडवून पोत्याने धावा घेणाऱ्या झहीर अब्बासचा आपण नव्हता मामा केला! सुनिलच्या वाट्याला असाच दुर्दैवी पच आला. मेलबोर्नमध्ये त्याला ज्या पद्धतीने बाद दिला त्याबद्दल तो नाराज होता; पण त्याहीपेक्षा त्याचे सततचे अपयश त्याला डाचत होते. तीन कसोटी सामने असलेल्या या मालिकेत सुनील त्या वेळेपर्यंत पाच डाव खेळला होता आणि तरीही त्याच्या नावावर धावसंख्या फक्त ४८!! आणि ही सहावी अखेरची इनिंग्ज चागली जमली असताना चक्क खोटे बाद दिले जाते म्हणजे काय? असे वाटून त्याने तिखट प्रतिक्रिया व्यक्त केली तर ते क्षम्यच मानावे लागेल!

### तसे आपण क्षमाशीलच!!

भारतीय क्रिकेटशौकिनाची वृत्ती विलक्षण क्षमाशील आहे. उत्तेजित करणारा एखादा पराक्रम पहावयास मिळाला की ते मागचे दहा गुन्हे माफ करतात. आता या दौऱ्याचेच पहा ना! कौटी मॅचेसची सुरुवात तशी छान झाली होती; परंतु एक दिवसाच्या क्रिकेटमध्ये आपले चागले बंपाळे वाजले. पण कोणी फारसा आवाज केला नाही. मॅटिंगवरची कुस्ती जशी आम्हाला खेळता येत नाही तसे हे एक दिवसाचे क्रिकेट-तंत्र आपल्याला अजून तरी जमत नाही, असे सागून क्रिकेट-शौकिन मंडळीनी ही पडती बाजू सावरून धरली; पण पाच दिवसाच्या कसोटीमालिकेमधील पहिल्याच सामन्यात तिसऱ्या दिवशी मार खाण्याची वेळ आल्यावर मंडळी हादरली! बातम्यांवरून केवळ नजरा फिरू लागल्या. रस्तोरस्ती फिरणाऱ्या शौकिनांच्या कानाला चिकटलेले ट्रॅन्झिस्टर्स बंद पडले. चौकामधील कर्णे गडप झाले आणि धावफलक लिहिणाराचा उत्साह आटला आणि असा सपाटून मार खात असताना त्यानी भले लिहिले तरी ते वाचणार कोण? क्रिकेट जाणकार, आणि अगदी अव्वल प्रेमी मंडळी सोडली तर टाळी देऊन वातावरण धुदकुद करून टाकणारा प्रचंड उत्साही मंडळीचा देशभर पसरेला जो वर्ग आहे तो नांगी टाकून बसला. पहिला सामना केवळ तीन दिवसात गुडाळला गेल्याने एकदर भवितव्य कठीण वाटत असताना संदीप पाटील (१७४ धावा) आणि भारताची नववी जोडी यानी वाचवलेला सामना थोडे–फार चैतन्य निर्माण करू शकला. लिली व पास्को यांच्या माऱ्याला तोंड देत अतिशय प्रतिकूल परिस्थितीमध्ये मैदानात आलेल्या पाटीलने कणा मोडलेल्या भारतीय फलंदाजीला नवचैतन्य प्राप्त करून दिले गावसकर, विश्वनाथ खेळत नाही आणि इतर कोणाचा प्रभाव पडत नाही असे वाटत असताना संदीपने घणाघाती फलंदाजी करून १९७९ चा गुडाप्पा विश्वनाथचा १६३ धावांचा उच्चांक मोडला!

दुसऱ्या कसोटी सामन्यात संदीप मैदानात उतरला त्या वेळी परिस्थिती केवळ फारच नाजूक नव्हे तर चिंताजनक होती. डोळे फाटून जावेत अशी ५२८ ची धावसंख्या उरावर असताना भारताने ४ गडी बाद १३० धावा जमवल्या

पृष्ठ २४ वर

# ‘संध्याकाळच्या पुण्या’त प्रवेश करण्यापूर्वी....

माधव मनोहर

‘संध्याकाळचे पुणे’ या नावाचे एक नवे सदर ‘माणूस’ साप्ताहिकात गेल्या वर्षाच्या आरंभी केव्हा तरी सुरू झाले आणि त्यातील पहिल्या लेखापासूनच मी त्या सदराचा एक फॅन बनलो. हे सदर मला इतके आवडायचे, इतके आवडायचे की त्याची शिफारस मी माझ्या अनेक रसिक मित्राजवळ केली आणि त्यानाही माझ्याप्रमाणेच हे सदर आकर्षक वाटले. माझे एक फार जुने मित्र दि. बा. मोकाशी हे या सदराचे लेखक होते आणि त्याचे स्वतःचे व्यक्तित्व जसे साधे, सोपे पण निरंतर प्रिय वाटणारे आहे तसेच नेमके हे त्याचे सदरही होते. त्याच्या स्वतःच्या वेशात वा वर्तनात जसे कसले म्हणून कृत्रिमाचे विदर्शन नसते, तसेच नेमके त्याच्या सदरातही नव्हते. दोघाचाही मामला सर्वस्वी निष्कपट, मोकळाचाकळा, प्रांजळ आणि आरपार पारदर्शक असा. त्यात कोठे दाखवेगिरीची यत्किंचितही हौस नाही. लेखक जसा निर्मळ ऋजू स्वभावाचा आहे, तसेच नेमके त्याचे हे सदर होते. ते मला इतके आवडायचे की दिवाळी अंकाना पुरे पडण्यासाठी म्हणून त्यानी या सदरापुरती रजा घेतली, तेव्हा ‘माणूस’चे संपादक माजगावकर याना एक पत्र लिहून त्यासंबंधातील माझी रुष्टता लगेच मी त्याच्या कानावर घातली. माझे म्हणणे असे की कोणतेही सदर म्हटले की ते नियमितच असायला हवे. कोणत्याही कारणासाठी त्यात खंड पडून उपयोगाचा नाही. कारण आवडलेल्या त्या सदराचे वाचक पुष्कळ वेळा त्या सदरासाठीच त्या नियतकालिकाचे अंक घेत असतात. तेव्हा काही करून या मोकाशीमहाशयाना तुम्ही असे मोकळे सोडू नका. त्यांना सतत लिहिते ठेवा! पण माजगावकराना ते जमले नाही आणि शेवटी चालू सालच्या मध्याला केव्हा तरी हे ‘संध्याकाळचे पुणे’ काळोखात विलीन झाले आणि आता त्यातील काही निवडक लेख ग्रथरूप घेऊन पुन्हा प्रकाशात येत आहेत.

‘संध्याकाळचे पुणे’ मधील एक संध्याकाळ केवळ माझ्यासाठीच माझ्या या जुन्या मित्राने खर्ची टाकलेली आहे आणि त्यात त्याने माझ्याविषयी परोपरीनी इतक्या जाणकारीने चागले लिहिले की मलाच ही प्रस्तावना लिहितेवेळी काही सकोच वाटावा, पण तरीसुद्धा त्याने मला प्रस्तावनेसाठी विचारले, तेव्हा मी नाही म्हटले नाही, तर उलट आनंदाने होकार दिला. या होकाराचे कारण एवढेच की या प्रस्तावनेच्या निमित्ताने का होईना, कदाचित काही रसिक वाचकाचे लक्ष या लेखमालेतील लेखनगुणाकडे मी वेधू शकेन आणि रंगतदार लेखनाला काही नवे चोखंदळ वाचक लाभतील.

असा एक गैरसमज सर्वत्र दिसतो की नियतकालिक लेखन म्हणजे ते केवळ तत्कालसापेक्ष असते आणि ज्या काळातील लेखन, तो भूतकालात जमा झाला की त्या लेखनाचे स्वारस्यच जसे संपुष्टात येते. राजकीय घटनाबाबतचे जे सदर असते त्यात जर लेखनगुण नसतील, तर ते मात्र तदनंतरच्या काळात निरर्थक ठरते; पण त्याबरोबरच हेही लक्षात असू द्यावे की प्रभाकर, शतपत्रे, निबंधमाला, करमणूक, मनोरजन, केसरी, सुधारक, काळ, रत्नाकर, किर्लोस्कर इ. नियतकालिकातील पुष्कळसे लेखन असे होते की, ज्याने मराठी साहित्याचा इतिहास घडवण्यास बहुमोल मदत केली. किंबहुना ते लेखनच साहित्येतिहासरूप पावले. तात्पर्य, केवळ कालसापेक्ष असे लेखनही कालनिरपेक्ष असू शकते व त्यात नवे विचार असतील वा लालित्यगुणानी ते नटलेले असेल, तर त्याची योग्यता कालातीत ठरते. तसाच विचार केला, तर ‘संध्याकाळचे पुणे’ दाखवणारे लेखन सर्वस्वी कालसापेक्ष आहे आणि तरीही त्याचा गाभा जो आहे तो, कालनिरपेक्ष शाश्वताचा आहे असे मी मानतो आणि लगेच असे का मानतो, त्याचे कारण पण सांगतो.

‘संध्याकाळचे पुणे’ हे सदर वरवर पाहिले तर सरळ सरळ वृत्तनिवेदनपर दिसते. त्यातील बहुसंख्य लेख हे पुण्यातील एखाद्या गल्लीबोळात वा अन्यत्र झालेल्या सभा-परिसंवादादि कार्यक्रमांचे वृत्त देणारे असे वाटतात. त्यातील पुन्हा कित्येक कार्यक्रम असे की त्याची साधी नोंदसुद्धा तत्कालीन वृत्तपत्रानी केलेली नसणार आणि नोदच नसेल, तर दखल कुठली? म्हणजे खरे तर पुण्यातील हे संध्याकाळचे कार्यक्रम तसे सामान्यत. विसरण्याच्याच योग्यतेचे. त्यात विशेष ते काय असणार? गमतीची गोष्ट म्हणजे येथे तर एका चक्क न ऐकलेल्या सभेचेही वृत्त दाखल केलेले आढळेल! ज्यांची साधी नोदसुद्धा पुणेकरानी कधी घेतली नाही, मग उपस्थिती आणि दखल तर दूरच, अशा कार्यक्रमाचे येथे साग्रसगीत वर्णन आढळते. पुष्कळशा सभा तर अशा आहेत की, जेथे श्रोत्याची उपस्थिती नाही, म्हणून खुद्द निवेदकच व्यथित आणि भयभीत झालेला आहे!

उदाहरणार्थ: पुण्याच्या सुप्रसिद्ध भारत इतिहाससंशोधन मंदिरात होऊ घातलेल्या--आणि पहिल्याच लेखाचा विषय झालेल्या--एका सभेला हा निवेदक वेळेवर गेला, ‘तेव्हा तेथे अक्षरशः कुणीही नव्हतं! अध्यक्षांची खुर्ची, टेबल आणि समोर तशाच पाउणशेएक खुर्च्या रिकाम्या होत्या!’ तेव्हा निवेदकाला वाटले की ‘आपण वर्तमानपत्रात वाचावयास चुकलो की सभागृहाच्या एका कोपऱ्यात बसलेले दोन-चार म्हातारे हेसुद्धा सभेचे विसरले? आणि मग सभेला कुणी येणार नाही, या कल्पनेनं माझीच धडधड होऊ लागली.’ अशा नर्व्हस मनोवस्थेत अर्धा तास गेल्यावर ‘त्या दिवसाच्या सभेचे अध्यक्ष प्रा. ग. ह. खरे वक्त्यासाठी व स्वतःसाठी सभेत न चुकता लागणारे तांब्या-भाडे घेऊन आले, ते टेबलावर ठेवून अध्यक्षाच्या आपल्या खुर्चीवर बसले- तरी प्रेक्षकाच्या खुर्च्या अजून रिकाम्याच होत्या; पण ते निर्धास्तच!

‘मग खुर्चीवर बसून बरोबर आणलेली अध्यक्षाची घटा टेबलावर

ठेवून त्यानी ती जोरजोरात खणखणवली-जणू परीकथेत जादूने गवतातून सैनिक उत्पन्न झाले, तसे घंटेच्या प्रत्येक आघाताला प्रेक्षक निर्माण होऊन खुर्च्या भरणार होते; पण तसे काही झाले नाही. दाराजवळच्या कोपऱ्यात बसलेले म्हातारे खरे यांनी त्यांना पुढे येऊन बसा, म्हणताच उठून पुढे खुर्च्यांवर येऊन बसले. मग एक एक खुर्ची भरत चालली. मीही जाऊन बसलो. लवकरच लक्षात आले की मी चौदावा श्रोता आहे; पण वक्ते कुठे आहेत ? मलाच अपराध्यासारखं वाटू लागलं.

'मी मागे वळून दाराकडे पाहिलं. तेथून रस्त्यावरची रहदारी दिसत होती. मी झटकन् तोंड वळवलं. कुणी मला इथं पाहिलं तर तो हसेल, वेडयात काढील किंवा म्हातारा झाला म्हणेल; पण मला जे उगाचच लाजल्यासारखं वाटत होतं, तसं श्रोत्यांच्या तोंडावर काही दिसत नव्हतं. मी मागे वळून पाहिले होते. हे चुकले होते. अशा सभेत मागे वळायचं नसत !'

नंतर वक्ते बोलू लागले. ' माझ्यापुढे आधी तेरा लोक होते. मी मागे मान वळवून पाहिले· आता माझ्यामागे तेरा लोक बसले होते. मला एकदम बरे वाटले. खूपच छान गर्दी होते की इथे– माझ्या मनात आलं.'

याच थाटात मोकाशी यानी या 'ऐतिहासिक' सभेचे वृत्त कथन केले आहे. केवळ सभागृहाचे वा सभेचे वर्णनच नव्हे, तर 'इतिहास संशोधन मंदिराच्या उंच गोथिक पद्धतीच्या इमारती' पासूनचे. सर्व वर्णनाचा बाज थेट असाच. सर्वत्र निवेदकाचा मी महत्त्वाचा आणि हे लेख वाचायचे, तर केवळ हा जो कोण मी आहे त्याच्या मोहबतीखातर. येथे कार्यक्रम महत्त्वाचे नाहीत. महत्त्वाचा आहे तो मी. येथे सभा महत्त्वाची ठरते, ती केवळ तेथे उपस्थित असलेल्या या 'मी'-च्या अस्तित्वामुळे तात्पर्य : मोकाशीचा मी आहे म्हणूनच हे 'संध्याकाळचे पुणे' आहे. अन्यथा संध्याकाळचे पुणेच नसते !

कोणत्याही एखाद्या सभेचे वृत्त वृत्तपत्रात वाचावे, ते कसे अगदी रुक्ष कोरडे असते. *अमुक अमुक वक्ता अमुक अमुक बोलला, या धाटणीचे.* अशी एक समजूत आहे की आदर्श वृत्तनिवेदन असेच असावे. वृत्तसापेक्ष आणि निवेदकनिरपेक्ष. वृत्तपत्र यासाठीच असते. नेमके वृत्त दिले की वृत्तपत्राचे काम पण संपले आणि वृत्तपत्रे तर आताच वर म्हटले त्याप्रमाणे, मोकाशी ज्या कोणत्या सभेला जातात, त्या सभेची तर कधी दखलही घेत नाहीत. इतिहास सशोधन मंदिरातील सभेत वृत्त कसले व कोणते असणार ? ही अशी सभा म्हणजे काही बातमी नव्हे.

सारसबागेत कोणाचे कीर्तन झाले, तर ते कीर्तन म्हणजे काही वृत्त नव्हे. तेव्हा कोणतेही वृत्तपत्र त्या कीर्तनाच्या वाटेला कशाला जाईल ? पण मोकाशी जातात. कीर्तन हे आपले केवळ निमित्त. मोकाशी सारसबागेविषयी-पूर्वीच्या व आताच्या-किती तरी मनोरंजक घटना सागतात. कीर्तनपरंपरेचा इतिहासही ऐकवतात. देवदर्शनासाठी जाणाऱ्या तथाकथित भक्तांची मनोगतेही उघड करून दाखवतात आणि जसे सहज जाता जाता आजचे मराठी साहित्य मराठी माणसापासून कसे तुटले आहे, त्याविषयी किती छान बोलतात ! आमच्या लेखकांचे साहित्य 'नास्तिक' आहे, असे ते म्हणतात. मराठी कथा-कादंबऱ्यातील नास्तिक पात्रे हे लेखक कुठून आणतात, हे मला कळत नाही असे तें म्हणतात. या विषयावरचे त्यांचे मजेशीर भाष्य असे आहे.

'आम्ही जे स्त्री-पुरुष भोवताली पाहतो, ते एकादशा करतात. गुरुवार, शनिवार करतात. चतुर्थ्या पाळतात. नवस बोलतात. माळ घेतात. गंडे-दोरे बांधतात. ग्रहाचे खडे घालतात. कुलदेवतांचे उत्सव करतात. राशिभविष्ये पाहतात. ज्योतिषी लोकांना पत्रिका दाखवतात; पण आमच्या लेखकांच्या कथा–कादबऱ्यातील पात्रे यापैकी काही करताना दिसत नाहीत. ती पैशासाठी, प्रेमासाठी, मनाचे लाड पुरे करण्यासाठी तडफडतील; दु:खी कष्टी होतील. आनंद करतील; पण कधी कुणी शनिमहात्म्य वाचील किंवा आज आपल्याला उपवास आहे म्हणेल, तर शपथ ! त्यामुळेच मराठी वाङ्मय हृद्य होत नाही, असे मला वाटते. नायक राशिभविष्य पहातोय असे त्यांनी घातले, तर कित्येक किंवा सर्व वाचकांना पुन:प्रत्ययाचा आनंद मिळेल.

'वाचकांना कोणताही आनंद मिळवू द्यावयाचा नाही, ही नवलेखकाची प्रतिज्ञा असेल किंवा आपल्या नायकाने राशिभविष्य पहावे हे त्याना शरमेचे वाटत असेल...आपण लेखक झालो, म्हणजे पुरोगामी व्हायला हवे आणि आपली पात्रेही नास्तिक व्हायला हवीत, असा लेखकात संकेत झाल्यासारखा वाटतो. नव्या लेखकांनी तरी आता असे करू नये. लोकाच्या श्रद्धांना अनुल्लेखाने मारू नये. म्हणून नव्याने लिहिणाऱ्या लेखकांसाठी मी एक नमुना पुढे ठेवीत आहे. हा एका कथेचा आरंभ आहे.

'शशी आज घाईत होता. त्याने वीणेला नऊ वाजता संगम उपाहारगृहाशी बोलावले होते. तिचे वडील तिच्यासाठी ठिकाणे पाहात आहेत हे त्याला निश्चित कळले होते व त्यासंबंधी विचारून तो तिला पिळणार होता. आज आपली भरपूर करमणूक होणार, वीणा रडेलसुद्धा, ही त्याची खात्री होती. फार तर नंतर तिला पिक्चर दाखवावा लागेल, यासाठीच आज घाई. तो अगदी पहाटे उठला. *गुरुचरित्राचा एक अध्याय रोज वाचण्याचा त्याचा नेम होता आणि* संध्याकाळी मोदी गणपतीला जाऊन यायचा. या दोन नित्यनेमांमधला वेळच त्याला मोकळा होता.

'गोष्टीची ही सुरुवात किती नैसर्गिक वाटते पाहा. पुन्हा काही खोटे किंवा काल्पनिकही सांगितलेले नाही. जर कुणाला खोटे वाटत असेल, तर त्याने पुण्यातील देवळे हिंडून पहावीत आज मुले-मुली जीनच्या किंवा बेलबॉटम वगैरे पँटा घालतात, गुरु वगैरे कुडती किंवा टॉप्स घालतात, यावरून ती नास्तिक आहेत अशी उगाच गैरसमजूत करून घेऊ नका. (सारसबागेतील गणपतीची साक्ष काढली तर तोही फॅशनेबल पोरे आपल्या दर्शनासाठी रोज कशी गर्दी करतात त्याविषयी एक लाबलचक प्रवचन झोडील !)'

–उपर्युक्त उतारा खूपच लाबला; पण तरीसुद्धा तो येथे उद्धृत केला याचे कारण लेखकाच्या बहारदार लेखनशैलीची साक्ष पटावी. या लेखनात सूक्ष्म निरीक्षण आहे, वस्तुस्थितिदर्शन आहे, सौम्य उपहास आहे, नर्म विनोद आहे, लोकस्वभावाची जाण आहे, साहित्याचे अवलोकन आहे. त्यात नाही काय ? त्यात जे कीर्तनाचे वृत्त आहे ते मात्र केवळ निमित्तमात्र आहे पुन्हा हे ज्याचे निमित्त, त्या लेखाचे शीर्षक आहे. 'दिवसेदिवस हरवत असलेले आकाश' आणि

त्याची सुरुवात आहे, 'चतुर्थी करणाऱ्या लोकांबद्दल मला नितात आदर आहे. त्याच्याबद्दल माझे एकच गाऱ्हाणे आहे. चतुर्थी सोडताना ते पचांगात किंवा वर्तमानपत्रात चंद्रोदय पाहून सोडतात. त्यानी चंद्रोदय आकाशात पहायला हवा. निसर्गाशी नाते रहावे, म्हणून हा उपवास आपल्या पूर्वजानी ठेवला असावा. त्याना पंचागे, वर्तमानपत्रे, घड्याळे घरोघर होतील ही कल्पना नसावी शहरातील लोकांना पंचागे, वर्तमानपत्रे, घड्याळे मिळाली; पण ते आकाश हरवून बसले ' आणि या लेखाचा शेवट असा आहे 'या भक्तांनी पंचागात पाहून चतुर्थी सोडू नये. प्रत्यक्ष उगवता चंद्र पाहावा. त्या निमित्ताने कुणाला दिवसेदिवस हरवत असलेले आकाश सापडले तर बरे.'

उपर्युक्त उदाहरणावरून हे लक्षात यावे की वर्ण्य व लक्ष्य लेखनविषय उपचारापुरता कोणताही असला, तरी त्या विषयाचे निमित्त करून लेखक त्या विषयापासून बुद्धिपुरस्सर दूरवर भरकटत जातो आणि त्याचे हे भरकटणे विषयनिरपेक्ष पण स्वतःसापेक्ष असे असते. म्हणजे या लेखनाचा विषय तसा अगदीच रुक्ष असला, तरी त्यातील विषयान्तरे मात्र पराकाष्ठेची रमणीय असतात. या रमणीयतेचे एकमेव कारण म्हणजे लेखकाचे आत्मनिवेदन—आणि वृत्तनिवेदन तर केवळ वस्तुनिष्ठच असते आणि तसे ते वस्तुनिष्ठच असावे, असे वृत्तनीती पण सतत आवर्जून वा गर्जून सागत असते.

वृत्त संसदेतील चर्चांचे वा घडामोडीचे असो, विमान, रेल्वे, ट्रक, स्कूटर, बैलगाडी इ. वाहनांच्या अपघाताचे असो, कोणाच्या काही विशेष कर्तृत्वाचे वा निधनाचे असो, घडामोडीचे असो वा आग लागल्यामुळे घर भस्मसात झाल्याचे असो, सभा भरल्याचे वा सभा उधळल्याचे असो; तात्पर्य बातमी कोणतीही असो; त्या बातमीच्या निवेदनात निवेदकाने स्वतःचे व्यक्तित्व कोठे यत्किंचितही मिसळू नये याबद्दल पराकाष्ठेची दक्षता घ्यायची असते. वृत्तात व्यक्तित्व मिसळले की मग वृत्तनिवेदन पक्षपाती आणि म्हणून विकृत व कलुषित होते. वृत्तनिवेदन ही एक प्रकारची साधना आहे, तपश्चर्या आहे. त्या साधनेतील वा तपश्चर्येतील स्वत्वलोप हा सर्वाधिक महत्त्वाचा घटक असतो. म्हणून वृत्तनिवेदन निवेदकनिरपेक्ष तटस्थ असावे, असा वृत्तनीतीचा एक सर्वमान्य सकेत आहे.

आता मोकाशी हे, त्या शब्दाच्या रूढ अर्थाने एक परीने वृत्तनिवेदक आहेत; पण आहेत यापेक्षा नाहीत, हेच अधिक खरे. त्याना वृत्त हवे असते, ते केवळ त्याच्या प्रस्तुतसारख्या लेखनास काहीएक निमित्त पुरवण्यापुरते. मग ते मूळ निमित्त विसरून जाणे, हेच त्याच्या लेखी अगत्याचे व आवश्यक असते. पुण्यासारख्या मोठ्या शहरात संध्याकाळच्या वेळी सभा तर काय, प्रत्यही अनेक सतत होतच असतात. त्यापैकी कोणतीही एक सभा 'कव्हर' करणे, हाच मुळी— अर्थात ती सभा कव्हर करण्याच्या योग्यतेची आहे, असे वाटत असल्यास—वृत्तपत्राचा उद्देश असतो आणि मग त्या सभेचे वृत्त बहुविध वृत्ताच्या पसाऱ्यातून उरलेल्या जागेत एका कोपऱ्यात देण्यात येते आणि म्हणून वाचताक्षणीच ते विसरले पण जाते हे झाले वृत्तपत्रातील नेहमीचे सभावृत्त.

—पण 'संध्याकाळचे पुणे' रंगतदार होते ते नेमके वृत्तनीतिप्राप्त संकेतास न अनुसरल्यामुळे. अशा प्रकारच हेतुपुरस्सर सकेतभंग हाच प्रस्तुत लेखनाचा पाया आहे. येथे खरे तर लेखकाला सभा सोडून स्वतःविषयीच बरेच काही काही सांगायचे आहे. वस्तुजाताविषयी त्याची काही काही पूर्वनिश्चित अशी काही मते आहेत आणि त्याचे प्रतिपादन करण्यात त्याला रस आहे. केवळ स्वतःच्या अशा कित्येक जुन्या आठवणी त्याला मोठ्या जिव्हाळ्याने जागवायच्या आहेत. त्याने स्वतः जे आयुष्य पाहिले—भोगले आहे, त्यात विसरण्यासारखे पुष्कळच असले तरी सागण्यासारखे असे मोठे संचितही त्याच्याजवळ साठलेले आहे आणि त्या संचिताची देवाणघेवाण समंजस वाचकाशी करावी अशी त्याची मनोमन इच्छा असते. थोडक्यात म्हणजे वाचकाशी सुसंवाद साधावा हे त्याचे अंतिम ईप्सित असते. म्हणून शेवटी जे वृत्तनिवेदन व्हायचे, ते आत्मनिवेदन होते.

आता तज्ज्ञाच्या सहज लक्षात येईल की या निवेदनाची जात ललितलेखनाची आहे. सर्वच ललितलेखन प्रामुख्याने आत्मपर, आत्मनिर्भर आणि आत्मनिष्ठ असते. जे वृत्तनिवेदन केवळ वस्तुनिष्ठच असायला हवे त्यातील वृत्तवस्तू निग्रहाने बाजूस सारून ते आत्मनिष्ठ बनवण्याची ही किमया आहे. आत्मनिष्ठेच्या परिसस्पर्शाने वृत्ताचे हीण जळून जाते. त्याचा लोहभाव नष्ट होतो आणि शिल्लक उरते ते साहित्यरूप सुवर्ण. अशा प्रकारच्या लेखनाचे निकटचे नाते असते ते ज्याला—आपण चुकीने 'लघुनिबंध' म्हणून संबोधतो त्या—आत्मनिष्ठ वाङ्मयप्रकाराशी.

## ललित निबंध

(आणि हे आपले सहज जाता जाता : फडक्याप्रमाणेच मलाही 'लघुनिबंध' ही संज्ञा मुळीच आवडत नाही. कारण लघुत्व हे काही या वाङ्मयप्रकाराचे व्यवच्छेदक लक्षण नव्हे. खरे तर 'गुजगोष्ट' म्हणून फडके या वाङ्मयप्रकाराला उद्देशून आरंभी म्हणत होते तेच योग्य होते; पण 'गुजगोष्ट' या संज्ञेला वाङ्मयीन संदर्भ नसल्यामुळे आणि कदाचित फडक्यांनी तो आपल्या निबंधसंग्रहासाठी विशेषनाम म्हणून योजल्यामुळे — 'गुजगोष्ट' ही संज्ञा बाद झाली. तेव्हा स्वत फडक्यांनीच 'लघुनिबधा'ऐवजी 'ललित निबंध' ही संज्ञा सुचवली. ती खरोखरच अन्वर्थक होती कारण लालित्य हेच वाङ्मयप्रकाराचे व्यवच्छेदक लक्षण होय आणि वाङ्मयीन लालित्य हे नेहमीच लेखकाच्या आत्मभावाशी संलग्न असते.)

ललितनिबंधात तरी काय असते? तर निबंधकार एखाद्या स्वानुभवाचे निमित्त करतो आणि वाचकाला विश्वासात घेऊन त्याच्याशी त्या निमित्ताने तो अघळपघळ गप्पागोष्टी करतो. इंग्रजीत तर या निबंधाला 'फायरसाइड चॅट' म्हणून म्हटले जाते आणि या निबंधातील आत्मनिर्भरता ही इतकी पराकोटीची असते की, हा निबंधकार आपले हृदय आपल्या कोटावर लटकावून ठेवतो असे म्हटले जाते. याचा मथितार्थ अर्थ असा की, जे हृदयस्थ ते या निबंधात उचंबळून बाहेर येते. लेखकाचे अंतरंगच येथे उघड्यावर मांडल्यासारखे स्वच्छ प्रतीत होते किंवा असे म्हणू या हवे तर, की हा निबंध म्हणजे लेखकाच्या अतरंगाचा एक्स रे फोटोग्राफ असतो.

मोकाशीच्या या संध्याकाळच्या गप्पागोष्टी फार चविष्ट आहेत. कारण चव येण्यासाठी म्हणून जो खमंग मालमसाला लागतो त्याचे स्वानुभवप्राप्त रसायन—पुढारच ललितलेखक म्हणून ख्यात असलेल्या—या निबंधकाराला उत्तम अवगत आहे आणि त्याशिवाय तो स्वभावतःच हरहुन्नरी आणि चतुरस्र असल्यामुळे त्याला अनेक

विषयात रस आहे. त्याच्या बहुश्रुततेचा प्रत्यय तर येथे जागोजाग येतो.'

एक साधी गोष्ट बघा एकदा केव्हा तरी एखादी संध्याकाळची सभा कव्हर करण्याऐवजी त्याने लक्ष्मीरोडचा फेरफटका केला आहे. आता लक्ष्मीरोड म्हणजे पुण्याची बाजारपेठ. लक्ष्मीरोडवरचा बाजार बघून लेखकाला तिसऱ्या शतकातील अवंतीच्या बाजाराचे वर्णन आठवले. जसे अगदी सहज आणि ते वाचून आपल्याला पटते की दीड–दोन हजार वर्षांपूर्वीपासूनची उज्जयिनी आणि आजची पुण्यनगरी यातील बाजारपेठात काहीएक फरक नाही. कारण 'कुठल्याही काळातले व कुठल्याही देशातले बाजार सारखेच असतात.' या लेखकाने आपल्या या लेखनात ठायी ठायी अगदी थेट वेदपूर्व काळापासून तो आजतागायतच्या इतिहासकाळाचे असे संदर्भ पुरवले आहेत की ते वाचून सामान्य वाचक खरोखरच आश्चर्यचकित होतो.

उदाहरणार्थ, दत्तो वामन पोतदाराना या लेखकाने शिवाजीमहाराजाच्या काळात 'राजे' कॉफी पीत असत का असा एक प्रश्न–मिष्किलपणाने नव्हे, तर गंभीरपणाने–विचारला होता. कारण काय? तर 'शिवाजीमहाराजानी युरोपिअन पाहुण्यासाठी कपबशा, कॉफी वगैरे सरंजाम ठेवला होता '–असे त्याने कोठे तरी वाचले होते. आपल्याला कधी हा असा बाह्यतः विक्षिप्त प्रश्न सुचेल? पोतदारानी त्याला असेच थातुरमातुर उत्तर देऊन तेव्हा वाटेस लावले होते; पण त्या थोर पुरुषाच्या निधनानंतरही या आठवणीचे सल त्याच्या मनोगतात तसेच रुतलेले होते.

आता दत्तो वामन हे पुण्यनगरीचेच सुप्रसिद्ध रहिवासी असल्यामुळे त्यांच्याविषयी लेखकाने किती तरी मनोरंजक आठवणी रंगवून सांगितल्या आहेत. एके ठिकाणी त्याने म्हटले आहे की 'पोतदारानी लिहावयास घेतलेल्या शिवचरित्रावर पुष्कळ विनोद ऐकूनही हे गृहस्थ मला फार आवडत. सभेत एक विषय सुरू केल्यावर पुन्हा त्याच विषयावर येईपर्यंत ते इतके विषय बोलत की आपण घरी जाऊन स्नान, जेवण, वामकुक्षी वगैरे उरकून हवे तर चहा घेऊन यावे बहुधा तोपर्यंत मूळ विषयावर पोतदार आलेले नसणार! एकदा केव्हा तरी आम्ही गायकवाडवाड्यावरून जात असता तेथे गणपतिउत्सवात त्याचे व्याख्यान चालू होते. त्याचा विषय आता आठवत नाही. आम्ही लगेच आत शिरून बसलो.

'गेलो तेव्हा जन्मदिनाचा विषय चालू होता. शिवाजीमहाराजाचा जन्मदिवस इंग्रजीवरून घेतल्याने त्यातले स्वारस्य कसे जाते, हे सांगत असता कुणी कोणती जन्मतारीख धरली, कुणी कोणती धरली या आकडेवारीतून ते पचांगात शिरले व तेथून पचांगशुद्धीवर आले. सरकारने केलेले पंचांगशुद्धीचे प्रयत्न सांगून ते पुण्यातील मंगल कार्यालयाचा इतिहास सांगू लागले. मंगल कार्यालयावरून आपलं लग्न कसं राहिलं याचा किस्सा सांगून ते नवविवाहितांच्या मधुचंद्राच्या चालीविषयी बोलू लागले. तदनुषंगाने परदेशच्या प्रवासाची हकीगत त्यानी सुरू केली. फ्रान्सला गेल्यावर पॅरिसमधील अण्डरग्राउण्ड रेलगाडीच्या आणि रशियातील प्रवासाच्या गमती त्यानी सांगितल्या.'

'किती तरी वेळ आम्ही ऐकत बसलो. आम्हाला वाटले ते आता (आपल्याला नेमून दिलेल्या) विषयावर येतील, मग येतील; पण तास गेला, दीड तास गेला; ते बोलत होते व आम्ही हसत होतो, –आता ती व्याख्याने आठवून एकाच गोष्टीचे वाईट वाटते. जेव्हा मृत्यू समोर आला तेव्हा त्यानी त्याला व्याख्यान देण्यास का आरंभ केला नाही? माझी खात्री आहे की त्याचे व्याख्यान ऐकत गालात हसत मृत्यू दूर खिळून उभा राहिला असता!'

मोकाशीनी पोतदाराच्या प्रेतयात्रेचे व नंतरच्या स्मशानातील शोकसभेचे वर्णनही मोठे रोचक केले आहे आणि ते करीत असताना पोतदाराप्रमाणेच मोकाशी खूप भरकटले आहेत. अर्थात हे भरकटणेही मनोवेधक आहे. त्यानी म्हटले आहे की 'अखेरचे काही दिवस आपण काय करतो हे पोतदारास कळेनासे झाले होते.' हा धागा पकडून 'प्रत्येक म्हातारपण वेगळ्या तऱ्हेने कसे संपते' या विषयात ते शिरतात. 'कुणाला खा खा सुटते, कुणाचं वागण्याचं भान जातं' इ. नंतर स्मशानभूमीवर स्त्रियानी जावे काय? हा विषय येतो. नतर मग 'मृत्यूचे भय जावे, इतके सुदर असलेल्या वैकुंठभूमीच्या' वर्णनात ते शिरतात. मध्येच पोतदाराची अन्त्ययात्रा फारच लहान होती म्हणून ते हळहळतात. मध्येच सीझरची त्याना आठवण होते. सीझर जसा महत्त्वाकांक्षी नव्हता आणि तरीही त्याच्यावर तत्संबद्ध दोषारोप झाले होते, तसेच पोतदारानी संकल्पित शिवचरित्रासाठी सरकारकडून काही अनुदान घेतले नसता त्यांच्यावरही निष्कारण दोषारोप झाले होते. उभयताच्या मृत्युपत्रातील साम्य तर केवळ आश्चर्यकारक आहे मोकाशीना ते दिसले हे विशेष! पोतदाराविषयी शोकसभेत जी भाषणं झाली, त्यातील एखादा अपवाद वगळता सर्वच 'सामान्याहून सामान्य' होती. 'ज्ञान आणि रंजकता यानी ओसंडून जाणारी ज्याने व्याख्याने दिली, त्या पुरुषाच्या श्रद्धांजलीच्या समयी इतकी कंटाळवाणी, कोरडी व्याख्याने व्हावीत हे दुर्दैव होय!'–असे मोकाशी म्हणतात.

'आर्या आर्यासि रुचे' या निबंधात मोकाशीनी मोरोपताच्या कवित्वाविषयी असेच फार गहिवरून लिहिले आहे. ते गेले होते, ते मोरोपंतांच्या पुण्यतिथि–व्याख्यानाला; पण तत्पूर्वी त्याना बारामतीस मोरोपंताची वास्तू पाहिल्याची आठवण येते आणि 'मोरोपताच्या काव्यातील गोडीमुळे बारामतीनगरी आज पूर्ण साखरेची झाली आहे. इतकी की शहरातून जाताना मोरोपतासारखा कवी येथे कसा झाला असेल असे वाटावे इतकी ती आता व्यवहारी झाली आहे.'–असा अभिप्राय व्यक्त केल्यावर मोकाशी म्हणतात: 'मोरोपताची मिरासी आम्हाला आमच्या वडिलानी दिली व त्याना ती त्याच्या श्वशुरानी दिली. तेव्हापासून आमचे घर मोरोपती आर्यांवर तरंगत आले आहे. रोज पाच आर्या याप्रमाणे तीन वर्षे वडिलानी आमच्याकडून मोरोपंत पाठ करवून घेतला आणि त्यामुळे आयुष्यातील अनेक सुखदुःखाच्या वेळी मोरोपती आर्यांने आम्हाला उपयोगी पडली; पण त्या आर्यांमुळेच जीवनात बोअर होण्याची पाळी आमच्यावर आली नाही. आजचे नवकाव्य असे म्हणता येत नसल्यानेच आजची नवीन पिढी वारवार बोअर होत असावी त्यानी मोरोपंत पाठ करून पहावा.'–असा मोकाशीचा सल्ला आहे.

नवलाची गोष्ट म्हणजे मोकाशीना मोरोपंताच्या 'केकावली' वरून टी. एस. एलिएटच्या 'वेस्ट लॅण्ड' या नामांकित आधुनिक

काव्याची आठवण येते. 'कारण ते काव्य केकावलीएवढेच आहे. त्यावरील टोकाटिप्पणीचीही पन्नास–पाउणशे पाने होतात आणि दोन्ही काव्यांनी अनेक कवीना स्फूर्ती दिली.' मोकाशी म्हणतात, 'मी 'केकावली' व 'वेस्ट लॅण्ड' यांची तुलना करतोय, हे पुष्कळाना मूर्खपणाचे वाटेल. यंत्रयुगाची संभावना करणारे श्रेष्ठ काव्य 'वेस्ट लॅण्ड' कुठे आणि भाबडी 'केकावली' कुठे, असे ते म्हणतील. त्यावर मी एवढेच म्हणेन की मला जसे 'वेस्ट लॅण्ड' कळले नाही, तशी त्यांनाही 'केकावली' कळली नाही. 'केकावली' ही सरंजामी युगावरची टीका आहे तो भाबडा टाहो नाही.–' असो. मोकाशीचे बुद्धिपुरस्सर भटकणेही कसे व किती आल्हाददायक असते, त्याची ही एक वानगी.

'वार्धक्यी निज शैशवास जपणे' हा 'बाणा कवीचा' या लेखकाने मनोमन जपलेला असल्यामुळे त्याचे जिज्ञासू कुतूहल केवळ अमर्याद असे आहे. परिणामी येथे कोणते विषय केव्हा कोठे भेटतील, याचा काही नेम नाही. निसर्गप्रेम हा या कवीचा एक खास करून आवडता असा विषय आहे आणि निसर्गोपचार त्याला अज्ञात नाहीत. बुद्धासमवेत 'पुन्हा लुम्बिनीच्या वनात' सहल करायची त्याची तयारी आहे. वार्धक्याच्या दिशेने त्याची वाटचाल असल्यामुळे 'म्हातारपण' कसे घालवावे, या प्रश्नाविषयी त्याची आत्मीयता समजण्यासारखी आहे. त्याने 'न ऐकलेल्या सभे'चा विषय 'सुशिक्षिताची बेकारी' हा होता आणि वेदकाळापासूनच व्हाया–शिवशाही–आग्लाईपर्यंतचा तत्संबद्ध इतिहास सांगून झाल्यावर त्याने वाडवडिलाच्या आणि स्वत च्या बेकारीबाबतच्या आठवणी फार रंगवून सागितल्या आहेत.

आद्य शंकराचार्य, ज्ञानेश्वर, शिवाजी, नाना, महादजी व घाशीराम, आजच्या स्त्रियांचे पातिव्रत्य, बलात्कार, मानवी मूलभूत हक्क व धर्मसस्था, लोकशाहीतील निवडणुका, पंढरीची पालखी, ज्योतिषाची भविष्ये, दिवंगत सार्वजनिक काका, बालगंधर्व आणि विद्यमान शंकराचार्य, धूम्रपान, क्रिकेट, कीर्तन, ग्रहण, सूर्यग्रहण, गीतरामायण असे किती म्हणून विषय सांगावेत ? दूध, साखर व मध–जिव्हालौल्यास कारण होणाऱ्या या विषयात कोणाला रस नसतो ? पण त्याविषयी मोकाशीनी ग्रथित केलेली माहिती सर्वसामान्य वाचकाना एकदम नवी वाटेल अशी आहे. उपर्युक्त सर्वच विषय असे आहेत की ज्याविषयी ज्याला कुतूहल नाही असा माणूस विरळा ! वसंत व श्रावण आणि मंगळागौर हे विषय तर जशी 'मोकाशीची मिराशी'च !

हे सर्व लेखन पुनश्च एकवार डोळ्याखालून घातले आणि तद्विषयक पुन प्रत्ययाचा आनद मनसोक्त भोगला, तेव्हा असे लक्षात आले की त्यातील चार–दोन गोष्टीकडे विशेषेकरून वाचकाचे लक्ष अवश्य वेधायला हवे. येथे ज्योतिषाविषयी दोन लेख असे आहेत की ज्यानी जिज्ञासूचे कुतूहल नेहमीप्रमाणेच चाळवावे. पैकी एक आहे 'ज्योतिष्याचे जग'. त्यातील विख्यात पुणेकर ज्योतिष्यांनी सागितलेल्या काही काही गोष्टी विस्मयजनक आहेत. एक म्हणतो. 'पंचांगातल्या मूहूर्तांना कसलेच तत्त्व नाही.' –तर दुसरा म्हणतो, 'लग्न ठरवताना पत्रिका पाहू नये.'– आणि शेवटी 'सक्रान्तिफल हे पंचांगातून काढूनच टाकायला हवे' आणि 'सिंहस्थ थोतांड आहे!'

—तर दुसऱ्या एका लेखात तीन नामांकित ज्योतिष्यांनी वर्तवलेली राजकीय भविष्ये आहेत. ही सर्व भविष्ये गेल्या निवडणुकीपूर्वी— म्हणजे साधारण मानाने बरोबर वर्षभर पूर्वी वर्तवलेली आहेत. तीनही ज्योतिष्यांचे निश्चित मत असे आहे की 'इंदिरा गाधीचा अस्त झाला आहे.' पैकी एकाचे वाक्य तर असे आहे की 'इंदिरा गाधीना यापुढे शून्य चान्सेस आहेत.'– हेच ज्योतिषी इ. स. दोन हजार पर्यंतचे भविष्य मात्र सहज वर्तवतात, हे बघून आश्चर्य वाटते ! एकजण म्हणतो. 'इ. स. २००१ सालामध्ये भारतीय लोक खरे एनलाइटण्ड झालेले दिसतील.' तर दुसऱ्याच्या मते 'त्या सालापर्यंत अस्पृश्यांचा प्रश्नच राहणार नाही.'– ज्याना कधी साधे पायाखालचे दिसले नाही, त्यानी क्षितिजापलीकडे काय दिसते, ते सांगण्याचे साहस करावे, हे आश्चर्यकारक आहे !

या ज्योतिषांपेक्षा केंद्रमंत्री वसंत साठे अधिक शहाणे दिसतात. नुकत्याच झालेल्या 'गीतरामायणा'च्या रजतमहोत्सवप्रसंगी हे साठेमहाशय म्हणाले : 'गीतरामायणाच्या सुवर्णमहोत्सवसमयी आपणही उपस्थित असावं, अशी इच्छा येथे बहुतेक वक्त्यानी प्रदर्शित केली आहे ते सर्व सुवर्णमहोत्सवाला असतील; पण मी असेनच, असे सांगता येणार नाही. कारण आम्हा राजकारण्याचं काही सांगता येत नाही.'– राजकारणातून डच्चू मिळाल्यावर साठेमहोदयानी आपल्या दुकानावर ज्योतिषाचा बोर्ड जरूर लावावा. व्यावहारिक धूर्त शहाणपणामुळे त्यांचे भविष्य खरे ठरण्याचा संभव अधिक.

## विचार नसलेले जीवन

गेल्याच संसदीय निवडणुकीबाबत नानासाहेब गोरे जे काहीसे उशीराने बोलले, तेही विचार करण्यासारखे आहे. स्वत च्या अपयशाची चिकित्सा करताना ते म्हणाले · 'निवडणुकीला उभे राहा, असा मित्रानी आग्रह धरला, तेव्हाच मी त्यांना म्हटलं की मला निवडणुकीत यश येणार नाही. मला उभ करू नका. माझं सर्व आयुष्य पुण्यात गेलं आहे; पण पुण्याची मंडळी (आता) मला ओळखत नाहीत ही माणसं फक्त जीवन जगतात. त्याना विचार नाही. माझ्यात व त्याच्यात संवाद नाही. म्हणून मला उभं करू नका !'

सुप्रसिद्ध क्रिकेटर विजय मर्चंट अशाच एका सभेत म्हणाले: 'वयाच्या चाळिसाव्या वर्षी मी क्रिकेटमधून रिटायर झालो: मध्ये मला एकदा नर्गिस भेटली. आमची नर्गिस ती तुमची हेमामालिनी. ती मला लिफ्टशी रागेत उभी दिसली. मी त्याच रांगेत तिच्यामागे उभा होतो तेव्हा तिला म्हटले : नर्गिस, माय डिअर, चाळीस वर्षांपूर्वी तू अशी लिफ्टशी आली असतीस, तर पुरुषांनी आणि स्त्रियानीही– तुला वाट करून दिली असती. असं रांगेत उभं रहावं लागलं नसतं. लोकाचं स्मरणं थोडं असतं, हेच खरं आता माझ्या आयुष्याची दुसरी इनिंग सुरू आहे समाजसेवेची. क्रिकेटर्स मानतात की दुसरी इनिंग चांगली जाते. या दुसऱ्या इनिंगनं माझं खरोखरच समाधान केलं आहे.... क्रिकेटमध्ये असा एक सकेत असतो की एका बाजूच्या सबळ बॅटस्मननं दुसऱ्या बाजूच्या दुर्बळ बॅटस्मनची काळजी घ्यावी. तसंच समाजात सबळ घटक आहेत त्यानी दुर्बळ घटकाची काळजी घ्यावी. जर आपण केवळ खत टाकत राहिलो, तर कीडमुंग्याहून आपण वेगळं काय केलं ?' आणि शेवटी 'आयुष्याच्या मोठ्या मैदानावरही आमचा बाप क्रिकेट खेळला, असं माझ्या मुलानी म्हणावं; एवढीच माझी अखेरची इच्छा आहे'

—आणि हे शेवटचेच. मौजच्या श्री. पु भागवताविषयी प्रकाशक-लेखक–सवादाची ही एक झलक : मोकाशीनी 'देव चालले' ही

कादंबरी प्रकाशनार्थ भागवतांच्या हवाली केली, तेव्हा त्यांना मोकाशीनी सहज विचारले : 'आवृत्ती किती‌ची काढता ?'– ते गालात हसून म्हणाले : 'कितीची काढतो, असं तुम्हाला वाटतं ? गारंबीच्या बापूची कितीची आवृत्ती काढली असेल ?'– क्षणभर थांबून 'अकराशेची. आज आठ वर्षे झाली अजून शेदोनशे कॉपीज् शिल्लक आहेत.'– आता भागवताविषयी मोकाशी: 'तीस वर्षांत पावणेतीनशे प्रकाशन, हा काही वेग नाही; पण लहानपणी वाचलेली ससा व कासव ही गोष्ट आठवावी. त्या गोष्टीतलं सशाला जिंकणारं कासव ते हेच ! त्याच कासवानं चालू जन्मी प्रकाशन म्हणून जन्म घेतला!'

अशी आणखी किती म्हणून संस्मरणीय घटनांची नोंद करावी ? त्यांना अन्तच नाही ! 'संध्याकाळचे पुणे' म्हणजे कधी रिता न होणारा खजिना आहे.

अखेरीस काही–वस्तुतः नगण्य अशा–प्रमादाविषयी·

प्रस्तुत निबंधसंग्रहात एक नव्हे तर दोन वेळा एका जगभर गाजलेल्या घटनेचा निर्देश आहे. निर्देश असा की, एका रात्री एका लोकप्रिय अमेरिकन रेडिओवरून मंगळावरच्या माणसानी पृथ्वीवर अमेरिकेत आक्रमण केल्याची भयप्रद वार्ता दिली गेली. ज्यानी ती ऐकली, ते असंख्य अमेरिकन्स नेसत्या वस्त्रानिशी रस्त्यावर येऊन धूम पळत सुटले! ही घटना अगदी शंभर टक्के खरी आहे; पण ही वार्ता नामनिर्देशाविना ज्या कथेत अकस्मात प्रक्षेपित झाली, त्या कथेचा कर्ता होता ऑर्सन वेलेस. मोकाशी म्हणतात त्याप्रमाणे एच्. जी. वेल्स नव्हे. आता ही चूक कशी घडली ? तर कारणे दोन. एक : वेल्स व वेलेस या विशेषनामांच्या उच्चारातील साम्य आणि दोन: अद्भुत कथांचा कारखानदार म्हणून वेल्सची असलेली ख्याती वेल्सने नव्हे, तर लेखक–दिग्दर्शक नट वेलेसने हा थरारक रेडिओप्ले लिहिलेला होता आणि एका मध्यरात्री त्याने अमेरिकाभर धमाल उडवून दिली होती !

प्रस्तुत निबंधसंग्रहातील एक 'पुणेरी संध्याकाळ' दस्तुरखुद्द माझ्या नावे मोकाशीनी खर्ची घातलेली आहे, असे वर आरंभी म्हटलेच आहे. त्यातील माझ्या संबंधातील लेखकाची एक आठवण अशी आहे : 'पारतंत्र्याचा काळ. माधवरावासह चार बंधू एकत्र राहत. पैकी एक भाऊ कम्युनिस्ट. एक हिंदु सभेचा व एक काँग्रेसचा होता. माधव मनोहर याना पक्ष नव्हता; पण या सर्व पक्षांचे उभे दावे होते. स्वयपाकघरात सर्व भाऊ जेवावयास आले की त्या तीन पक्षाच्या भावात वाद सुरू होई. आवाज तर चढतच; पण वाढलेले पान फेकून भाऊ पानावरून उठत. असा प्रकार वारंवार होऊ लागल्यावर माधवरावानी स्वयंपाकघरावर पाटी लिहून ठेवली. आपापले पक्ष बाहेर ठेवून यावे आणि वाद बंद केले.'

वरील किस्सा दंतकथा म्हणून ठीक आहे, पण त्यातील वस्तुस्थितीबाबतचे जवळपास सर्वच निर्देश चुकीचे आहेत. पहिली गोष्ट म्हणजे आम्ही एकूण बंधू फक्त तीनच, चार नव्हेत. पैकी थोरला हिंदू महासभेचा व धाकटा कम्युनिस्ट. थोरला आम्हा उभयतांना वडिलांच्या ठिकाणी. त्याच्या व आमच्या वयात अंतर तसे पुष्कळच. शिवाय तो आम्हा उभयताना शाळेत शिक्षक. तेव्हा त्याच्यासमोर काही राजकीय वाद उकरून काढून बोलायची आमची हिंमतच नव्हती आणि आम्हा उभयताना मते फुटली, तेव्हापासून तो आणि आम्ही दूरच होतो. जेवायच्या वेळी आम्ही एकत्र बोलत नसू. मात्र थोरल्याचा मुलगा हा कित्येक वर्षे मुंबईत माझ्या घरी राहत असे. त्या काळात तो कट्टर संघीय होता; पण त्याच्या आणि आमच्या वयात इतके अंतर की आमच्यासमोर ब्र काढायची त्याची हिंमत नव्हती, म्हणजे राहता राहिलो ते आम्ही दोघेच मी व धाकटा कम्युनिस्ट कॉ. प्रभाकर वैद्य·परवाच्या इमर्जन्सीपर्यंत आम्ही दोघे राजकारणाविषयी कधी चुकून बोलत नसू आणि संयुक्त महाराष्ट्रपर्वात आम्ही दोघे जीवेभावे एकत्र होतो. कोणत्याही पक्षाचे व्यक्तिशः मला कसले म्हणून सोयरसुतक नाही. तात्पर्य एकाच घरात आम्ही चौघे भिन्न पंथी सुखासमाधानाने एकत्र नांदत होतो. बाकी स्वयंपाकघरातील कलह वगैरे मोकाशीचे कपोलकल्पित– परिहास विजल्पित.

माधव मनोहर–श्री. ना. पेंडसे–संबंधावर उपर्युक्त निबंधात एक परिच्छेद आहे त्यातील मध्यवर्ती घटना सांगून झाल्यावर माझा हवाला देणारे शेवटचे वाक्य असे आहे : 'माधव मनोहरांनीच मला हा प्रसंग सांगितला.' या प्रसंगाविषयी मात्र मी सर्वथैव साशंक आहे. माझे स्मरण सहसा चुकत नाही. 'गारंबीच्या बापू'बद्दल तेथे जो निर्देश आहे, तो बरोबर नाही. 'गारंबीचा बापू'च्या पहिल्या आवृत्तीच्या प्रस्तावनेत पेंडशांनी माधव मनोहरांचे खूप आभार मानले. (हेच विधान मुळातच वस्तुस्थिति–विपर्यस्त आहे.) पण त्या कादंबरीची दुसरी आवृत्ती निघाल्यावर आपल्या आभाराच्या ओळी काढून टाकल्याचे माधव मनोहर यांच्या लक्षात आले. (हेही बरोबर नाही कारण मूळ पहिल्या आवृत्तीतच माझे आभार नव्हते. होते ते 'एल्गार'मध्ये) त्याना फार वाईट वाटले आणि ही गोष्ट माधव मनोहरांच्या औदार्यावर व मोकळेपणावर अन्याय करणारी होती.' माझी समजूत अशी आहे की प्रस्तावनेबाबतचे काही एक खरे नाही. मी मोकाशीजवळ बोललो असणार, ते बहुतकरून माझे त्या काळातील अन्तेवासी मित्र आणि अलीकडच्या काळातील भाडारकर रिसर्च इन्स्टिटयूटचे (माजी) डायरेक्टर गो. के. भट यांच्या 'गृहदाह' नाटकाविषयी. त्या नाटकाच्या पहिल्या आवृत्तीची–प्रस्तावना नव्हे, तर–अर्पणपत्रिका मला उद्देशून आहे आणि त्या अर्पणपत्रिकेत लेखकाने अगदी ऊर भरभरून कृतज्ञतापूर्वक माझे आभार मानले आहेत. आता गमतीची गोष्ट अशी की 'गृहदाह'च्या दुसऱ्या आवृत्तीची अर्पणपत्रिका भटांनी लिहिली ती के. नारायण काळे यांना उद्देशून आणि अर्थातच पहिली अर्पणपत्रिका रद्द करून. असाच काहीसा अशिष्ट प्रकार फडक्यांनी आपल्या 'प्रतिभासाधन'च्या दोन भिन्न आवृत्त्यांच्या अर्पणपत्रिका दोन बायकांच्या नावे लिहून केला आहे, हे तज्ज्ञास ज्ञात असावे !

उपर्युक्त प्रमाद हे अर्थातच क्षम्य आहेत; पण प्रमाद क्षम्य असले, तरी वेळीच त्यांचा निरास करणे श्रेयस्कर या हेतूने हे सर्व लिहिणे आले. आता सरतेशेवटी वाचकाना प्रार्थना एवढीच की त्यानी हे अतिम प्रमाददर्शन विसरावे आणि तत्पूर्वोक्त जी मोकाशीग्रंथप्रशस्ती आहे ती ध्यानी वागवून या 'सध्याकाळच्या पुण्या'त उल्हसित चित्ताने प्रवेश करावा. कारण या सायंकालीन पुण्यनगरीचे रंगढंग मनस्वी आकर्षक आहेत. वस्तुतः पन्नास पुस्तकाच्या कर्त्याला आपल्या नव्या पुस्तकासाठी कोणाच्या प्रस्तावनेची गरज भासू नये; पण मोकाशीचा माझ्यावर लोभ आहे आणि तो लोभ वृद्धिंगत करण्यासाठीच मी हा सर्व प्रस्तावनाप्रपंच केला, असे कोणी म्हणणार असेल तर त्याला माझी ना नाही. होय. केला. हे तर खरेच आहे आणि तुकारामाने म्हटले आहे, 'ऐसी कळवळयाची जाती। करी लाभाविण प्रीती।' हे पण खरेच आहे. प्रीतीत लाभाची अपेक्षा नसावी; पण लोभाची अपेक्षा मात्र जरूर असावी. नव्हे काय ? □

['माणूस'मधून दि बा. मोकाशी यानी लिहिलेल्या 'संध्याकाळचे पुणे' या ललित लेखाचा संग्रह चालू आठवडयात पुस्तकरूपाने प्रसिद्ध होत आहे या संग्रहाला लिहिलेली ही प्रस्तावना. प्रकाशक : इनामदार बंधू, पुणे.]

# एका प्रदर्शनाच्या निमित्ताने

सतीश कामत

२५ जानेवारी. पुण्यातल्या रेसकोर्सजवळचा एक मोठा हॉल. बाहेर आधुनिक काळातल्या श्रीमतीच लक्षण मानल्या जाणाऱ्या देशी-परदेशी बनावटीच्या अनेक गाड्या झुलत होत्या. दारावर दोन ट्राफिक पोलीस. गाड्यांच्या मालकांना सलाम ठोकण्यासाठी.

हॉलच्या दारात उभं राहूनच आतमध्ये नजर टाकली. निरनिराळ्या जातीची सुंदर कुत्री इतस्ततः पहुडली होती–गळ्यातल्या पट्ट्याचं दुसरं टोक आपल्या मालकाच्या हाती निर्धास्तपणे सुपूर्द करून. आज या ठिकाणी इंटरनॅशनल केनेल क्लबच्या वतीनं 'श्वानप्रदर्शन' आयोजित करण्यात आलं होतं.

अल्सेशियन, ग्रेट डेन, पामेरियन, बॅसेट हाउंड, डॉबरमन, डाल्मेशिअन, बुल टेरिअर, लॅब्रॅडोर इत्यादी वीस जातींची सुमारे शंभर कुत्री या प्रदर्शनात दाखल झाली होती.

आदल्या दिवशी कुत्र्यांची शारीरिक तपासणी, आज्ञापालनचाचणी, फॅशन परेड इत्यादी प्रकारच्या विविध स्पर्धा झाल्या. आज या ठिकाणी 'बेस्ट ऑफ द शो' निवडण्यात येणार होता. तसंच विविध जातीच्या उत्तम कुत्र्यांना जातीनिहाय पारितोषिक देण्यात येणार होती.

हॉलमध्यं आणि हॉलच्या भोवताली फेरफटका मारला. जिकडे पाहावं तिकडे विविध जातीची, रंगाची आणि आकारांची एकाहून एक सुंदर कुत्री! कुणाचे पडलेले कान तर कुणाचे लांब पाय, कुणाचा भक्कम जबडा तर कुणाचं झुबकेदार शेपूट, गायीचं वासरू वाटावं अशी एखाद्याची लांबी-रुंदी, तर मांजरही मोठं वाटावं अशी एखाद्याची आकृती; पण प्रत्येक जण आपापल्या परीनं अतिशय सुंदर आणि आकर्षक दिसत होतं. कुणाला मालक कुरवाळत बसला होता, तर कुणी आपल्या कुत्र्याला नोकरावरच सोपवून दिलं होत.

काही कुत्र्यांची पिल्लं हॉलमध्ये विकण्यासाठीही ठेवलेली होती. एकेका पिल्लाची किंमत दीड-दीड दोन-दोन हजार रुपये होती, म्हणे. कुत्र्यांच्या साखळ्या, पट्टे, बॉडी–बेल्टस, त्यांना लागणारी औषधं आणि टॉनिकं यांचीही विक्री करणारे स्टॉल्स उभारले होते. या सगळ्याच्या पार्श्वभूमीवर हॉलमधल्या कुत्र्यांचे भुंकण्याचे आवाज. सगळं वातावरण 'श्वानमय' झालं होतं.

प्रदर्शनात दाखल झालेल्या कुत्र्यांना नंबर दिलेले होते आणि स्पर्धा घेताना त्या नंबराचाच पुकारा केला जात होता. अर्थात नंबर लिहिलेल्या चिठ्ठ्या मात्र कुत्र्याऐवजी त्यांच्या मालकाच्याच गळ्यात अडकवलेल्या होत्या. कुत्र्याने चावून फाडल्या तर?

आज्ञापालनाची चाचणी गमतीदार होती. काही कुत्री सर्कशीतल्या जनावरासारखी 'बैठ जा–बैठ गई–खडी हो गई' थाटात अतिशय आज्ञाधारकपणे वागत होती. काही खट्याळ कुत्री मात्र मालक सांगेल त्याच्या अगदी उलट कृती करून मालकाचाच फज्जा उडवत होती–घरातल्या लहान मुलाला शाळेत शिकवलेली कविता पाहुण्यांसमोर म्हणून दाखवायला सांगितली की, ते जसं एकदम सिनेमातलंच गाणं सुरू करत तसं!

फॅशन परेडमध्ये छोट्या छोट्या, दिखाऊ (शो डॉग) कुत्र्यांना रंगीबेरंगी कपडे, डोक्याला टोपटी-कुंचडी घातलेली होती आणि तीही आज हे आपल्या अंगावर मालकानं काय चढवलंय आणि ते किती काळ ठेवलं जाणार आहे, अशा चिंताग्रस्त चेहऱ्यानं इकडं तिकडं पाहात होती.

या दोन्ही प्रकारात प्रत्यक्ष कुत्र्यांना स्वारस्य कितपत होतं कुणास ठाऊक! बऱ्याचशा कृती ती यांत्रिकपणे, काहीशा अगतिकपणानही करत होती.

प्रदर्शनातल्या स्पर्धांच्या पारितोषिकवितरणासाठी पुण्यातल्या सदर्न कमांडचे प्रमुख लेफ्टनंट जनरल आर. डी. हिरा प्रमुख पाहुणे होते. त्यांच्या पत्नी सजनी हिरा यांच्या हस्ते पारितोषिकं देण्यात आली. माइकवरून कुत्र्याच्या नंबराचा पुकारा झाला की, त्याचा मालक त्याला घेऊन, त्याच्यापेक्षाही जास्त दिमाखानं चालत येई व सौ. हिरा यांच्याकडून पारितोषिक घेई पारितोषिक मिळालेल्या काही कुत्र्यांचे मालक मात्र वादस्पर्धेत किंवा नाट्यस्पर्धेत आपल्याला काही नंबर मिळणार नाही, या खात्रीनं लगच बॅगा उचलून परतीची वाट पकडणाऱ्या स्पर्धकासारखे आपापली कुत्री घेऊन आधीच निघून गेले होते. गमत म्हणजे सगळ्यात आकर्षक आणि प्रतिष्ठेची ट्रॉफी मिळालेल्या कुत्र्याच्या मालकाचाही यामध्ये समावेश होता.

पारितोषिकवितरण संपलं. काहीजण विजयी मुद्रेनं, अनेकजण पडेल चेहऱ्यानं आपापल्या कुत्र्यांना घेऊन हॉलबाहेरच्या गाड्यांमध्ये येऊन बसले. धुरळा उडवत गाड्या दिसेनाशा झाल्या.

¤

परवा एका पुस्तकाच्या दुकानात होतो तेव्हा अचानक एक अतिशय आकर्षक पुस्तक समोर आलं– 'The Super book of Dogs.' बेल्जियमच्या मॅक्डोनाल्ड एज्युकेशनल लिमिटेडच प्रकाशन. पुस्तक हातात घतलं, थोडस चाळल आणि विकतच घेऊन आलो. कुत्र्याच्या उत्पत्तीपासून तर त्याच्या अत्याधुनिक जातीपर्यंत विविध प्रकारची माहिती पुस्तकात रंगीत छायाचित्रासह दिलेली होती.

कुत्र्याची आणि माणसाची गट्टी केव्हा जमली याबद्दल पुस्तकात म्हटलं होतं की एका जुन्या दंतकथेत असं सांगितलं आहे की हजारो वर्षांपूर्वी पृथ्वीची निर्मिती होत असताना ती अचानक दुभंगली. त्या वेळी मानवजातीचा प्रणेता ॲडम पृथ्वीच्या एका बाजूला राहिला आणि अखिल प्राणीसमाज दुसऱ्या बाजूला. एवढ्या त्या समाजातल्या एका प्राण्याने पृथ्वी दुभंगत असतानाच ॲडमच्या बाजूला उडी मारली. तो प्राणी म्हणजे श्वानमहाशय. नि.स्वार्थी प्रेमाची याहून फक्कड गोष्ट तुमच्या तरी वाचनात आली आहे काय?

हळूहळू मनुष्यजीवन सुरू झालं. अर्थात सुरुवातीच्या काळातला कुत्रा क.ही आजच्या आपल्या घरातल्या पाळीव कुत्र्यासारखा गोंडस नव्हता. तो जवळजवळ कोल्हा किंवा लांडग्यासारखाच दिसत असे. त्या काळात मनुष्य जंगलातच राहायचा आणि हा कुत्रा रात्रीच्या वेळी मनुष्यवस्तीच्या आसपास माणसानं टाकलेलं काही खाद्य मिळेल या आशेनं हुंगत हुंगत यायचा. खायला मिळालं तर तिथंच घुटमळायचा. आपल्याला हा सोबती बरा आहे, हे माणसाच्याही हळूहळू लक्षात यायला लागलं. शिवाय शिकार करण्यासाठीही त्याला या सोबत्याची मदत होऊ लागली. एखाद्या प्राण्याचा वेगानं पाठलाग करून कुत्रा त्याला माणसाच्या किंवा बाणाच्या टप्प्यात आणून देत असे आणि मग

शिकारीचा काही हिस्सा कुत्र्यालाही मिळत असे. यातूनच दोघांची गट्टी जमली असावी.

यानंतर राखण व शिकारीबरोबरच मालकावर भयानक प्रसंग गुदरल्यास कुत्रा त्याची सुटका करू लागला. मी चाळत होतो त्या पुस्तकात एक चित्र होतं. पुलाच्या कठड्यावरून एक लहान मुलगी तोल जाऊन खाली नदीत पडत होती; पण तिच्या कुत्र्यानं तिचा फ्रॉक तोंडात असा काही घट्ट पकडला होता की ती हवेतच तरंगत राहिली आणि मग इतरानी तिला वर ओढून काढलं. १९१४ सालच्या एका मासिकात हे चित्र आलेलं होतं, तेच या पुस्तकात दिलेलं आहे.

माणसाप्रमाणेच कुत्र्याचेही पूर्वज अतिप्राचीन काळात झाडावरच राहात असत, असं वंशशास्त्रज्ञानी सांगितलं आहे. सुमारे पन्नास दशलक्ष वर्षांपूर्वी 'मिॲसिस' हा कुत्र्यामधील पहिला 'ॲडम' किंवा 'मनू' होऊन गेला. तेव्हापासून श्वानजमातीच्या विकासाची वाटचाल होत आली आहे. स्थल-काल आणि हवामानानुसार त्याचे आकार, रंग, रूप बदलत राहिलं आहे. सगळयात लहान आकाराच्या, पूर्ण वाढलेल्या कुत्र्याची खांद्याजवळची उंची पाच इंच असते, तर वुल्फ हाउंडसारखा कुत्रा पूर्ण वाढल्यावर सुमारे तीन फूट उंच होतो. कुत्र्याचं आयुष्यमान साधारणत आठ ते बारा वर्षं इतक असतं; पण लॅब्रेडॉर जातीचा एक कुत्रा २७ वर्षं चार महिने जगल्याची इतिहासात नोंद आहे.

आपल्या हद्दीत हिंडत असताना मागलं तंगडं वर करून आपल्या अस्तित्वाची नोंद करून ठेवण्याची सवय सर्वच कुत्र्यांना असते. कोणताही पाळीव कुत्रा हिंडता हिंडता ५० ते १०० वेळी ही नोंद करतो.

कुत्र्याची दृष्टी किंवा श्रवणशक्तीपेक्षाही त्याची घ्राणेंद्रियं जास्त तिखट असतात. आपला शंभर यार्ड अंतरावर गवतात लपलेला मालकही कुत्रा डोळे किंवा कानापेक्षा नाकानेच शोधून काढू शकतो.

कुत्री अनेक वेळा भुंकतात. बऱ्याच जणांची अशी समजूत असते की ती काही तरी बोलत असावीत; पण भुंकण्यातून कुत्र्याच्या फारशा प्रतिक्रिया व्यक्त होत नाहीत. कुत्रा आपले कान, ओठ, शेपूट आणि डोळे याच्या हालचालीमधूनच बहुतेक सर्व भावना व्यक्त करत असतो. टक लावून पाहणारा कुत्रा समोरच्याला आव्हान देत असतो, तर नजर चुकवणारा किंवा शेपूट खाली करून चालत येणारा कुत्रा शरणागती स्वीकारत असतो. कुत्र्याचे कान ताठ असणं हे त्याच्या आत्मविश्वासाच चिन्ह असत. तो प्रेमात आला तर कान खाली पडतात आणि घाबरला तर ते थोडे मागे खेचले जातात. कुत्रा रागावला तर त्याच्या पाठीवरचे केस एकदम ताठ होतात आणि तोंडाची जिवणी नेहमीपेक्षा खूपच मागे खेचली जाते.

एखाद्या झाडापाशी कुत्र्याला नेणं म्हणजे प्राणिविश्वातलं मोठं संदर्भग्रंथालय त्याच्यापुढं खुलं करण्यासारखं असतं. कारण त्या झाडाचा व भोवतालचा परिसर नुसता हुंगला की त्या ठिकाणी याआधी किती प्राणी येऊन गेले, ते कोणत्या लिंगाचे व वयाचे होते, त्यांच्यापैकी कितीजण उपाशी होते किंवा पोट भरलेले होते आणि कोणते प्राणी जखमी किंवा आजारी होते हे त्या कुत्र्याला समजू शकतं.

कुत्र्याच्या या विविध गुणाचा माणसानं स्वत च्या जीवनात चांगलाच वापर करून घेतला आहे. दक्षिण ध्रुवावर सर्वप्रथम पाय ठेवण्याचा मान मिळविणाऱ्या रौल्ड ॲमंडसेननं (१८७२–१९२८) आपल्या या मोहिमेत ५२ कुत्र्याची एक फौजच वापरली. त्याच्यानंतर थोड्याच दिवसानी पोचलेल्या कॅप्टन रॉबर्ट स्कॉट (१८६८ ते १९१२) याने मात्र कुत्र्याऐवजी तट्टू वापरून सामानाची वाहतूक केली; पण यामध्ये ती तट्टं अगदीच कुचकामी ठरली व स्कॉट आणि त्याच्या साथीदाराना स्वतःच बरेचसं सामान ओढून न्यावं लागलं.

पहिल्या महायुद्धाच्या काळात जर्मनीने विविध कामांसाठी सुमारे २८ हजार कुत्री वापरली. यातील बहुसंख्य कुत्री जवानाबरोबर प्रत्यक्ष आघाडीवर होती आणि त्यामुळं तीही खंदकात 'मास्क' चढवून बसायची. दुसऱ्या महायुद्धात बॉबहल्ले झाल्यावर उद्ध्वस्त झालेल्या ठिकाणी ढिगाऱ्याखाली सापडलेल्या माणसांचा शोध घेण्यासाठीही कुत्र्याचा फार मोठ्या प्रमाणावर वापर करण्यात आला आणि यामध्ये उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल एका कुत्र्याला सुवर्णपदकही देण्यात आलं!

आधुनिक काळात कुत्र्याला हवाईछत्र्याच्या सहाय्यानं एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी पाठविण्याचाही उपक्रम सुरू झाला आहे; पण त्याचा याहूनही विधायक उपयोग म्हणजे अंधाना सुरक्षितपणे वावरण्यासाठी मार्गदर्शन करणे हा होय. रस्त्यावरच्या अनेक अडथळ्यांमधून अंध व्यक्तीला नीट, कोणताही धक्का लागू न देता पुढे नेण्याचं काम कुत्री चोखपणे बजावतात.

अल्सेशिअन व लॅब्रेडोर रिट्रीव्हर या दोन जातींची कुत्री या कामासाठी सर्वांत जास्त उपयोगी पडतात. अर्थात त्यासाठी त्याना दहा महिन्याचं प्रशिक्षणही दिलं जातं. अशा स्वरूपाचं एक प्रशिक्षणकेंद्र या शतकाच्या सुरुवातीलाच (१९१६) जर्मनीमध्ये सुरू झालं आणि मानव व कुत्र्याच्या स्नेहामधील एका नव्या अध्यायाला सुरुवात झाली.

□

श्वानजमातीच्या वाटचालीची ही सर्व माहिती वाचत असताना प्रदर्शनातील विविध कुत्र्यांचे चेहरे माझ्या डोळ्यांसमोर सारखे येत होते. जबरदस्त प्रेम आणि आत्मविश्वास यापेक्षाही बहुतेक चेहऱ्यावर लाचारी, अगतिकता आणि असहायतेच्याच खुणा अधिक स्पष्ट होत्या. माणसाच्या हरघडी उपयोगी पडणाऱ्या आणि जिवाला जीव देणाऱ्या या प्राण्याला माणसानं मात्र शोभेची आणि करमणुकीची वस्तू बनवलं होतं. The Man and The Dog या नात्यापेक्षाही The Master and His Dog हे नातं क्षुद्र मनोवृत्तीच्या माणसाला जास्त प्रिय वाटत होतं. प्रदर्शनासाठी आलेल्या त्या कुत्र्यांना कोणतंही भौतिक सुख कमी मिळत नव्हतं. अगदी असंख्य माणसंसुद्धा ज्याला बऱ्याचदा वंचित असतात अशी car-ride ही कुत्री रोज सकाळ-संध्याकाळ अनुभवत असतील; पण आपल्या मालकाचं प्रेम त्याना मिळत नव्हतं. कारण मालक त्याना आपला मित्र मानायलाच तयार नव्हता! 'प्रदर्शनासाठी पाळलेली आणि तयार केलेली शोभेची वस्तु' एवढीच या कुत्र्याची त्याच्या लेखी किंमत असावी!

प्रदर्शनात भाग घेणारे अनेक मालकगण यावर असं म्हणतील की हे सर्व खोटं आहे, साफ चुकीचं आहे. नात्यातल्या माणसावर आम्ही जेवढं प्रेम करतो तितकच प्रेम आमचं या मुक्या जनावरावरही असतं. हे क्षणभर खरं मानू; पण मग माझी त्याना एकच विचारणा राहील की, पुढल्या वर्षीपासून श्वानप्रदर्शनाबरोबरच निरनिराळ्या हॉलमध्ये जवळच्या नात्यातल्या (पती, पत्नी, मुलगी, मुलगा, काका, मामा इत्यादी) माणसाचीही प्रदर्शनं भरवायला काय हरकत आहे? □

श्यामचा ससार (कथा–१)

फिरोझ रानडे

# आणखी एका 'तलवारी'चा किस्सा

श्यामने आपला रजेचा अर्ज साहेबांसमोर ठेवला व साहेबांनी तो वाचला न वाचला तोच ते अगदी पोट धरधरून हसू लागले. बाकी प्रान्ताचे लोक व मराठी लोक, यांत बरेच फरक आहेत. त्यातला एक महत्त्वाचा म्हणजे पोट धरधरून हसण्याची क्रिया फक्त मराठी लोकच करतात. साहेब मराठीच असल्यामुळे त्यानी पोट धरून हसणे स्वाभाविकच होते; पण त्यामुळे श्याम मात्र बुचकळ्यात पडला.

साधारणपणे हाताखालच्या माणसाने रजेचा अर्ज दिला की साहेबाच्या मनात 'ह्या लोकाना कामाचे महत्त्व कसे कळत नाही बुवा' वा 'काय परत रजा?' असे विचार मनात येऊन जातात व त्याचा चेहरा, राग, तिरस्कार वगैरे रसानी न्हाऊन निघतो असा सर्वसामान्य नोकरी करणाऱ्याचा अनुभव असतो. श्यामचाही अनुभव तसाच होता व त्याच रसाची तो अपेक्षा करत होता. त्यामुळे साहेबबहाद्दर एवढे हसताहेत हे पाहून श्यामच्या मनात कुतूहल व काळजी हे रस निर्माण होऊ लागले; पण साहेबाप्रमाणे हाताखालच्या लोकाना 'रस–स्वातंत्र्य' नसल्यामुळे श्याम त्या भानगडीत न पडता नेहमीप्रमाणे ओशाळवाणे हसत उभा राहिला.

पण थोड्याच क्षणात साहेब काही मोठ्या कौतुकाने हसत नाही आहेत हे त्याच्या ध्यानात आले. काय झाले असावे? काही spelling mistake तर नसावी म्हणजे leave च्या ऐवजी live वगैरे; पण श्याम व साहेब बाळासाहेब खेराचे विद्यार्थी असल्यामुळे इंग्रजीतल्या चुका साहेबाच्या लक्षात येणे शक्य नाही ह्याची श्यामला खात्री होती. म्हणजे आपण ज्या कामाकरता अर्ज केला आहे त्यालाच साहेब हसताहेत अशी श्यामची खात्री झाली व तो खजिल होत चालला.

साहेब हसू आवरण्याचा प्रयत्न करत होते पण ते त्यांच्याच्याने आवरेना. साहेबाचे हसणे ऐकून त्याचा चतुर्थ श्रेणीतला सहकारी सखाराम–पण खोलीत येऊन उभा राहिला. त्याच्या आतापर्यंतच्या इग्रज व 'इंडिया' सरकारच्या चाळीस वर्षांच्या सेवेत त्याने कोणत्याही साहेबाना हसताना निदान असे गडगडा हसताना कधी पाहिले नव्हते. त्यामुळे सखारामाच्या मनात कुतूहल रस निर्माण होऊ लागला होता; पण तोंडात रसदार पान असल्यामुळे त्याला तो रस मोकळेपणे तोंडावर आणता येईना.

आता मात्र श्यामची मोठीच पंचाईत झाली. त्याला आपली ही रजेची बाब जास्तच जास्त गुप्त ठेवावयाची होती म्हणून तो अधल्या–मधल्या साहेबाच्या 'थ्रू' न येता तडक मोठ्या साहेबाकडे आला होता. त्याला खात्री होती की कामाचे कारण ऐकताच साहेब त्याची पाठ थोपटतील व साधारणपणे राज्याचे मुख्यमंत्री जी कामे करतात ती आपल्या हाताखालचा माणूस करू बघतो आहे हे बघून त्याना अभिमान वाटेल!

रजेचे कारण होतेच तसे भक्कम! गेले दोन महिने तो ह्या विषयावर विचार करत होता. वाचनालयातून ह्या विषयावरची पाच–पंचवीस पुस्तकेपण त्याने वाचली होती. एक-दोनदा इतिहास संशोधन मंडळात जाऊन जुन्या व जाणत्या लोकांशी त्याने चर्चा केली होती, पण त्यामुळे त्याचे विचार स्पष्ट होण्याऐवजी जास्तच धूसर झाले होते. त्यामुळे त्याने तो विचार सोडला व फक्त लेखी पुराव्यावरचे आपले मत नक्की करावयाचे ठरवले.

आपल्या पूर्वजांबाबत आपलीही काही जबाबदारी आहे व ती पार पाडणे हे आपले परम कर्तव्य आहे ह्या भावनेने तो हे काम करत होता. काम तसे सोपे पण प्रसिद्धी भरपूर अशा तऱ्हेचे असल्यामुळे श्यामच उल्हास द्विगुणित झाला होता व त्या दुप्पट उत्साहात त्याने रजेचा अर्ज कारणासहित साहेबापुढे ठेवला होता. त्याची खात्री होती की, साहेब नुसती रजा मजूर करून थांबणार नाहीत तर वर त्याचे कौतुक करून येता येता एखादी तीर्थयात्रा करून या असा सल्ला देऊन उत्तेजनही देतील; पण कसले काय नी कसले काय? साहेब त्याला उत्तेजन देण्याऐवजी स्वतःच उत्तेजित होऊन हसत राहिले होते.

श्यामला वाटले की जर आपण अल्पसंख्याकाचे प्रतिनिधी असतो वा आपली जात मागासवर्गाच्या यादीतली एक असतो किमान ह्या वर्षी तरी आपण अपग असतो, तर साहेबाची अशी कुत्सितपणे हसण्याची हिंमत झाली असती का? ह्या कल्पनेने खरे म्हणजे त्याला राग यावयास पाहिजे होता; पण साहेबासमोर राग कसा आणणार? म्हणून त्याने दुःख आणले. आता पुढे काय करावे असा त्याला प्रश्न पडला.

सुदैवाने तो प्रश्न साहेबांनीच सोडवला. हसत असतानाच त्यानी सखारामाला श्यामला बाहेर घेऊन जा म्हणून खूण केली व श्याम व सखाराम दोघेही बाहेर पडले. आता section मध्ये काय होणार ह्याचे स्पष्ट चित्र श्यामच्या डोळ्यासमोर उभे राहिले. तो पुढे व सखाराम मागे अशी दिंडी section मध्ये येताच कचेरीतले सर्व सभ्य स्त्री-पुरुष आपआपली कामे सोडून त्याच्याकडे बघू लागली. श्यामच्या चेहऱ्यावरून साहेबाच्या रूममध्ये काय झाले असावे ह्याचा कोणालाच अंदाज बांधता येईना. ज्याची काही वर्षे नोकरीत गेली आहेत त्याना साहेबाच्या खोलीच्या बाहेर पडणाऱ्या माणसाचा चेहरा 'हरापन्' लिपीसारखा असला तरी तो घडाघडा वाचता येतो याचा अनुभव असेलच.

बरे सखारामाच्या चेहऱ्यावरून काही अदाज करावा तर त्याचा चेहरा T.V. च्या बातम्या सांगणाऱ्या बायामाणसांसारखा! निर्विकार! थोडी माणुसकी दिसते ती 'बातम्या संपल्या' ह्या वाक्याला. त्याला हाताने खूण करून काय झाले विचारले तर तो हातानेच काय कळत नाही बुवा, हे उत्तर देता झाला! काही बोलायला त्याला तोंड कुठे होते?

श्यामला आपल्या टेबलाशी सोडून सखाराम कचेरीच्या १२ मजल्यावरून बिनदिक्कतपणे पान थुकून परत श्यामकडे आला. तोपर्यंत श्यामचे सहकारी त्याच्या टेबलाशी जमले होतेच. त्याच्या पुढे घुसून त्याने श्यामला विचारले, 'शेठ, काय कागद दाखवलात हो साहेबाना ? साहेब आपले हसतच राहिले. काय झाले सागा तरी !'

सर्व सहकाऱ्याना आता श्यामने साहेबाना काही कागद दाखवला व ते खूप हसले, एवढे ज्ञान झाले; पण कागद कसला ? व साहेब का हसला ? हे प्रश्न अनुत्तरित राहिले. आता साहेब काही कागद बघून हसणार म्हणजे एक तर त्याच्या बढतीची ऑर्डर किंवा त्याच्या वरल्या साहेबाना 'डच्चू' मिळाल्याची ऑर्डर हे होत. पण असे कागद श्यामकडे येण्याचा सुतराम संभव नव्हता. मग कसला कागद असेल बरे ?

एखादा मराठी विनोदी लेख असावा का ? पण हल्ली प्रमुख मराठी विनोदी लेखक फक्त 'एकसष्टया' वर तावच्या ताव लिहितात हे सर्व सहकारी जाणून होते व मराठी विनोदी लेखक झाला म्हणून काय झाले ? एका कागदावर करून करून किती विनोद करणार ? म्हणजे ती शक्यताही बाद झाली. आता त्याचे डोळे व कान श्यामकडे लागले होते.

'आपले मराठी लोकाचे नशिबच असे...' एवढेच श्याम म्हणाला व त्याचा चेहरा वर्णन न करता येण्याजोगा झाला. बाकी सहकारीही मराठी असल्यामुळे 'आपले मराठी लोकाचे नशीब म्हणजे– खतरुड' हे सर्वांस लगेच पटले. ज्या काही अपग माणसाच्या हाताच्या बोटावर मोजता येण्याजोग्या गोष्टीत मराठी माणसाचे एकमत होते त्यात 'मराठी माणसाचे नशीब-खतरुड हे पहिल्या बोटावर यावे !' असो.

तेवढ्यात जेवणाची वेळ झाल्यामुळे सर्व सहकारी तातडीने निघून गेले. सहकाऱ्याच्या सुखदु:खाच्या चौकश्या कचेरीच्या कामाच्या वेळात करावयाच्या, जेवणाच्या वेळात नाही हे तत्त्व अनुभवी लोकांना चटकन पटावे. जाताना चेहऱ्यावर आवश्यक तेवढे दु:ख सर्व सहकाऱ्यानी आणले होते हे सागणे नकोच.

खरे म्हणजे श्यामने 'मराठी लोकाचे नशीब खतरुड' म्हटल्यावर सर्वांनी दु:खाने हुंकार दिला असला तरी त्याना मनातल्या मनात श्यामचे नशीब खतरुड निघाल्याबद्दल आनंदच झाला होता. त्याचा होरा असा को, श्यामने बाहेरच्या कोठल्या तरी डिपार्टमेंटमध्ये वरच्या जागेकरता अर्ज केला असावा व तो साहेबानी हसण्यावारी नेला असणार असा होता. साहेबानी केले ते योग्यच होते असे वर त्याचे मत !

त्या 'खतरुड' रसातच श्यामने उरलेला वेळ काढला. नाही म्हणायला त्याने एकदोनदा मोठ्याने सुस्कारे सोडले; पण त्यामुळे श्यामने नक्कीच वरच्या जागेकरता अर्ज केला असणार ही भावना पक्की झाली व त्यानी श्यामकडे व त्याच्या दुःखाकडे दुर्लक्ष केले.

कचेरीची वेळ संपली तसा श्यामही बाहेर पडला व योग्य वेळी घरी आला. दार उघडता-उघडता राधाने विचारले, 'का हो तब्येत बरी नाही का ?...' इतके वर्षे संसार करून राधाला किंवा कित्येक स्त्रियाना नवऱ्याला सगळ्यात कोणत्या प्रश्नाचा राग येत असेल तर 'तब्येत बरी नाही का ?' ह्या प्रश्नाने येतो हे त्याना कळत कसे नाही असा प्रश्न श्यामला पडत असे व आताही तसाच पडला; पण तो कोणताही प्रश्न पडण्याच्या मूडमध्ये नव्हता. मग चहा झाला, जेवणे झाली. मग झोपायची वेळ झाली तरी श्याम आपला मुखस्तंभ तो मुखस्तंभच !

रात्री गादीवर पडताच राधाने परत चुकीचा प्रश्न विचारला, 'प्रकृती बरी आहे ना ?' श्याम ताडकन उठून बसला व म्हणाला, 'आमच्या प्रकृतीला काय झाली आहे धाड ? आमचे नशीबच असे....' 'खतरुड !' राधाने वाक्य पुरे केले. मराठी लोकाच्या नशिबाला काय विशेषण लावतात हे त्यांना पक्के माहीत असते. त्याचे वाक्य पुरे करून राधा म्हणाली, 'अहो, पण झाले तरी काय ?'

'अग,. अंतुलेसाहेब शिवाजीमहाराजाची तलवार आणायला विलायतेला गेले होते की नाही ?'

'बरं मग त्याचा आणि मराठी लोकांच्या खतरुड नशिबाचा काय संबंध ? उलट आपल्याला असा मुख्यमंत्री मिळाला ह्याचा अभिमानच वाटायला पाहिजे आपल्या सर्वांना.' अंतुलेसाहेबांचा झुल्फेबाज चेहरा दररोज T. V. वर पाहून पाहून राधाला साहेबाबद्दल आपुलकी वाटू लागली होती.

'पण आम्ही अंतुलेसाहेबांच्या पावलावर पाऊल टाकायला लागलो तर आमचे मराठी लोक आमचे पाय मागे खेचतात.'

'अहो, पण साहेब विमानाने गेले होते. त्याच्या पावलावर पाऊल कसं टाकणार ? समुद्रात पडलात म्हणजे ?' 'मला वाटलंच होतं तू असा भिक्कार विनोद करणार म्हणून. परिस्थितीच गाभीर्य कळलं तर बायको कसली ?' 'Sorry, sorry – पण हे सागा, साहेबांच्या पावलावर पाऊल टाकून तुम्ही काय शिवाजीची दुसरी तलवार आणणार होतात काय ? शिवाजीच्या तलवारी आहेत तरी किती मेल्या ?'

'खामोष !' श्याम गरजला 'महाराजाच्या तलवारीना मेल्या म्हणतेस ? त्याची सगळी सेना येथे सज्ज आहे. तुला जर्मनीलाच काय पण माहेरीसुद्धा जाऊ देणार नाही !'

'परत Sorry ! अहो, आमच्या बायकाच्या भाषेत 'मेल्या' कौतुकाने म्हणतात. बरं पुढे ?

'मी विचार केला की साहेब छत्रपतीची तलवार आणताहेत तर आपण पेशव्याची परदेशी गेलेली तलवार आणावी. सुदैवाने आपल्या सगळ्या जुन्या तलवारी आणायला भरपूर स्कोप आहे !' श्याम म्हणाला.

'पण पेशव्यांची तलवार विलायतेत आहे अशी काही अफवा ऐकली नव्हती व अफवा नाही म्हणजे सत्य नाही!' 'विलायतेत नाही ग. पण नेपाळच्या राजाकडे दुसऱ्या बाजीरावाची तलवार आहे व ती आणण्याकरता मला रजा द्यावी असा मी अर्ज केला होता. वाटलं होत साहेब उत्तेजन देतील व म्हणतील की येता येता वाटेत हरिद्वार–हृषिकेशला पण जाऊन या- तशी पद्धतच आहे ! पण कसच काय नि कसच काय म्हणतात ना मराठी माणसाचे नशीबच...' श्याम.

'खतरुड' राधानं वाक्य पुरे केले व म्हणाली 'हे बघा, माझा इतिहासाचा अभ्यास काही जास्त नाही. नेपाळच्या राजाकडली तलवार पेशव्याची असेलसुद्धा; पण असे वाचले आहे की नानासाहेब पेशव्यानतर त्याची बायकामंडळी नेपाळच्या राजाकडे गेली व राजाने त्याना ठेवून घेतले. आता जेथे पेशवाईणीला आश्रय घ्यावा लागला.तेथून तलवार आणण्यात-अगदी अस्सल असली तरी काही स्वाभिमान आहे का ?'

नेहमीप्रमाणे श्यामला बायकोचे म्हणणे बरोबर वाटले. □

एक चर्चासत्र

# हिंदी-मराठी साहित्यातील आधुनिकता

डॉ. मुरलीधर शहा

'...ज्या आधुनिकतेची चर्चा करण्यासाठी आपण येथे जमलेलो आहोत त्या आधुनिकतेची संकल्पना तशी जटिल आहे. ती एकसंधही नाही. अर्थशास्त्र, समाजशास्त्र यामधल्या आधुनिकतेच्या सकल्पनेपेक्षा साहित्यातील आधुनिकतेची संकल्पना मूलत: भिन्न आहे. पाश्चिमात्याचे अंधानुकरण किंवा प्रचड यांत्रिकीकरण, म्हणजे आधुनिकता नव्हे. आधुनिकतेचा विचार करताना काळाचा संदर्भ सर्वात अधिक महत्त्वाचा ठरतो. हा काळ साहित्यात प्रतिबिंबित होत असतो व वाचकापर्यंत आम्हाला त्याची जाणीव पोचवायची असते.. आधुनिकता हा संवेदनेचा एक संस्कार आहे कुठल्या तरी बाह्य लक्षणावरून आपण तिचे रूप ठरवायला गेलो तर ती चूक ठरेल. आजच्या यंत्रप्रधान संस्कृतीत आपण 'यंत्रविद्' आहोत पण 'आत्मविद्' नाही आहोत. नव्या कालबोधावर आधारित संवेदनशीलतेला मी म्हणूनच आधुनिकतेच्या संदर्भात केंद्रस्थानी ठेवून विचार करतो,...

'आधुनिकता सगळ्या गोष्टीना सापेक्ष बनवते. अशा पद्धतीने साक्षेप बनणे म्हणजे काही लोक समजतात तसं मूल्यांचं किंवा मूल्यदृष्टीचं नष्ट होणं नव्हे. 'काल' हीच एक नित्य बदलणारी पण सापेक्ष वस्तू आहे. एकाच वेळी एक काळ आणि अनेक काळ असू शकतात. विज्ञानाने आम्हाला नवा कालबोध दिला आहे. प्रश्नाकुलता ही त्या नव्या कालबोधाचीच निशाणी. विज्ञानाने हे दाखवलं की दिक्कालाचे एक सातत्य आहे. एकाशिवाय दुसऱ्याची ओळख होऊ शकत नाही. काल अनिर्णित आणि अप्रमेय आहे व दिक्‌पुद्धा अनिश्चित आणि या अनिश्चिततेच्या द्वीपावर तुम्ही-आम्ही जगतो-तीच आमची आधुनिकता ..

...'बदलणाऱ्या कालबोधाच्या समस्या समर्थपणे प्रकट होतात कथासाहित्यात. कारण नवी दृष्टी एकीकडे नव्या नजरेने समाजातील यथार्थ पाहाते तर दुसरीकडे जे पाहाते त्याचे संप्रेषण करू इच्छिते. हे संप्रेषण म्हणजेच साहित्य...

'...म्हणून साहित्यात काय किंवा कलामध्ये काय जेव्हा जेव्हा आपण आधुनिकतेची विकासप्रक्रिया बघण्याचा प्रयत्न करू तेव्हा तेव्हा आपल्याला त्याच्या मुळाशी नवा कालबोध, कालाशी असलेला नूतन संबंधच आठवेल.

'-हा संबंध अपरिहार्य मानायला हवा. परिवर्तनाची प्रक्रिया अनुस्यूत मानायला हवी. आधुनिकता नव्याच्या क्षणिक मोहात पडत नाही. काळाशी तिचा संबंध विवेकी व चिकित्सक असतो...'

बोलत होते श्री. सच्चिदानंद हिरानंद वात्स्यायन 'अज्ञेय'. हिंदीचे आतरराष्ट्रीय ख्यातिप्राप्त साहित्यिक.

सांगलीच्या कन्या महाविद्यालयाने यू. जी. सी. च्या सहकार्याने 'हिंदी व मराठी साहित्यातील आधुनिकता' या विषयावर एक परिसंवाद २३-२४-२५ जानेवारीला आयोजित केला होता. सगळ्या देशातून दोन्ही भाषाचे मिळून जवळजवळ १०० कवी, कलाकार, टीकाकार, लेखक व प्रकाशक उपस्थित होते. जवळपासच्या शहरामधले जिज्ञासू, अभ्यासक, प्राध्यापक हजर होते ते वेगळेच.

परिसंवादाचे प्रमुख आकर्षण अर्थातच 'अज्ञेय' होते. साहित्यजगतात त्याचे चाहतेही पुष्कळ व विरोधकही पुष्कळ! स्वभावाने कमालीचे शांत व काहीसे आत्ममग्न राहणाऱ्या या कवीने आपल्या कविता-कादंबऱ्यानी बरीच वादळं उठवली आहेत.या परिसंवादातही चर्चित विषयाव्यतिरिक्त टीकेचे व प्रशंसेचे केंद्र सतत तेच राहिले.

दोन्ही भाषांमध्ये खरे तर 'आधुनिकते' विषयी यापूर्वी खूप चर्वितचर्वण झालेले. तरी वेगवेगळ्या विद्वानाच्या निबंधामधून हाती काय लागते, याविषयी उत्सुकता होतीच.

क्रमाने मराठी विभागात डॉ. श्री. व्य. बोकील यांनी तत्त्वज्ञानाच्या दृष्टिकोनातून आधुनिकतेची चर्चा करताना काही मुद्दे माडले ..'आधुनिकता म्हणजे काय? याचे नेमके उत्तर वैचारिक पातळीवर देणे कठिण आहे. सर्व क्षेत्रातील आधुनिकता जाणवते. तिची योग्य-अयोग्य रूपं कळतात. तरी तिची सुटसुटीत व्याख्या देता येत नाही. आधुनिक शब्द कालवाचक आहे व त्याचा उपयोग व्यक्तिसापेक्ष, परिस्थितिसापेक्ष किंवा घटनासापेक्ष होत असतो. आधुनिक हे विशेषण एकार्थाने खुले विशेषण आहे. विविध संदर्भात आपण त्याचा उपयोग करतो.

'..मूल्याच्या संदर्भात धर्म, ईश्वर, आत्मा, मोक्ष, पुनर्जन्म, अंतिम सत्य इत्यादी कल्पना पूर्णपणे मोडीत निघण्याच्या मार्गावर आहेत. अशा स्थितीत साहित्य, कला, नीती, तत्त्वज्ञान, व्यवहार इत्यादि क्षेत्रातील मूल्ये बदलणे व त्या बदलणाऱ्या मूल्यांच्या संदर्भात अनेक पदरी आधुनिकता येणे हे अटळच आहे. मानवी जीवनातील बदलत्या मूल्याचा वेध म्हणजेच त्या जीवनातील आधुनिकता जाणून घेणे.

'कधी वास्तवाच्या, कधी विज्ञानाच्या, कधी सामाजिक न्यायाच्या जाणिवेमुळे विविध साहित्यप्रकारात निरतर प्रकट होणाऱ्या आविष्काराचा शोध म्हणजे साहित्यातील आधुनिकतेचा शोध होय. मानवी स्वभावातील विकृतीचे साहित्यातील प्रतिबिंब हा सुद्धा आधुनिकतेचाच एक भाग आहे. साहित्यातील परंपरागत मूल्याच्या जागी नवी मूल्ये येणे अपरिहार्य आहे. मूल्याची ही व्याभिन्नता साहित्याला व्यापून टाकते. अशा मूल्याविष्काराची चिकित्सा हेच टीकाकाराचे खरेखुरे कार्य आहे....

'सर्व प्राचीन परंपरा सोडून केवळ आधुनिक मूल्यांचा स्वीकार करता येणार नाही हा प्रश्न तारतम्यानेच सोडवावा लागेल. काही क्षेत्रे म्हणजे विज्ञान, तत्त्वज्ञान, साहित्य, नीती, राजकारण, समाजकारण यातल्या पारंपारिक मूल्याचा निचरा व्हायला हवा, नवी मूल्ये यायला हवीत कलाक्षेत्रात पारपारिकता नव्याच्या स्वागतासकट टिकून राहील. मानवी संस्कृतीचा ठेवा कलेच्या क्षेत्रात अक्षुण्ण

ठेवणे व परंपरेचे श्रेष्ठत्व टिकवून ठेवणे हासुद्धा आधुनिक मूल्याचाच एक भाग आहे !'

डॉ. बोकील यांचा निबंध तात्त्विक पातळीवरून आधुनिकतेची संकल्पना बऱ्याच अंशी स्पष्ट करणारा होता.

दुसऱ्या सत्रात शिवाजी विद्यापीठातील इंग्रजी साहित्याचे प्राध्यापक डॉ. चंद्रशेखर जहागिरदार याचा 'आधुनिकतेचा साहित्याशी संबंध' हा निबंध डॉ बोकिलांनी मांडलेल्या सूत्रांचा मागोवा घेतच पुढे जाणारा होता. डॉ. जहागिरदार याच्या मते 'परंपरेशी नव्या दृष्टीने जोडले गेलेले नाते म्हणजे आधुनिकता होय. आधुनिकतेची काटेकोर व्याख्या केली तर मराठीतले अनेक आघाडीचे लेखक बारगळतील. वस्तुत. आघाडीची आधुनिकता मराठी साहित्यात नाहीच. केशवसुत हा मराठीत आधुनिकतेचा पहिला चरण होय. मर्ढेकरापासून दुसरे युग सुरू झाले. दरम्यान स्वप्नरंजक साहित्याचा सुकाळ होता. १९६० नंतर मराठी साहित्यात जेवढी आधुनिकता दिसली तेवढी तत्पूर्वीच्या शे-सव्वाशे वर्षांत दिसली नव्हती...'

...कालमान व मूल्यमानाचा निकष लावून 'आधुनिकते'ची चर्चा करताना डॉ. जहागिरदार म्हणाले, 'उदासीनता, तटस्थता, निराशा व्यक्त करणारे साहित्य हेच आधुनिक साहित्य आहे का ? याचा विचार करायला हवा मराठी नाटककार व्यक्तीच्या स्वरूपात अधिक विचार करतात. रंगमंचावर दृश्यस्वरूपात आधुनिकता बरीच असते; पण वाङ्मय म्हणून त्यात फारशी संपन्नता आढळत नाही. ग्रामीण साहित्यात तर आधुनिकतेचा पूर्ण अभावच आहे !'

## जुनी चौकट

डॉ. श्यामला वनारसे यांचा 'रुग्ण आधुनिकता : मानसशास्त्रीय बाजू' हा निबंध या तीन दिवसाच्या चर्चासत्रात वाचला गेलेला सर्वांत चांगला निबंध होता. निबंध वाचीत असतानाच त्यानी विवेचित केलेले मुद्दे अंतर्मुख करणारे तर होतेच; पण बेचैन करणारेही होते. '२० वे शतक मनोरचनेच्या दृष्टीने अनेक स्वतंत्र प्रश्न निर्माण करणारे शतक आहे, जीवन विलक्षण वेगाने बदलत असले तरी बदलाचा वेग वेगवेगळ्या समाजात कमी-अधिक आहे. भारतात आधुनिकीकरणाची प्रक्रिया सुरू झाली; पण विचाराची, समजुतीची चौकट मात्र बहुतांशी जुनाटच राहिली. यंत्रसंस्कृतीला आवश्यक असलेल्या बौद्धिक शिस्तीचा स्वीकार पूर्णपणे समाजाने कधी केला नाही. परिणामी परिस्थितिशरणता व अनेक बदलांशी मिळते घेण्यासाठी निर्माण होणारे अंतर्विरोध, ही या समाजाची व्यवच्छेदक लक्षणे ठरली.

'ज्ञानाच्या क्षेत्रातील व्यवहाराचे नियंत्रण पारंपारिक आदेश करीत राहिले. परिणामी शिक्षणसंस्थेची चळवळ विज्ञान व तंत्रविद्येकरता पश्चिमेवर अवलंबून राहिली.

'कलेच्या क्षेत्रातील निर्मितिक्षम व्यक्तीवर दुहेरी स्वरूपाचे ताण आले. एक कलापरंपरेच्या प्रश्नातून उद्भवणारे, दुसरे आर्थिक विवंचनेपोटी निर्माण होणारे. असे ताण केवळ निर्मितिक्षम व्यक्तीपुरतेच मर्यादित राहिले नाहीत. 'भावे'च्या संदर्भात रसिक व समीक्षक यानाही त्यानी गुरफटून टाकले आहे.

'लोकसत्ता व पैशाचे मूल्य या दोन कल्पनांचा भारतीय जीवनात स्वीकार केवळ पेहरावाच्या पातळीवर झाला आहे. त्याच्या मुळाशी असलेले श्रमप्रतिष्ठेचे मूल्य अद्याप स्पष्ट झालेले नाही.

'सर्व प्रकारचे केंद्रीकरण व अतिरेकी रूपकतेमुळे शहरातून शारीरिक पातळीवर काही ताण उत्पन्न होत गेले. आर्थिक ओढग्रस्तीमुळे कामजीवन, पालकत्व आणि वडीलधाऱ्याशी संबंध याविषयीच्या जटील समस्या निर्माण झाल्या. या सर्व भूमिकाचे आशय बदलण्याचे परिस्थितीचे आव्हान जिव्हारी झोबणारे ठरले !'

आधुनिक साहित्यातील व्यक्ती व त्याच्या कृती याचे तरी परस्पर संबंध कशा प्रकारचे आढळतात ? साहित्यनिर्मिती कोणाला काय सांगण्यासाठी केली जाते, याची आकलनव्यवस्था कोणती आहे ? या प्रश्नाचा शोध घेताना काही घटक विचारार्थ समोर ठेवून डॉ. वनारसे यानी निबंध संपवला होता. अगदी सलग, मुद्देसूद व गंभीर चर्चा झालेले ते एकमेव सत्र होते.

डॉ सुधीर रसाळ यानी 'मराठी काव्यातील आधुनिकते'चा परामर्ष घेतला होता '१९ व्या शतकात सुरू झालेल्या आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेचे स्वागत पूर्णांशाने केशवसुतांच्या कवितेत आढळते. केशवसुत पूर्वकालीन व समकालीन कविता आधुनिकीकरणाला विरोध करणारी होती. केशवसुतांची मूर्तिभंजक आधुनिकता मराठी कवितेत स्थिरावू आणि विकसित होऊ शकली नाही. याचे कारण पुनरुज्जीवनाबरोबर अधिष्ठित असलेल्या राष्ट्रवादाचा उदय होय. टिळकयुगात ही आधुनिक प्रवृत्तीची फार मोठ्या प्रमाणावर गळचेपी झाली. रविकिरण मंडळाची कविता म्हणजे बाह्यत: आधुनिकतेचा पुरस्कार; पण छुपेपणाने परंपराप्रियतेचे पालन. केशवसुत व बी कवी वजा केले तर परंपरावादाची प्रच्छन्न वृत्ती मराठी काव्याच्या बुडाशी सतत राहिली. आधुनिक स्थिर मूल्याचे प्रकटीकरण मर्ढेकराच्या कवितेपासून सुरू झालेले असले तरी आजची एकूण कविता नकाराची कविता ठरते. तिच्या एका स्तरावर भविष्यकालीन जीवनाचा भेडसावणारा अंधार आहे तर दुसऱ्या स्तरावर आपला 'सूर्य' लौकरच उगवणार असल्याची आशा आहे. दोन्ही स्तरावरील कविता काही प्रमाणात परस्पर विरोधी टोकावर उभी असली तरी ती आधुनिकतेच्या व्यक्तिकेंद्रितता ऐहिकता आणि बुद्धिप्रामाण्य या मूल्यांचा स्वीकार करणारी कविता आहे.'

अनपेक्षितरीत्या डॉ. रसाळ याच्या प्रतिपादनावर उपस्थितानी तीव्र हल्ले चढवले. टिळक, बी कवी यांचे उल्लेख, दलित कवितेसंबंधीचे त्याचे अत्यंत संक्षिप्त उद्धरण इत्यादिविषयी अन्य विद्वानानी केलेली चीरफाड डॉ. रसाळानी शांतपणे ऐकून घेतली व प्रत्युत्तरात त्या सर्व शंकाचा खरपूस समाचार घेतला. उत्तरादाखल केलेले त्याचे भाषण हे या परिसंवादात झालेले सर्वांत झणझणीत भाषण होते !

डॉ. प्र. ना. परांजपे यांनी 'मराठी नाट्यातील आधुनिकते'वर विचार मांडले. दुर्दैवाने त्यांचा निबंध अपूर्ण होता. त्यामुळे विषयाची त्यानी केलेली सुस्पष्ट आखणी चर्चेला न्याय देऊ शकली नाही 'आधुनिकतेची दोन रूपे म्हणता येतील. एक कालसापेक्ष आणि

दुसरे कालनिरपेक्ष. वर्णनात्मक आधुनिकतेला कालसापेक्ष म्हणता यईल. मूल्यमापनप्रधान आधुनिकतेला कालनिरपेक्ष म्हणता यईल. मराठी नाटकात आशय व अभिव्यक्तीसबंधी आधुनिकता अनेक उदाहरणानी सिद्ध करता येऊ शकेल. अस्सल आधुनिकता व्यक्त करणारी नाटक म्हणजे 'एक शून्य बाजीराव', 'आवर्त'... वगैरे.'

ख्यातनाम समीक्षक प्रा. रा. ग. जाधव याच्या 'मराठी कथेतील आधुनिकता' या निबंधाने मात्र कहर केला. जाधवाचा निबंध असा नव्हताच. नोट्स होत्या. त्या नोटसवरून चाललेले त्याचे भाषण बेसुमार लाबले. इतके की शेवटी प्रेक्षक व निमंत्रित दोघामधून उठून उभ राहून काही लोकानी त्याना थाबण्याची विनंती केली. डॉ.चंद्रशेखर जहागिरदार, चद्रकात पाटील, ह. मो. मराठे, डॉ. भगवानदास वर्मा इत्यादीनी श्री. जाधवाच्या प्रस्तुतीकरणावर तीव्र—हल्ले चढवले या सर्वांना समर्पक उत्तरे देणे श्री. जाधवाना जड़च गेले.

प्रत्येक सत्रात दोन्ही भाषामधले निबध एकेका वाङ्मयशाखेतील आधुनिकतेची चर्चा करीत. आलटूनपालटून वाचल्या जाणाऱ्या या निबधवाचनाच्या सत्राला जे अध्यक्ष नेमले गेले होते त्यापैकी तीन अध्यक्ष या ना त्या कारणाने अनुपस्थित राहिले. ते सयोजक प्राचार्य कुलकर्णी याचे चातुर्य होते की त्यांनी उपस्थितामधून योग्य व्यक्तीना अध्यक्षपद साभाळण्याकरता राजी करून घेतले. उद्घाटनसमारभाचे अध्यक्ष डॉ. सुरेंद्र बारलिगे येऊ शकले नव्हते. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु प्रा. रा. कृ. कणबरकर यानी ती आघाडी साभाळली होती.

## हिंदी विभाग

हिंदी विभागात फक्त तिघानी आपले निबध लिहून आणले होते!

'हिंदी नाटयसाहित्यमे आधुनिकता' या विषयावर कर्नाटक विश्वविद्यालयातील डॉ. चंदूलाल दुबे यानी निबध वाचला. तो सपूर्णपणे अॅकॅडॅमिक होता. हिंदी नाटयसाहित्याच्या क्रमिक विकासातून आपल्याला अभिप्रेत असलेले आधुनिकतेचे टप्पे शोधत असताना या ना त्या अर्थाने त्यानी जवळजवळ सारे हिंदी नाटय-साहित्य आधुनिकतेशी जोडून टाकले होते. विषयाच्या सदर्भात रगमच व एकांकिका या दोन घटकाची चर्चा मराठी विभागात डॉ. प्र. ना. परांजपे यानीही केली नव्हती व या विभागात डॉ. दुबे यानीही केली नाही. वस्तुतः ते हिंदी रगमचाच्या विकासाचे सम्यक अध्ययन केलेले साक्षेपी टीकाकार आहेत. त्याच्याकडून उपस्थिताच्या तशा अपेक्षा होत्या.

पुणे विद्यापीठातील हिंदी विभागाचे प्रपाठक डॉ. चद्रकात बादिवडेकर हे व्यासगी समीक्षक आहेत. हिंदी मराठी कादबरीचा त्याचा अभ्यास दाडगा. अज्ञेयाच्या काव्यावरील लेखनही मान्यता पावलेले. 'हिंदी औपन्यासिक साहित्य मे आधुनिकता' वर आपला दीर्घ निबध वाचताना त्यानी हिंदी कादबरीचे तीन टप्पे कल्पिले. पहिल्या टप्प्यावर प्रेमचदाच्या कादबऱ्या येतात. ईश्वर, धर्म, पाप-पुण्य, स्वर्ग, नरक, जन्म-पुनर्जन्म, कर्मविपाकसिद्धान्त इत्यादिविषयी त्याची उदासीनता आणि तत्सबधी व्यगात्मक दृष्टि त्याना आधुनिकतेशी सलग्न करते. ऐतिहासिक बोध व सामाजिक जीवनाची खरी जाणीव या कसोटीवर प्रेमचंदाचे साहित्य पूर्णपणे खरे उतरते.

'दुसऱ्या टप्प्यावर जैनेंद्रकुमार आणि अज्ञेय याच्या कादंबऱ्या येतात. काम-चेतना व काल-चेतनेसंबंधी प्रश्न प्रथमतः आपआपल्या कादबऱ्यामधून या दोन कादंबरीकारानी चित्रित केले.

'तिसरा टप्पा १९६० च्या जवळपास सुरू होतो. मानवी मूल्याचा विध्वंस होण्याच्या या काळात आधुनिक सवेदना नितात व्यक्ति-पूरक झाली. कादंबरीकाराची स्वकेंद्रितता वाढली, वैश्विक स्थिती-विषयी त्याना फारसे गम्य राहिले नाही. ईश्वर, धर्म, उदारतावाद, सुधारणावाद, गाधीवाद, समाजवाद आणि आधुनिकता हे सारेच व्यर्थ ठरले असून, साहित्याला व समाजाला पुढे नेणाऱ्या एका नव्या 'युरोपिया'ची आता आवश्यकता आहे.'

हिंदीत 'अज्ञेया'ना प्रतिक्रियावादी किंवा परपरावादी मानणाऱ्याची सख्याही मोठी आहे. बादिवडेकराचा विरोध म्हणजे एकार्थाने अज्ञेयाचाच विरोध होता. तसा तो झालाही. डॉ. बादिवडकरानी त्याला समर्पक उत्तरे दिली.

मुबईचे डॉ. देवेश ठाकुर प्रख्यात कथाकार, कादबरीकार व समीक्षक आहेत. त्याचा निबध 'आधुनिकता और आजकी हिंदी कहानी' हा कथाविश्वाचा सम्यक आढावा घेणारा निबध होता. हिंदी कहानीत आधुनिकतेचे खरेखुरे रूप सन १९६० नतरच प्रगट झाले. आधुनिकता एक सतत गतिशील व रचनात्मक प्रक्रिया असून ती आधुनिकवादापेक्षा भिन्न आहे. आपल्या वेळच्या सत्यापासून असपृक्त असलेल्या कुठल्याही सदर्भाला किंवा स्थितीला 'आधुनिक' ही सज्ञा देता येणार नाही. आधुनिकतेची समाजापासून फारकत साहित्याला अभिप्रेत नसते. ते साहित्याचे सत्य होऊ शकत नाही. हिंदी कथा-विश्वातले बहुसख्य लेखक मध्यमवर्गीय आहेत. त्यामुळेही असेल; पण एकाकी होत जाणाऱ्या नितात मारक स्थितीचे चित्रण या कथा-मध्ये अधिक प्रमाणात आढळते. तोपर्यंत या कथेच्या आधुनिकतेवर कुठलेही लाछन लागू शकणार नाही, जोपर्यंत ती खऱ्या अर्थाने धर्मनिरपेक्ष आहे...' हे त्याच्या निबधाचे प्रतिपादन व त्याच्या समर्थनार्थ त्यानी दिलेली कथेची उदाहरणे ही वादाचा विषय बनली नाहीत!!

दिल्लीहून आलेल्या डॉ.गगाप्रसाद विमल यानी 'साहित्य के सदर्भ मे आधुनिकता' या विषयावर आपले विचार माडले. अत्यंत नम्रपणे त्यानी निबध लिहून न आणल्याबद्दल उपस्थिताची क्षमा मागितली; पण त्यानी उच्चारलेले पहिलेच वाक्य थक्क करणारे होते ... एक पुस्तकच या विषयावर आपण लिहिलेले असल्यामुळे आणखी काय लिहावे? असा त्याना प्रश्न पडलेला दिसला!! '...आधुनिक, आधुनिकता व आधुनिकतावाद हे एक दुसऱ्याचे पर्याय नाहीत. या स्वतत्र सकल्पना आहेत. अतीत आणि वर्तमान हे आधुनिकतेच्या सदर्भात त्याज्य नाहीत. गेली २०० वर्षे जे विश्वात घडत राहिले त्याचा परिणाम माणसाच्या मूळ चेतनेवर झाला आहे. 'बाणभट्ट की आत्मकथा' 'शेखर—एक जीवनी' या दोन कादबऱ्या मी उदाहरणा-दाखल घेईन. 'बाणभट्ट की आत्मकथा'चा फॉर्म क्लासिक आहे; पण तत्त्व आधुनिक आहे. 'शेखर—एक जीवनी'चा आधुनिकता फॉर्ममध्ये आणि तत्त्वामध्ये स्वत. सिद्धच आहे. आधुनिकतेतही ५० टक्के भाग परपरेचा असतोच....'

डॉ विमल अस्खलत विचार करीत स्वत शीच जणू बोलत होते. ते थांबले तेव्हा सभागृहात एक 'अबोध शांतता' होती !! नंतर अपेक्षेप्रमाणे उपस्थित विद्वानांनी त्याच्यावर झोड उठवलीच. प्रा निशिकात ठकाराच्या व्यंगबाणानी तर 'विमल' कमालीचे हैराण झाले. प्रत्युतरात त्यानी केलेल्या भाषणात त्याची क्षुब्धता स्पष्ट जाणवत होती.

पुणे विद्यापीठाच्या हिंदी विभागाचे अध्यक्ष डॉ. आनंदप्रकाश दीक्षित 'हिंदी कविता में आधुनिकता' वर बोलले 'सन १९४० मध्ये निरालाची 'कुकुर-मुक्ता' कविता प्रकाशित झाली. सन १९४३ मध्ये 'तारसप्तक' हा काव्यसंग्रह. हिंदी कवितेच्या आधुनिकतेचे हे दोन बिंदू. भारतेंदु ते छायावादी काळापर्यंतची कविता व सन १९४० नंतरची कविता मूलत भारतीय प्रवृत्तीच्याच, पण त्यावर पाश्चात्याचा प्रभाव अधिक होता. सन ४० नंतर विकसित होणाऱ्या कवितेने खरे तर रीतिकाळातली घोर शृंगारिकता नव्या स्वरूपात प्रकट केली, 'चौथा सप्तक' मधली राजेंद्र किशोरची कविता पहा. ही छद्म आधुनिकता आहे. अज्ञेय आणि मुक्तिबोध हे दोन या काळातले सर्वांत जास्त चर्चितकवी. अज्ञेयाची कविता हळूहळू मागे पडली. मुक्तिबोधचा प्रभाव वाढला. अज्ञेय संप्रदायाशी सबधित असलेल्या कवितेने समाजाला काहीही दिलेले नाही. मुक्तिबोध सर्वत्र समाजाशी जुळलेले आहेत, . आतरराष्ट्रीयतेच्या नावावर या तथाकथित आधुनिक कवितेने एक पोकळ आतर्राष्ट्रीयेचा प्रचार केला. त्या पायी आम्ही राष्ट्रवादही घालवून बसलो. डॉ. दीक्षितांचे भाषण वरवर पाहाता शात पण खरे म्हणजे आक्रमक होते. त्यानी नव्या कवितेतील तथाकथित आधुनिकतेची कडक शब्दात हजेरी घेतली होती. नव्या कवितेचे एक प्रवर्तक 'अज्ञेय' समोर बसले असताना !! परिसंवादाच्या समारोपात श्री. म. द. हातकणंगलेकर, गो. मा. पवार, डॉ. दिवाकर, जी. एन. जोशी. डॉ. गंगाप्रसाद विमल. डॉ भगवानदास वर्मा, श्री. ह मो. मराठे व डॉ. उषा इथापे यांची भाषणे झाली. यापैकी लक्षात राहिली दोन माणसे– डॉ. वर्मा व मराठे. एकूण सर्व चर्चासत्राचा आढावा घेणारे डॉ. वर्मांचे भावनेने ओथंबलेले भाषण सभागृहावर छाप पाडून गेले; पण लांबलाबून येऊन व एअरफेअर होऊनही निबध लिहून न आणणाऱ्याना धारेवर धरत अत्यंत स्पष्ट शब्दात त्याचा निषेध करणारे आणि 'ही कमालीची भ्रष्ट वृत्ती आहे' असे परखडपणे ठणकावणारे श्री. ह. मो. मराठे याचे भाषण अधिक दाद घेऊन गेले.

तीन दिवस निंदा व प्रशंसा तटस्थपणे व शांतभावाने ऐकणाऱ्या श्री. अज्ञेय यानी समारोपात पुन्हा आपली भूमिका स्पष्ट केली.

'एक अतिथी म्हणून मी आपल्या सर्वांचा मनापासून आभारी आहे. मचाचा एक आवेश असतो. मंचावर माणूस चढला की तो त्यात भिनतो. सुदैवाने मी तशा आवेशापासून मुक्त आहे. मी या चर्चासत्रात एक सहभागीही होतो. त्यामुळे अतिथिधर्माला सहभागीधर्मावर वरचढ होऊ न देता मी काही गोष्टी स्पष्टपणे मांडू इच्छितो. 'आलोचना' हाही शेवटी एक धर्म आहे व तो रचनात्मक दृष्टी ठेवून पाळावा लागतो.

'आपण साहित्याला एक परफार्मिंग आर्ट मानणार आहोत का? पूर्वी या देशात दृश्य व श्राव्य असे विभाजन असे. कथेची सर्व समानार्थक नावे कथा, कहाणी, बनकठी, वार्ता–परफार्मन्सचीच निदर्शक आहेत. त्यात श्राव्यावर जोर आहे. साहित्य जोपर्यंत अशा पद्धतीने परफार्मन्सशी सलग्न होते तोपर्यंत त्याची स्थिती वेगळी होती, आज साहित्यात व्यावसायिकता अधिक शिरली आहे. खरे पहाता असे कुठलेही युग नव्हते ज्या युगात कलेद्वारा मनोरजन होत नव्हते व असे कुठलाही युग किंवा कुठलाही देश नाही जेथ कलानी उद्बोधनाचे कार्य केलेले नसेल...

'साहित्यामध्ये आज जे गुणात्मक परिवर्तन दिसते ते यामुळे आहे की साहित्य आता समाजाची वस्तू राहिलेली नाही आता लेखक लिहितो. निर्मितीची एक स्थिती आहे, पण आस्वाद घेणाऱ्या स्थितीविषयी काहीच सांगता येत नाही तो एका अनुपस्थित पब्लिक करता लिहीत असतो. कोण वाचणार याच्याविषयी तो फक्त अनुमान करतो.

'परिवर्तनाची ही मूलभूत दिशा आम्ही समजून घेतली पाहिजे. आधुनिकतेचा प्रारंभ तेथून होतो जेथून गुणात्मकतेचा संदर्भ बदलतो शेवटी पुस्तकाच्या माध्यमातून समाज लेखकापर्यंत पोहचणार आहे का? पश्चिमेत पुस्तकेच लेखक व समाजाच्या मधे भिंत बनून उभी राहिली येथेही काही प्रमाणात तेच घडत आहे. सर्वसामान्यापर्यंत पोहचण्याची गोष्ट आम्ही करतो तेव्हा मोठी विचित्र स्थिती निर्माण होते. पुस्तकाच्या माध्यमातून आम्ही फारच थोड्यापर्यंत पोहचत आहोत. ज्याच्याविषयी आम्हाला सहानुभूती आहे त्यातल्या अधिकांश लोकांपर्यंत पोहचणे राहूनच जाते.

आधुनिकतेचा एक मोठा स्रोत या परिस्थितीच्या आकलनाच्या आधारावर आम्ही शोधू शकतो. आमचा 'कालबोध' बदललेला आहे हे खरे आहे. आम्ही हा बदल कसा व कुठल्या दिशेने होतोय हे जाणायला हवे. मी जे काही लिहिले त्याची विवेकशील प्रतिक्रिया हिंदी क्षेत्राबाहेर होत राहिली; पण हिंदीत बहुधा गैरसमजच अधिक झाले.

अज्ञेयाचे संथ आत्मविश्वासी अनुभवसमृद्ध बोलणे कुणाला पटो न पटो, पण त्यांच्या भारदस्त व्यक्तित्वाप्रमाणे त्याच्या बोलण्याचाही परिणाम होतच होता.

तीन दिवसाच्या चर्चेत तशी 'उठापटक' ही बरीच झाली. हिंदीवाल्यामधे 'सूनना' शब्द प्रिय आहे. हे 'सूनना' शाब्दिक असो की शारीरिक, ते त्यांना आवडते !! मराठीच्या एका ज्येष्ठ अभ्यासकाला त्याच्यावर झालेल्या टीकेच्या संदर्भात विचारलं तर ते उत्तरले 'अहो, त्यानी इतराच्या धोतराला हात घातल्यानंतर आम्ही त्याचे धोतर फेडणारच !!' एकूण दोन्ही बाजूनी मामला समान स्तरावर होता !

डॉ. सरजुप्रसाद मिश्र (कोल्हापूर) डॉ. भगवानदास वर्मा (औरंगाबाद) डॉ. शंभूनाथ (कलकत्ता) प्रा. कृ व. निकुंभ, प्रा. निशिकात ठकार (सोलापूर) चंद्रकांत पाटील (औरंगाबाद) श्री. माधव मनोहर (मुंबई) प्रा. सीताराम रायकर, ह. मो. मराठे, डॉ. परळीकर (पुणे) इत्यादी अभ्यासू मडळीनी चर्चेत 'जान' आणली. कधी नवे मुद्दे माडले' कधी मार्मिक विश्लेषण केले कधी तिखट उपहास केला तर कधी तुफानी हल्ले चढवले.

तीन दिवस वाया गेले असे मला वाटले नाही. असे वाटायचे खरे तर काही कारणही नव्हते. कन्या महाविद्यालयाचे प्राचार्य गो. रा. कुलकर्णी व त्यांच्या सहकाऱ्यांनी सर्व पाहुण्याची बडदास्त इतकी उत्तम ठेवली होती की, अपवादाला सुद्धा नाव ठेवायला जागा सापडली नाही. योजकता व सुव्यवस्था याबद्दल त्याचे करावे तेवढे कौतुक कमीच होईल.

राहाता राहिला परिसंवादाचा विषय व चर्चेची निष्पत्ती. तर आधुनिकतेसारखी जटिल संकल्पना नेमक्या व्याख्येत बंदिस्त करता येत नाही व तिच्याविषयी ठामपणे काही सागताही येत नाही, शेवटी तो एक शोध आहे. तो प्रयोग चुका, दुरुस्ती, पुन्हा प्रयोग या मार्गाने चालतच रहाणार !

परिसंवादाचे एक वाईट असते. चर्चेतून तो 'आखड्यात' केव्हा परिवर्तित होईल हे सागता येत नाही. सागलीत असे एकदोन प्रसग उद्भवलेही; पण 'पेल्यातली ती वादळं' लगेच शांतही झाली. वाद सभामडपात जेवढे रंगले त्यापेक्षा भोजनगृहात व वसतिगृहात अधिक रगले ! सभामंडपातल्या चर्चेत भाग न घेणाऱ्यापैकी अनेकानी या दोन्ही ठिकाणच्या चर्चेत नुसती धमाल उडवली होती. असो. □

# पुस्तके 'आर्य'

## चाणक्याच्या जीवनाचा भव्य पट उलगडणारी कादंबरी की सुंदर ललित ग्रंथ ?

**वि. शं. पारगावकर**

'आर्य' हा एक ६०८ पानांचा प्रचंड ललित ग्रंथ आहे. या ललित ग्रंथाचा वर्ण्य विषय प्रामुख्याने 'चाणक्य' आहे. चाणक्य याचीच आणखी दोन नावे विष्णुगुप्त आणि कौटिल्य हीही आहेत. हा ललित ग्रंथ एका ऐतिहासिक पार्श्वभूमीवर उभा आहे. भारताचा ज्ञात इतिहास जेव्हापासून सुरू होतो असं मानलं जातं त्या मौर्य घराण्याशी या वर्ण्य विषयाचा संबंध आहे. यातील प्रमुख पात्रे विष्णुगुप्त, चंद्रगुप्त, धनानंद (मगध देशाचा राजा) आणि अमात्य राक्षस ही होत. 'कौटिलीय अर्थशास्त्र' या नावाने आज जो ग्रंथ उपलब्ध आहे आणि तो ग्रंथ प्रामुख्याने अर्थशास्त्रावर आधारित नाही, तर राज्यकारभार, राजनीती, लोकांची सामाजिक कर्तव्ये, कूटनीती आणि लोकव्यवहार यावरच प्रामुख्याने या ग्रंथाची उभारणी आहे. पुरातन काळातील हा एक प्रख्यात ग्रंथ समजला जातो आणि त्याचा कर्ता जो कौटिल्य किंवा विष्णुगुप्त हा एक विद्वान, त्या काळी आवश्यक असणाऱ्या सर्व शास्त्रांचा अभ्यासक आणि खऱ्या अर्थाने तत्त्वचिंतक समजला जातो. 'आर्य' ही कादंबरी सर्वार्थाने श्री. वसंतराव पटवर्धन यांनी त्याच्याच जीवनावर लिहिलेली आहे.

'आर्य' या कादंरीचा एकूण विस्तार पाहता चाणक्याच्या जीवनातील प्रगल्भता दिसून येते. ज्ञात इतिहासाच्या पहिल्या किनाऱ्यावर उभी असलेली महान जीवने, गंगा-सिंधूच्या प्रवाहाप्रमाणे त्या काळातील समाजजीवनाचा प्रवाह, राजकीय अस्थिरता, आकांक्षा आणि मनुष्य जीवनाचं सार्थक शोधणारी तेव्हाची आध्यत्मिक तत्त्वज्ञाने यांचाही दृश्य-अदृश्य प्रवाह या काळाशी एकरूप झालेला आहे. या साऱ्या प्रवाहांचा प्रज्ञावंत प्रतिनिधी शोभून दिसावा असेच 'आर्य' चाणक्याचे व्यक्तिमत्त्व श्री. पटवर्धन यांनी आपल्या या प्रचंड ललित ग्रंथात उभे करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

इतिहासाला सर्वस्वी ज्ञात असलेल्या कालखंडातील ऐतिहासिक व्यक्तींवर आजवर बऱ्याच कादंबऱ्या लिहून झाल्या आहेत. त्यामध्ये व्यक्तीच्या जीवनाबरोबर त्या त्या कालखंडाचीदेखील चुकीची वर्णने वाचावयास मिळतात व मनाची वेगळ्या अर्थाने करमणूक होते. उदाहरणार्थ, शिवाजीमहाराजांवर लिहिलेली मनमोहन यांची कादंबरी. व्यक्तिमत्त्व, तपशील, वर्णने यामध्ये कशाचाच कशाला ताळमेळ उरलेला नाही. ही परिस्थिती तीनशे वर्षांपूर्वीच्या इतिहासाची आहे.

म्हणून श्री. पटवर्धन यांच्यापुढे हा एवढा मोठा ललित ग्रंथ लिहिताना किती प्रकारचे प्रश्न उभे राहिले असतील याची कल्पनाच केलेली बरी ! ह. ना. आपटे यांची 'चंद्रगुप्त' कादबरी, विशाखादत्ताचे 'मुद्राराक्षस' हे नाटक आणि 'कौटिल्याचे अर्थशास्त्र' हे तीन ग्रंथ प्रामुख्याने त्यांच्यासमोर असावेत. त्यानंतर इतर अनेक ऐतिहासिक ग्रंथ मेगॅस्थेनिसचे प्रवासवर्णन आणि इतर; परंतु एखादा सूत्रबद्ध इतिहास आणि त्याचे सुसंगत धागेदोरे त्यांच्यासमोर असणे शक्य नाही. तरीही एवढा मोठा आवाका घेऊन या थोर इतिहासपुरुषावर कादंबरी लिहिणे हे काही साधेसुधे काम निश्चितच नाही. म्हणूनच ग्रंथाच्या सुरुवातीस आपल्या मनोगतात ते म्हणतात त्याप्रमाणे, 'कौटिल्याचा इतिहास कुठेच लिहिलेला नाही. त्याचे पूर्वचरित्रही उपलब्ध नाही. ग्रीकांच्या इतिहासातही त्याचा जवळजवळ उल्लेख नाही. बौद्ध आणि जैन ग्रंथांतून आणि इतर भारतीय वाङ्मयातून त्याचा उल्लेख आढळतो; परंतु ज्या माणसाच्या हातून जगाला ललामभूत व्हावा असा ग्रंथ निर्माण झाला त्या श्रेष्ठ व्यक्तीबद्दल केवळ दंतकथांवरच विसंबायला लागतं खरं !'

श्री. पटवर्धन या ग्रंथाच्या उभारणीच्या कामात अनेक दंतकथांवर आणि कविकल्पनांवर विसंबून राहिलेले असले तरी त्यांनी त्यांच्या चरित्रनायकाच्या जीवनाची उभारणी तर्कशास्त्र, मानसशास्त्र आणि समाजव्यवहारात अंतर्भूत असणाऱ्या भावभावनांच्या भक्कम आधारावरच केलेली आढळते.

चाणक्याच्या काळातील राजकीय परिस्थिती, सामाजिक परिस्थिती (मात्र तिचे चित्रण या ग्रंथात फार क्षीण झालेले आहे.) आणि लोकव्यवहारातील गुंतागुंत यांची प्रतिबिंबे या कादंबरीत ठायीठायी उमटलेली दिसतात.

इतिहासाच्या किनाऱ्यावर उभं असलेलं आर्य चाणक्याचं व्यक्तिमत्त्व फार उत्तुंग होतं यात काहीच संशय नाही आणि श्री. पटवर्धन यांनी हे व्यक्तिमत्त्व फार समर्थपणे उभं केलेलं आहे यावद्दलही शंका नाही. उलट आर्य ही कादंबरी वाचीत असताना आद्य कादंबरीकार ह. ना. आपटे यांची चंद्रगुप्त घडोघडी दृष्टीसमोर येते आणि त्यातील अत्यंत रागीट, चिडचिडा, द्वेष्टा विष्णुगुप्त डोळ्यांसमोर उभा राहतो. त्याची विद्वत्ता

आणि सामर्थ्य श्री. पटवर्धन यानी ज्या कौशल्यानं उभं केलेलं आहे त्या कौशल्याची वाण 'चंद्रगुप्त' या कादंबरीत प्रकर्षानं जाणवतें. त्यामुळं एखाद्या जीवनाच्या उत्कर्षापकर्षामधून व्यक्तिमत्त्वाचा जो चैतन्यमय गाभा वाचकाना प्रतीत व्हावयास पाहिजे तो श्री. आपटे यांच्या कादबरीत जाणवत नाही, तो 'आर्य'मध्ये जाणवतो खास! शिवाय 'चंद्रगुप्त'मध्ये वातावरण अद्भुततेनं, कल्पनारम्यतेनं सतत भारलेलं वाटतं. त्यात वास्तवतेचा, ऐतिहासिकतेचा साक्षात्कार होत नाही, तो 'आर्य'मध्ये होतो. आपण गतकालाचा एक वास्तव इतिहास वाचीत आहोत याची प्रचीती श्री. पटवर्धन आणून देतात.

परंतु जे जाणवतं आणि खुपतं ते त्यांनी लेखनाच्या बाबतीत अवलंबिलेलं तंत्र. विष्णुगुप्त, चाणक्य, तारिणी, अपूर्वा, राक्षस, मेगॅस्थेनिस अशी प्रकरणं पाडून त्यानी जी निवेदनाची पद्धत स्वीकारलेली आहे ती परिणामी कंटाळवाणी वाटते आणि त्यामुळंच तीमध्ये पुनरुक्तीचा दोषही भरपूर प्रमाणात शिरला आहे. या पुनरुक्तीमुळं रसनिष्पत्तीला अडथळा निर्माण होतो. एका पाटाचं पाणी दुसऱ्या पाटात जातं, दुसऱ्याचं तिसऱ्यात जसं पाणी खेळत, अडखळत राहात तसं काहीसं या पुनरुक्तीमुळे झालेलं आहे. शिवाय त्यानी अंगीकारिलेल्या या आत्मनिवेदनपद्धतीला स्वगताचं स्वरूप आलेलं असल्यामुळं पात्राच्या सर्वांगीण, चैतन्यमय विकासाची गळचेपी झालेली आहे. वाचकांच्या ही गोष्ट एव्हाना लक्षात आलेली असेल की, सुरुवातीपासूनच मी या सुंदर ललितग्रंथाला कचरत–कचरतच कादंबरी म्हणत आहे, त्याचही मूळ यातच आहे लेखनाच्या ओघातच, भाषेच्या चैतन्यमय स्वरूपाबरोबरच, भाषेमधूनच जिवंत आणि जागत्या होणाऱ्या व्यक्तिचित्रानाही पुरेसा वाव मिळाला पाहिजे, तशी शक्यता या स्वगत निवेदनपद्धतीमुळं दुरावलेली आहे.

इथं प्रश्न असा उपस्थित होतो की शेवटी कादंबरी म्हणजे तरी काय? कुठल्याही कलाकृतीच्या प्रकाराची काटेकोर व्याख्या करणं तसं फार कठीण काम आहे. आपले आद्य कादंबरीकार ह. ना. आपटे यांनी देखील, कादंबऱ्या म्हणून लिहिल्या त्या तरी कादंबरीच्या तंत्रात बसतात का? त्याची निवेदनपद्धती तर इतकी ढिसाळ आहे की त्यामुळं ठायी ठायी रसभंग व्हावा. 'आता मी वाचकाला अमक्या ठिकाणी घेऊन जात आहे!' किंवा 'आमच्या वाचकाना आठवतच असेल की–' अशी केवळ कलाकृतीची रसहानी करणारी अनेक प्रकारची निवेदनं त्याच्या कादंबरीत येतात. वा. म. जोश्यांची एक कादंबरी तर पत्रात्मकच आहे. तसेच श्री. ना. पेंडसे याची 'लव्हाळी,' बा. सी. मर्ढेकर याची 'तांबडी माती' अशी किती तरी उदाहरणं देता येतील, ज्यामधून कादंबरीचं रूढ तंत्र साभाळलं गेलं नाही.

त्यामुळं श्री. पटवर्धन यांच्या 'आर्य'ला केवळ कादंबरीचा फॉर्म नाही म्हणून तिला कादंबरी न म्हणणं तितकंसं बरोबर नाही.

मी वर जे म्हटलं आहे की श्री. पटवर्धन यानी आत्मनिवेदनाची जी पद्धत स्वीकारली आहे, ती माझ्या दृष्टीनं रसनिष्पत्तीला बाधा आणते. चित्रित केलेल्या व्यक्तीच्या जीवनाचा सर्वांगीण परिपोष साधणं, शब्दातून, संवादातून, व्यक्तिव्यक्तीमध्ये निर्माण होणाऱ्या प्रसंगांतून, त्यामधून उद्भवणाऱ्या नाट्यातून, संकटाच्या, सुखाच्या, दुःखाच्या, विनोदाच्या, शौर्याच्या, विनाशाच्या प्रत्यक्ष प्रसंगांतून व्यक्ती घडवीत नेणं आणि त्या सर्वांचं मिळून एक भावनात्मक, लयबद्ध संगठण जुळवून आणणं, हा कुठल्याही ललितकलाकृतीचा धर्म असायला पाहिजे. मग ती कथा असो, नाटक असो, काव्य असो वा कादंबरी असो.

पटवर्धनांच्या 'आर्य'मध्ये अशा प्रकारचे लयबद्ध संगठण झालेलं नाही. व्यक्तिजीवनाच्या महत्तम आवाक्याचा ती जरूर साक्षात्कार देते. पहिल्यापासून ते शेवटपर्यंत आर्य चाणक्याच्या जीवनाचा भव्य पट ती उलगडून दाखविण्यात यशस्वी झालेली आहे. अलेक्झँडर आणि महाराजा पौरस याच्या अलौकिक जीवनाचा आणि त्या जीवनातील भव्य–दिव्यत्वाचा ती साक्षात्कार घडवून आणते. अभी आणि धनानंद याच्या व्यक्तित्वाची रूपरेषा ती ठळक रंगरेखांमधून साकारते. अमात्य राक्षसाची मुत्सद्देगिरी, त्याची स्वामीनिष्ठा ती शब्दाच्या उभ्या आडव्या रेषांमधून रेखाटते. तारिणीचं एकागी जीवन आणि अपूर्वाचं अनेक पदर असलेलं जीवन ती आखते आणि मुख्यतः हजारो वर्षांपूर्वीच्या काळाचं, एक बरचसं अस्पष्ट का होईना चित्र उभं करण्यात ती बऱ्याच प्रमाणात यशस्वी होते.

या झाल्या साऱ्या तिच्या यशाच्या बाजू.

तसाच आणखी एक विशेष जाणवतो तो पटवर्धन याच्या भाषाशैलीचा. त्याची निवेदनाची भाषा अत्यंत साधी आहे आणि साधी असून देखील ती पुरेशी प्रौढ आहे. ती नटवी नाही. अलंकाराचा तिला सोस नाही. फाजील उपमा–उत्प्रेक्षांच्या जाळचात ती स्वतःला अडकवून घेत नाही. पाण्याचा संथ प्रवाह चालावा तशी पटवर्धनाची भाषा कादंबरीभर वाहताना दिसते. ती पुरेशी अर्थवाही आहे परंतु चित्रमय नाही. चित्र कोरण्याचं किंवा वाचकाच्या मनात प्रतिबिंबं उमटविण्याचं कार्य तिच्या हातून होताना दिसत नाही. पुष्कळ वेळा कौटिलीय अर्थशास्त्रात कौटिल्याने वापरलेल्या प्रतिमा इथं चाणक्याच्या तोंडी आलेल्या आहेत. परंतु एरवी पटवर्धन यांच्या भाषेला त्याची गरज भासत नाही.

परंतु चैतन्यमयता आणि रसनिष्पत्ती, कादंबरीसारख्या कलाप्रकाराचा जो अविभाज्य भाग असतो, त्याचा प्रत्यय श्री. पटवर्धन यांची 'आर्य' ही कादंबरी देत नाही. याचं उदाहरण थोडं विस्तारानं दिल्याशिवाय मी काय म्हणतो ते नीट लक्षात येणार नाही, म्हणून ते खाली देत आहे. तारिणीच्या निवेदनात पृष्ठ ३२० वर तारिणी म्हणते, "मी त्याना सागत होते, 'निर्वाणाप्रत जाणंच चांगलं.' तर ते म्हणत होते, 'तारिणी, जन्म, जरा, मरण, आजारपण ही दुःख हे सत्य असल्यामुळं माणसाचं जीवन दुःखमय असणारच प्रिय वस्तूचा वियोग, अप्रिय वस्तूचा संपर्क आणि काम्य वस्तूचा लाभ न होणं यामुळ होणाऱ्या यातना जर कुणाला चुकल्या नाहीत तर केवळ संन्यास घेऊन जीवनापासून वनात पळणं हे अप्रत्यक्ष मृत्यू पत्करण्यासारख आहे. असं पलायन करणं म्हणज जगण्यासाठी नैसर्गिक साधन वापरायची; पण त्याचा मोबदला मात्र द्यायचा नाही, हे चूक आहे दुःखाचं सर्वत्र साम्राज्य असल्यामुळंच स्वैर भोगाच्या पाठीमागं लागणं हे जितकं चुकीचं आहे तितकंच आपली कर्तव्यपूर्ती न करणही चुकीच आहे.'

'मी आर्यांना पुन्हा म्हटलं, . ' वगैरे हे

जे संवाद स्वागतासारख्या माध्यमातून एखादं पात्र दुहेरी अगर तिहेरी बोलतं तेव्हा ते फक्त निवेदनाच्या पातळीवरच राहतं. प्रत्यक्ष हावभावासहित, अंगविक्षेपासहित, तेथील परिसर आणि परिस्थितीसहित हे व अशाच प्रकारचे संवाद घडले आणि झडले असते तर मी म्हणतो त्याप्रमाणे या कादंबरीला चैतन्य आणि रसनिष्पत्ती बहाल झाली असती. या कादंबरीत पुष्कळ अगदी ठायी ठायी विखुरलेले प्रसंग आहेत. त्यात प्रचंड नाट्यमयता आणि नादमयता आहे; परंतु योग्य तंत्राच्या नियुक्तीअभावी ते सारे मुके राहिलेले आहेत. पुसट झालेले आहेत !

परंतु तरीही श्री. पटवर्धन यानी एका फार मोठ्या आणि तितक्याच अवघड विषयाला हात घातलेला आहे आणि अत्यंत परिश्रम घेऊन एक जबरदस्त आलेख उभा केलेला आहे त्याबाबतीतील त्याचं यश डोळ्यात भरण्यासारखं आहे. कौटिल्याच्या अर्थशास्त्र या ग्रंथाबरोबरच पटवर्धनाचा 'आर्य' हा ग्रंथही सतत काळाचे आव्हान स्वीकारीत राहील आणि पुढं येणाऱ्या नवीन पिढ्याना या विषयावर लिहिण्याची प्रेरणा देत राहील. हे पटवर्धन यांचं यश काही थोडेथोडकं नाही. एवढा मोठा ग्रंथ अत्यंत सुबक, आकर्षक रूपात प्रकाशित केल्याबद्दल विश्वकर्मा साहित्यालयाचं कौतुक आणि आभार मानलेच पाहिजेत. ◻

आर्य
ले. वसंत पटवर्धन
प्र. विश्वकर्मा साहित्यालय, पुणे
मूल्य : पंचाहत्तर रुपये

चित्रपट

# क्रॅमर विरुद्ध क्रॅमर

## दोन प्रतिक्रिया

ते दोघे एकमेकावर प्रेम करीत होते; त्यानी लग्नही केलं. वर्षा-दीड वर्षानं एक छानसं मूलही झालं तसं पाहिलं तर सुखी संसार. त्या दोघातला 'तो' त्याच्या क्षेत्रात अधिक वर जाऊ पहातोय कामाच्या गडबडीत तो व्यग्र असतो. त्या गडबडीतच 'त्या'च 'ति'च्याकडे थोडेसं दुर्लक्ष झालंय आणि इथंच एक अनामिक अस्वस्थता, एकटेपण तिच्या मनात शिरतं. ती आतल्या आत गुदमरते, त्याच्यावर आणि मुलावर खूप प्रेम असूनही ती विभक्त होण्याचा निर्णय घेते. तो प्रथम हादरतो, खचतो; पण मग शांतपणे स्वीकारतो; परिस्थितीला तोंड देतो.

बस ! जगात कुठेही घडणाऱ्या 'घटस्फोट' नावाच्या वादळाची ही कथा 'क्रॅमर व्हर्सस क्रॅमर' या पाच ऑस्करविजेत्या चित्रपटाची कथा आहे एकमेकावर निःसीम प्रेम आहे तरी पण एकत्र राहणं का शक्य नाही ? जुळवून घेण्याचा खूप प्रयत्न केला तरी का जुळत नाही ? यात 'चूक' कोणाची ? पतीच्या व्यक्तिमत्त्वात सामावून न जाता स्वतःच स्वतःला शोधण्याचा प्रयत्न केला, तर तो पत्नीचा अहंकार ठरतो का ? असे अनेक प्रश्न या चित्रपटाद्वारे उभे राहतात आणि या प्रश्नांना उत्तरे देण्याचा किंवा शोधण्याचा 'खोटा' प्रयत्न दिग्दर्शक करीत नाही. तो फक्त एक 'कथा' जशी घडली तशी दाखवतो आणि ते सत्यच विलक्षण बोचरं आहे.

टेड, जोॲना आणि बिली असं हे छोटंसं 'क्रॅमर' कुटुंब आहे. टेड एका चांगल्या जाहिरातकंपनीत मोठ्या हुद्द्यावर आहे. तिथं त्याला पुढं जायची, मोठं व्हायची खूपच संधी आहे आणि तोपण त्यासाठी खूप परिश्रम करतोय. आठ वर्षांच्या वैवाहिक जीवनात आपली बायको जोॲना पण एक कलाकार आहे, ती घरात एकटीच असते याची त्याला जाणीवच नाहीये. कारण त्याला तसा विचार करायला फुरसतच नाहीये आणि जोॲना फक्त एकटीच नव्हे 'बेकार' आहे. तिला नुसतं बसून राहण्याचा उबग आलाय. काही तरी काम स्वतःला गुतवून घेण्यासाठी करावं अशी तिची इच्छा आहे, पण नवरा भरपूर मिळवत असताना बायकोने घर, मूल सांभाळायचं सोडून काम कशासाठी करावं असा साधा विचार टेडचा. गेली ६–७ वर्षं जोॲनानं जुळवून घेतलं; पण आता तिला ते असह्य झालय आणि अखेरीस ती निर्णय घेते 'आपलं' घर सोडण्याचा, नवरा आणि मूल सोडण्याचा !

ज्या दिवशी ती हा निर्णय जाहीर करते तो दिवस टेडच्या व्यावसायिक आयुष्यात अत्यंत महत्त्वाचा असतो. आपल्या घरी कुठलं वादळ आपली वाट बघतय याची त्याला पुसटशीसुद्धा कल्पना नसते. त्यामुळं घरी आल्यावर, जेव्हा जोॲना त्याला आपला निर्णय सागते, तेव्हा तो त्याच्याकडे लक्षच देत नाही. पण नंतर सत्य समजल्यावर तो स्तभित होतो, अवाक् होतो; त्या वादळात तो भोवंडून जातो; पण नंतर सावरतो, आपल्या लाडक्या मुलाला–बिलीला–जराही त्रास होऊ नये, घडलेल्या गोष्टीची जाणीव सुद्धा होऊ नये म्हणून जिवाची पराकाष्ठा करतो. टेडची ती तगमग आपल्याला बघवत नाही इतक्या सुंदर रीतीनं डस्टिन हॉफमन या गुणी नटानं साकार केली आहे.

या चित्रपटात जास्त वाव 'टेड'लाच आहे आणि त्या व्यक्तिरेखेचे सगळे पैलू हॉफमनने ताकदीनं दाखवले आहेत. चित्रपटातला प्रत्येक प्रसंग, प्रत्येक इंच त्यानं सजीव केला

आहे. (हिंदी चित्रपटासारखी जाहिरातबाजी न करता) तो टेडची भूमिका अक्षरशः जगलाय. आपल्या मुलाला 'तयार' करून शाळेत पोचवून मग 'कचेरी' गाठण्याची त्याची ती धडपड, धावपळ ही फक्त एका प्रेमळ बापाचीच आहे. बिली खेळता खेळता पडतो, तेव्हा त्याला इस्पितळात घेऊन जाण्यासाठी टेड उरी फुटस्तोवर पळतो. त्याला घरी आणल्यावर त्याची देखभाल करणं, त्याला गोष्टी वाचून दाखवणं, सगळं तो आईच्या मायेनं करतो. एका रात्री तो आपल्या पोराशी बोलताना सागतो की, 'आता तुझी आई कधीच परत येणार नाही. कारण सगळी चूक माझीच आहे. मला वाटलं मी खूप आनंदात आहे, म्हणजे ती पण आनंदी आहे; पण तसं नव्हतं, ती खूप दु:खी होती !' हे सगळं बोलत असताना त्याचा रुद्ध झालेला कठ, डोळ्यातलं पाणी, हे सगळं इतकं खरं आहे की, आपलंही काळीज हेलावल्याशिवाय रहात नाही !

आणि तो हे सगळं सागतो कुणाला तर आपल्या ७–८ वर्षांच्या मुलाला. कारण गेल्या कित्येक दिवसांत त्या दोघाचं भावविश्व केवळ एकरूप झालेलं असतं. त्या दोघाचे या चित्रपटात इतके विपुल आणि सुदर प्रसंग आहेत की ते सागू गल्यास जागा पुरणार नाही आणि सागण्यात काही फायदा नाही, ते पहायलाच हवेत.

जोॲनाच्या व्यक्तिरेखेला त्या मानाने चित्रात जागा कमी आहे; पण ती अत्यंत महत्त्वाची जागा आहे आणि ही जोॲनाची व्यक्तिरेखा मेरिल स्ट्रिप या नटीने अत्यंत अप्रतिम आणि सस्मरणीय करून सोडली आहे. तिनेपण वाट्याला आलेली भूमिका, प्रसग जीव ओतून सादर केले आहेत. आपल्या घरापासून, प्रेमळ आणि साध्या नवऱ्यापासून, प्राणाहून प्रिय असलेल्या मुलापासून दूर जाताना झालेल्या यातना ती सवादफेकीतून आणि चेहऱ्यावरच्या हावभावातून अचूक व्यक्त करते. घर सोडण्यामागची तिची असहाय्यता आपल्याला व्यथित करते. या नटीच्या अभिनयाची कमाल दाखवणारे दोन प्रसंग म्हणजे एका छोट्या हॉटलात ती व टेड भेटतात तो व कोर्टामध्ये.

जोॲना टेडला फोन करून एका हॉटेलमध्ये भेटायला बोलावते. सबंध आयुष्य एकत्र घालवण्याची स्वप्नं रंगवलेले आणि शपथा घेतलेले दोन जीव पाहता पाहता दोन ध्रुवावर जाऊन पोचलेले असतात, ते एकमेकाना समजू शकत नाहीत, ओळखून घेऊ शकत नाहीत. हॉटेलामध्ये दोन अनोळखी भेटावेत तसे भेटतात. ती अगोदरच खूप रडली आहे हे स्पष्ट दिसत असते. तरी पण दोघेही कसेबसे हसून इकडच्या तिकडच्या गोष्टी करतात आणि ती त्याच्याकडे मुलाची मागणी करते. तो चक्क नकार देतो. ती चिडते. तोही चिडून ग्लास फोडून निघून जातो. जेमतेम पाचेक मिनिटांचा प्रसंग, पण दोघानीही अभिनयाची परिसीमा गाठली आहे.

मूल कुणाकडे ठेवायचे हा वाद कोर्टात जातो आणि ही दोन अर्धांगे एकमेकाविरुद्ध उभी ठाकतात. आपल्याच प्रेमाचे आणि ससाराचे धिंडवडे निघालेले पाहण्यासाठी. कोर्टात दोघाचेही वकील त्याच्यावर नाही नाही ते आरोप करतात. जोॲनाच्या वागणुकीबद्दल, तिच्या शीलाबद्दल सशय व्यक्त केला जातो, टेडच्या नोकरी जाण्याचं आणि बिलीच्या अपघाताच खापर टेडच्याच माथी मारून, तो बायको–पोराला साभाळायला नालायक आहे अस ठरवलं जात. कायद्याचा सगळा निष्ठुरपणा, आधळेपणा इथं आपल्याला दिसतो. त्यासाठी डोळ्यावर पट्टी बाधलेली, हातात 'तागडी' धरलेली न्यायदवतेचो मूर्ती दाखवण्याचा प्रसग दिग्दर्शकावर आला नाहो. कोर्टातच आपल्याविरुद्ध बायकोन सागावं म्हणून खुणा करणारा पतो, प्रियकर असा टड दिसता. दीडएक वर्षात मुलाकरता टडने किती खस्ता खाल्ल्यात हे माहीत असल्यामुळ जेव्हा त्याच्यावर आरोप होत असतात तेव्हा जोॲना त्याच्याकडे ज्या नजरेन बघते तो मूर्तिमत 'जखमी नजर' आहे. अतःकरणाला हात असलेल्या वेदना ती दाखवते.

अखेर जोॲना केस जिंकते. एका मातेला तिच्या मुलाचा कायदेशोर ताबा मिळतो; पण त्या पोराला–बिलीला या सगळ्या वादळाची कल्पना नसते. आई आपल्याबरोबर रहात नाही हे त्याला माहीत असत आणि त्याला तर आई आणि बाप दोघेही हवे असतात. हे काम हेन्री जस्टिनन इतक सुरेख केलं आहे की आपल्याला अचबा वाटावा. त्याच्या खोड्या, त्याच रडणं, खेळण सगळं इतक अकृत्रिम आहे की ते त्याला शिकवल आहे, तो कॅमेऱ्यासमोर, सिनेमात काम करतोय, हे खरच वाटत नाही आणि आपल्याकडच्या 'चाइल्ड आर्टिस्ट' सारखा तो तापदायक पण नाही. हिंदी सिनेमातील पोरे मोठ्यानाच उपदेशाचे डोस संतापजनक पद्धतीने, आगाऊपणे पाजीत असतात. जीवनविषयक तत्त्वज्ञान बोलतात तसे इथं नाही. तो एक लहान मुलगाच आहे. बापाला ब्रेकफास्ट बनवण्यात मदत करणारा, बाप आपल्याला उशीरा न्यायला आला म्हणून फुरंगटून बसणारा, आई दिसताच पळत तिकडे जाणारा एक लहान मुलगाच आहे या भूमिकेतून त्यानं प्रेक्षकाची मन जिंकल्यास नवल ते काय ?

ॲव्हरी कॉर्मनच्या मूळच्या कादबरीवरून दिग्दर्शक स्टॅन्ले जेफने अत्यंत सयत व बदिस्त पटकथा लिहिली आहे. घटस्फोटित जोडप्याना, त्याच्या मुलाना जे मानसिक ताण, त्रास सोसावे लागतात त्याच अत्यंत नेमकं चित्रण व दर्शन या कथेतून घडते. प्रसगाप्रसगातून प्रत्येक व्यक्तिरेखा त्यानं अत्यंत सूक्ष्मपणे खुलवली, फुलवली आहे. कुठेही नाटकीपणा, भडकपणा नाही आणि कटाळा तर पाव सेकंदही येत नाही. या कथेतील पात्र सगळी 'माणसं' आहेत त्यामुळं जे घडतं त्याला कुणाचाच इलाज नाही, सगळ अपरिहार्य आहे. या चित्रपटात व्यक्ती रडतात ते दु:खातिरेकानं उगीच डोळ्यात ग्लिसरिन टाकून, केस पिंजारून दु:ख व्यक्त करीत नाहीत. कुणीही दैवी गुणसपन्नतेचा, महान त्यागाचा (खोटा, हिंदी) आव आणत नाही; त्यामुळे हा सिनेमा बघताना आपले डोळे ओले झाले हे आपल्यालाही कळत नाही !

'पश्चिमेकडे' घटस्फोट अगदी सहज मिळतो आणि त्यात त्या लोकाना आनद वाटतो, ही आपली समजूत हा चित्रपट पूर्णपणे खोटी पाडतो. घटस्फोटाच मूळ शोधण्याचा, मानवी स्वभावाचे कगोरे तपासण्याच्या प्रयत्नात या चित्रपटात दिग्दर्शकाने किंचितशीही तडजोड केलेली नाही. जोॲना बिलीला टेडकडेच ठेवून जाण्याचा निर्णय घेते, तो शेवटचा प्रसग अक्षरशः हृदयस्पर्शी आहे. (प्रेक्षकाना 'बर' वाटाव म्हणून शेवट गाड करायला तो काय 'हिंदी' दिग्दर्शक थाडाच आहे ?)

कथेचा परिपोषच होईल असे अत्यत माफक सगीत इथ आहे. 'इमोशनल' प्रस-

गाना 'करुण सारंगी खाजवली नाही' की धक्कादायक प्रसंगी दोन-चारशे वाद्ये बडवली नाहीत. कृत्रिम नाट्यपूर्ण प्रसंग नसले तरी प्रत्येक प्रसंग काळजाला हात घालतो, फालतू लंबीचवडी भाषणं नाहीत पण सवाद अस्वस्थ करतात. 'बोलका कॅमेरा' म्हणजे काय, संकलन म्हणजे काय ते येथे फक्त पहावं, वाचून काय कळणार?

डिसेंबरच्या थंड, बोचऱ्या वातावरणाची पार्श्वभूमी लाभलेली ही कथासुद्धा विलक्षण बोचरी आहे. नाट्यमय असं कटु, बोचरं सत्य साध्या पद्धतीनं सांगणारा हा चित्रपट 'बघायलाच' हवा. बस्, एवढंच!

–निखिल गजेंद्रगडकर

# टोकाची सुखदु:खे!

दोष त्याचा नाही तसाच तिचाही नाही. त्यांना पडद्यावरंच पहाणाऱ्या आमचा नाही नि तुमचाही असू शकतनाही. दोष एकूणच समाजव्यवस्थेचा आहे. त्या समाजानं अंगिकारलेल्या जीवनपद्धतीचा आहे ही जीवनप्रणाली अगदी रोखठोक आहे, व्यक्तीचा क्षण न क्षण एनकॅश करणारी आहे. आपल्या वयात आलेल्या पोरीबाळींना बिनधास्त पिल्स पुरवणारी आहे शनि-मंगळाच्या स्पर्शाची अभिलाषा धरणारी आहे आणि गलितगात्र आई-बापांना वृद्धाश्रमाची वाट दाखवणारी आहे. ही जीवनपद्धती प्रसंगी नात्यागोत्याची नाळ तोडणारी आहे. सोयीनुसार सबध जोड णारी आहे नि वेळ येताच ते तोडणारीही आहे. ह्या समाजव्यवस्थेत सुखंही टोकाची आहेत आणि त्यातूनच अपरिहार्यपणे निर्माण झालेली दु:खंही काहीशी टोकाचीच आहेत. जीवघेण्या स्पर्धेनं झपाटलेल्या त्या समाजातला प्रत्येकच दुसऱ्यापेक्षा स्वत शीच एका अर्थानं अधिक बाधील आहे. अधिक पैसा, अधिक यश मिळवण्याच्या उर्मीनंच ज्याला त्याला झपाटलंय. लौकिक सुखांच्या अशा गुणाकार, भागाकारातून निर्माण होतायत अपरिहार्य अशा भावनिक, मानसिक, बौद्धिक गुतागुती, व्यक्तीव्यक्तीतले दुरावे. अशा ह्या समाजव्यवस्थेत सबंधही सोपे आहेत, तसेच विवाहविच्छेदही स्वस्त आहेत.

ती, मिसेस जोआना क्रॅमर, खरोखरीच कंटाळली होती. वैतागली होती. आठ वर्षांच्या उण्यापुऱ्या वैवाहिक आयुष्यात सुखाचे क्षणही मोजकेच होते आणि त्याहून अधिक म्हणजे ज्याच्यासाठी तिनं नोकरी सोडली, करीअर मोडली, ज्याच्याशी विवाह करून संसाराचा माड माडला, एका मुलाला जन्मही दिला, ज्याच्यावर प्रेम केल, ज्याच्या सुखादु:खांचा भार वाहताना आयुष्यातली नव्हाळीची वर्ष खर्च झाली- त्या टेड क्रॅमरला कुठं त्याची जाण होती? तो स्वत:च्यात, व्यवसायात, अधिक यशात गुरफटला होता. त्याला जराही मागे वळून बघायला वेळ नव्हता. तो आपल्या कामात, कलेतच व्यग्र होता. रात्री-बेरात्री येत होता आणि तिच्या सुखाचे मोजके क्षणही काम काढून वेचव करत होता. तिच्या इच्छा-आकांक्षाच गुदमरून गेल्या होत्या. करिअर डेव्हलप करायच्या कल्पना कुजल्या होत्या. तिच्या दृष्टीनं असल्या निरर्थक जगण्याला काहीच अर्थ नव्हता. तिचा आत्माच जणू बंड करून उठला आणि स्वत च्या भवितव्याच्या जडणीघडणीचा विचार करून ती सरळ मुलालाही मागे टाकून घराबाहेर पडली!

जोआनाच्या म्हणण्यात तथ्य असेलही; तरीही जोआनाचा निर्णय समर्थनीय ठरत नाही. मुळात ती आपल्या व्यथा नीटपणे टेड क्रॅमरपर्यंत पोहोचवूच शकली नाही आणि त्या पोहोचल्यावर त्याची दखल न घेण्याइतका टेड क्रॅमर निश्चितच अप्रामाणिक नव्हता. तो कोर्टात तिला तेच तर सागत होता आणि क्रॅमर परिस्थितीचा गुलाम होता. जीवनस्पर्धेचा बळी होता. त्याचा प्रामाणिकपणा, प्रेम निर्विवाद असलं तरी तो मागे वळून कुटुंबाकडे पाहूच शकत नव्हता. ज्या परिस्थितीत तो जगत होता, त्या परिस्थितीचा प्रवाहच त्याला स्वत बरोबर वाहून नेत होता. तो आधुनिक काळच त्याला आपल्याबरोबर पुढेपुढे खेचत होता म्हणजे ती जीवनप्रणाली जशी टेड क्रॅमरला बाधायला लावत होती तीच अप्रत्यक्षपणे जोआनावरही अन्याय करत होती.

जोआनाच्या अन्यायाने बिथरलेल्या, इगो दुखावलेल्या टेड क्रॅमरमधलं नंतरच परिवर्तनही विलक्षण वेगळ आहे. दिग्दर्शकाने ते अत्यंत समर्थपणानं पडद्यावर मांडलंय. एके काळी केवळ व्यवसायमग्न असलेला टेड क्रॅमर वेळ येताच बापाबरोबर आईची भूमिका आधी शिकत, चाचपडत पण समर्थपणान निभावून नेतो. प्रसंगी कठोर होतो, तसाच प्रसगी रसरसून पोरावर–बिलवर, प्रेमही करतो. व्यावसायिक अपयश अंगावर घेऊनही तो त्याला संभाळतो, समजावून घेत रहातो आणि त्याच्या अगदी जवळ जाऊन पोहोचतो. इतका की तो बिलच्या जीवनाचा एक अपरिहार्य घटक होऊन बसतो. त्याउलट आधी स्वत ची बाधीलकी नाकारून, मुलाला काहीशा निर्दयपणानं मागं टाकून करीअर डेव्हलप करायला बाहेर पडलेली जोआना अखेर बापावरचं पोराचं प्रेम पाहून कोर्टाचा निकाल तिच्या बाजून असूनही, आपला निर्णय नंतर बदलते आणि बिलला न घेताच परत फिरते. इथं मात्र ती खऱ्या आईसारखी वागलेली दिसते. शाश्वत मूल्याची अपरिहार्यताच एका परीनं दिग्दर्शक ह्या प्रसंगातून प्रभावीपणे प्रतिबिंबित करतो. एका वाहत्या सामाजिक परिस्थितीत हरवलेल्याच्यातलं हे 'माणूसपणच' त्याच्या आणि आपल्याही दृष्टीनं अधिक महत्त्वाचं असतं.

–अशोक प्रभाकर डांगे


**भारतीय चित्रपटसृष्टीच्या अंतरंगावर प्रकाश टाकणारा एक प्रदीर्घ व अभ्यासपूर्ण लेख**

**माणूस : पुढील अंकी**

लेखक : सतीश जकातदार

## अवतोभवतो

पृष्ठ ४ वरून

होत्या. 'पुन्हा खेळीचा' आदेश मिळण्यासारखी परिस्थिती असताना मैदानात उतरलेल्या या २४ वर्षांच्या फलंदाजाने खेळाची सूत्रे आस्ते आस्ते आपल्या ताब्यात घेतली. पास्कोला त्याने कव्हरमध्ये ठोकलेला एक अनपेक्षित चौकार टी. व्ही वर पाहून मी तर चक्क उडालोच ! त्याची नजर छान बसली होती आणि ताकदीचा आणि कौशल्याचा सुंदर संगम त्याच्या फटकेबाजीमध्ये पहावयास मिळत होता. संदीपची तारीफ करत असतानाच, याच कसोटी सामन्यात चेतनने चिकाटीने गोळा केलेल्या ९७ धावांचे मोल कमी लेखून चालणार नाही. प्रथम बावचळत वाटचाल करणारा चौहान नंतर छान सेट झाला. त्याची उत्तम साथ मिळाल्यानेच संदीपला धावांचा डोंगर उभा करता आला. चेतनचे हातातोंडाशी आलेले शतक हुकले खरे; पण त्याच्या संघासाठी त्याने खचितच मोलाची कामगिरी बजावली होती. नवी जोडी चिवटपणे फलंदाजी करत असताना चॅपेलने लिलीचा वापर का केला नाही हे खरोखरच समजू शकत नाही. शेवटच्या आठ-दहा षटकांपैकी चार-पाच षटके जरी डेनिस लिलीच्या वाट्याला आली असती तरी त्याने खचित चमत्कार करून दाखवला असता असे मला वाटते. डेनिस लिलीच्या तोडीचा द्रुतगती गोलंदाज आज जगात नाही ! त्याला केवळ असाधारण वेग आहे असे नव्हे, तर त्याच्या गोलंदाजीमध्ये भरपूर विविधता आहे. चेंडूवर त्याची जबर हुकमत आहे आणि समोरचा खेळाडू पाहून गोलंदाजीमध्ये आवश्यक ते बदल करण्याची बौद्धिक क्षमताही त्याच्याजवळ आहे. हा असा योग क्वचितच जमून येतो. हा सामना संपला त्याच वेळीही कसोटीमालिका पूर्ण होण्यापूर्वी डेनिस लिली, कसोटीसामन्यात गडी बाद करण्याचा रिची बेनोचा उच्चांक तोडणार हे स्पष्ट झाले. हा सामना संपला त्या वेळी भल्याभल्या कसोटीवीरांना तंबू दाखवण्याचे श्रेय संपादन करणाऱ्या लिलीसमोर फक्त मॅकेन्झी आणि बेनो हे दोनच गोलंदाज होते आणि आणखी ६ विकेटस् घेऊन त्याला बेनोचा उच्चांक तोडता येणार होता आणि मालिका संपली त्या वेळी त्याने ती कामगिरी बजावून ऑस्ट्रेलियाचा सर्वात यशस्वी गोलंदाज म्हणून आपल्या नावाची नोंदही केली !

तीन कसोटी सामने असलेल्या या मालिकेचा साकल्याने विचार केला तर या मालिकेवर निर्विवादपणे डेनिस लिलीचे वर्चस्व असल्याचे जाणवते. कसोटीसामन्यात २५१ बळी घेणाऱ्या लिलीने या मालिकेमध्ये २१ बळी घेतले आणि ही कामगिरी त्याने फक्त ५२ धावा देऊन बजावली. भारतीय गोलंदाजांपैकी सर्वात यशस्वी गोलंदाज म्हणून कपिलदेवचे स्थान आहे त्याने ३३३ धावा देऊन १४ बळी घेतले करसन घावरी (३७० धावा–१० बळी) आणि दिलीप दोशी (४४० धावा–११ बळी) यांची उत्तम साथ मिळाल्याने कपिलचे काम सोपे झाले. तथापि या मालिकेचा साकल्याने विचार केल्यावर कोणा एकाचा गौरव करायचा असेल तर मालिकेवर सतत हुकमत गाजवणाऱ्या डेनिस लिलीचाच उल्लेख करावा लागेल !

### पंच हा वादग्रस्त विषय

क्रिकेट कसोटीमालिकेमध्ये पंच हा आता वादग्रस्त विषय झालेला आहे. ऑस्ट्रेलियामधील पंचमंडळींना नामांकित कोणीच म्हणत नाही. एकदरीतच त्यांचा दर्जा बेतासबात आहे हे आताच होत आहे असे नव्हे, परंतु महत्त्वपूर्ण प्रसंगी जर पूर्वग्रहदूषित वाटावेत अशा पद्धतीने निर्णय दिले जाऊ लागले तर खेळाडू तरी आपला राग कसा लपवू शकतील ? याच मालिकेमधील दुसऱ्या सामन्याबद्दल लिहिताना ऑस्ट्रेलियन स्पोर्टस् वीकच्या समीक्षकाने पंचांच्या निर्णयावर सडकून टीका करून, साफ खोटे वाटावेत असे निर्णय या पंचांनी दिल्याचा आरोप करून, या निर्णयाची शिकार झालेल्या भारतीय संघाबद्दल सहानुभूती व्यक्त केली आहे.

याच सामन्यात बॅटीला स्पर्श न करता चेंडू स्लिपमध्ये उभ्या असलेल्या बोर्डरच्या हाती जाऊन अपील होताच पंचांनी दिलीप वेंगसरकरसारखा खंदा फलंदाज तंबूत पाठवून दिला ! अराउंड द विकेट चेंडू-फेक करणाऱ्या यार्डलीच्या गोलंदाजीवर यशपाल शर्माला याच दुसऱ्या सामन्यात पायचीत ठरवण्यात आले. अराउंड द विकेट चेंडू-फेक करणाऱ्या ऑफ स्पिनरला जर फलंदाज पुढे खेळून तोंड देत असेल तर तो पायचीत होणे ही जवळजवळ अशक्यच गोष्ट आहे; पण तिसऱ्या कसोटी सामन्यात सुनिलला चक्क खोटा बाद देणाऱ्या व्हाइटहेड यांनी यशपालसारख्या सेट झालेल्या खेळाडूला पायचीत ठरवून तबूत पाठवून दिले ! नजरचुकीने एखादा निर्णय वेडावाकडा दिला जाणे वेगळे आणि त्याला काही हेतू असणे वेगळे. ऑस्ट्रेलियन पंचमंडळींच्या हातून झालेल्या चुका इतक्या ढोबळ स्वरूपाच्या आहेत की,त्यांच्या हेतूबद्दल शंका यावी.१९६८साली ऑस्ट्रेलियाच्या दौऱ्यावर गेलेल्या आपल्या संघाच्या वाट्यालाही असाच अनुभव आला होता. त्या वेळी पहिला कसोटी सामना आपण ७०।७५ धावांनी हरलो होतो आणि रुसी सुरतीला व चंदू बोर्डेला चक्क खोट्या अपीलसवर बाद ठरवण्यात आले. तर उघडउघड बाद असलेल्या सिम्पसनला पंचांनी नाबाद ठरवून पुन्हा खेळण्याची संधी उपलब्ध करून दिली होती !

याच मालिकेमधील तिसऱ्या कसोटी सामन्यात चॅपेल पहिल्या डावातही शून्यावर बाद होता असा भारतीय खेळाडूंचा दावा आहे. खेळाडू बाद असण्याबाबत हे जे दावे-प्रतिदावे केले जातात, त्याबाबत नेमकी परिस्थिती काय होती, याचे सुस्पष्ट दर्शन दूरदर्शनवर होऊ शकते. विशेषतः अनेक कॅमेऱ्यांचा वापर करून केले जाणारे छायाचित्रण आणि 'स्लो मोशन' यामुळे पंचांचा निर्णय आणि खरी परिस्थिती याची तुलना करता येऊ शकते. पंचांचा विशिष्ट निर्णय निश्चितपणे चुकीचा होता किंवा पंच म्हणतात तेच बरोबर आहे, याबाबत ठाम निर्णय घेणे आता शक्य आहे अशी जर परिस्थिती आहे तर या दूरदर्शन माध्यमाचा वापर निर्णय देण्याच्या बाबतीत का केला जाऊ नये, असा प्रश्न मनात निर्माण झाल्याखेरीज रहात नाही.

### आता लक्ष न्यूझिलंडकडे

कोणे एके काळी, ज्या न्यूझिलंडच्या संघाविरुद्ध पंकज रॉयने विक्रमी धावा काढल्या होत्या आणि ज्या न्यूझिलंडबरोबर पूर्वी

खेळताना फारसे जड वाटायचे नाही, त्या न्यूझिलंडच्या क्रिकेट-संघाबाबतची परिस्थिती आता पुष्कळच बदलली आहे. फलंदाजी आणि गोलंदाजी या दोन्ही महत्त्वपूर्ण बाबीखेरीज, क्षेत्ररक्षणाच्या बाबतीतही हा संघ निश्चितपणे बलशाली आहे. द्रुतगती गोलंदाजांसमोर आपली भलीभली मंडळीही नरम पडतात. डेनिस लिलीचा वेग किंवा क्षमता रिचर्ड हॅडलीजवळ नसेल; पण त्याचा मारा जरूर भेदक आहे. विश्वनाथ आणि गावसकर यांची ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या तिसऱ्या कसोटी सामन्यामधील कामगिरी हा काही एक योगायोग वाटत नाही आणि तसे जर असेल तर या बलशाली जोडीकडून मोठ्या अपेक्षा ठेवणे अवाजवी म्हणता येणार नाही.

भारतीय संघ आणि ऑस्ट्रेलियन संघ याचे मूल्यमापन केले असता सर्वच बाबतीत आपला संघ निश्चितपणे कमकुवत होता. तशा अर्थाने ही दोन समान बलशाली संघामधील लढत नव्हतीच; परंतु याचा अर्थ ऑस्ट्रेलियाचे कर्णधारपद भूषवलेल्या चॅपलने या संघाची कितीही आणि कशीही क्रूरचेष्टा करावी इतका काही हा संघ दुबळा नव्हता. 'मी जर निमंत्रक असतो तर अशा संघाला मी पाचारण केले नसते !' अशासारखे उद्धटपणाचे लिखाण चांगले अंगाशी यावे अशी कामगिरी या संघाने बजावली आहे. चॅपेलसाहेब, ज्या संघाला तुम्हाला आमंत्रण देण्याचीही इच्छा नाही त्याच संघाच्या कपिल-घावरी-दोशी कंपनीने तुमच्याकडच्या मातब्बर मंडळीना माती चारली. ग्रेग चॅपल, ग्रॅहम वूड, किम ह्यूज, डग वॉल्टर्स यासारखे खंदे फलंदाज असलेल्या तुमच्या संघाला, केवळ ८३ धावात परत पाठवून, किमान धावसंख्येच्या बाबतीत एक नीचांक प्रस्थापित करवला ! तेव्हा ताल सोडून टीका करू नका, असे म्हणणे भागच पडते.

भारतीय संघाच्या सुदैवाने चेतन चौहान, संदीप पाटील, दिलीप वेंगसरकर आणि काही वेळा किरमाणी यानी फलंदाजीचा मोडता कणा सावरून धरला, अखेरच्या जोडीने प्रचंड दबाव असूनही दुसरा सामना वाचवला; या गौरवपूर्ण गोष्टी असल्या तरी भारतीय फलंदाजीची खरी मदार, विश्वनाथ आणि गावसकर याच्यावरच आहे आणि अपवादात्मक परिस्थिती सोडली तर ही मंडळी जर माना टाकून परत आली तर सारा संघ बघता बघता गारद होतो ! ऑस्ट्रेलियाच्या अखेरच्या सामन्यापूर्वीपर्यंत ही दोन्ही मंडळी अक्षरश: चाचपडत होती. विश्वनाथचा पुनर्विचार करा, असे म्हणण्याचे फाजील धारिष्ट्य काही मंडळी दाखवू लागली असतानाच विश्वनाथने सुंदर शतक फडकावले, तर गावसकरने दुसऱ्या डावात जबाबदारीने खेळ करून, धावाचा जो प्रचंड बोजा अंगावर होता तो चेतनच्या मदतीने जवळजवळ हलका करून टाकून, पुढील मंडळीना वाट मोकळी करून दिली. नवीन मंडळींपैकी संदीपची कामगिरी उत्साहवर्धक असली, तरी आज तरी आपण गावसकर आणि विश्वनाथ यांच्यावरच अवलंबून आहोत, हे नाकारता येणार नाही. गोलंदाजीच्याबाबतीत पोकळी निर्माण झाल्यासारखी अवस्था होती ती काहीशी हलकी झाली आहे. कपिल, घावरी, दोशी, यादव यांचा कौशल्याने वापर करून घेतला तर मध्यमगती आणि फिरकी यांचा सुरेख वापर आपल्याला अभिप्रेत असलेले चमत्कार घडवून आणू शकतो. सातत्याने मार खात असलेला आपला संघ ऑस्ट्रेलियासारख्या बलशाली संघाला ८०।८५ धावांमध्ये परत पाठवू शकेल असे कोठे वाटले होते ? पण कपिल, घावरी, दोशी यांनी हा चमत्कार करून दाखवला ! असे चमत्कार ही तर या खेळाची खासियत आहे ! क्रिकेट खरे रंगते ते अशा विक्रमी पराक्रमामुळेच. अशा विजयानी हुरळून जाऊ नये आणि सुनिलसारखा कर्णधार हुरळून जाणाराही नाही. हा तिसरा सामना आपण जिंकू शकू, असे अनेक मान्यवर क्रिकेट पंडिताना सामन्याच्या चौथ्या दिवसाअखेर वाटू लागले होते. विशेषत: घावरीने चॅपेलचा अडथळा दूर केल्याने परिस्थिती आशादायक होती. तरीही कर्णधार गावसकर मात्र फारसा आशावादी नव्हता. पहिल्या डावात ४१९ धावा करणाऱ्या संघासाठी १५० धावा हे काही तशा अर्थाने आव्हान नव्हते. त्यामुळेच अखेरच्या दिवशी आणखी दोन महत्त्वपूर्ण खेळाडू बाद होईपर्यंत, हा सामना आपण जिंकू शकू असे गावस्करला वाटत नव्हते. असे वाटत नसल्याची प्रांजळ कबुली त्याने दिली असली तरी त्याची चाल मात्र आक्रमक होती. न्यूझिलंडच्या दौऱ्यावर खरी जबाबदारी आपल्या फलंदाजाना उचलावी लागणार आहे. सामन्यामध्ये काही उत्साह वाटावा, इतपत धावसंख्या उभी करण्याची जबाबदारी चेतन, सुनील, वेंगसरकर, संदीप पाटील यांना प्रामुख्याने उचलावी लागणार आहे विश्वनाथ तर आहेच. तो सेट झाल्यावर सारी कसर भरून काढतो. ऑस्ट्रेलियामधील त्याची प्रारंभीची कामगिरी निराशाजनक असली तरी त्याच्या झुंजार शतकाच्या वेळी त्याचा खेळ पहाताना, मनगटाचा सफाईदार वापर करण्याचे त्याचे कौशल्य, एकाग्रता आणि चेंडू जोखून त्याचे मोल करण्याची किमया अजूनही भारतीय संघाला लाभदायी ठरू शकण्याइतकी सामर्थ्यशाली आहे, हे निश्चितपणे जाणवले.

तिसऱ्या कसोटीमधील एका विजयामुळे बेहोष झालेल्या क्रिकेटशौकिनानी आधीचे सारे लहान-मोठे गुन्हे माफ करून टाकले आहेत. सामना टिच्चून जिंकल्याने आपल्या संघाचा आत्मविश्वासही चांगलाच वाढला आहे. न्यूझिलंडमध्ये जर संघाने आपली कामगिरी चोख बजावली तर क्रिकेटशौकीन या संघाचे खुल्या मनाने स्वागत करतील. पराभवाचेही त्याना फारसे वाटत नाही; परंतु अपमानास्पद पराभव मात्र तमाम क्रिकेटशौकिनांच्या जिव्हारी झोंबतो. त्या यातना हा संघ आता देणार नाही अशी आशा करू या. □


## व्हान गॉग

'लस्ट फॉर लाइफ' या आयर्व्हिंग स्टोनच्या जगप्रसिद्ध कलाकृतीचा मराठी अनुवाद

अनुवादिका : माधुरी पुरंदरे

प्रकाशक

प्रसाद पुरंदरे, पर्वती, पुणे

MANOOS (Marathi Weekly) 100 Paise Regd. No. PNC-W 28
(Licensed to post without prepayment of postage-No. 11)

# आपल्या परतफेडीची मागणी करा

**जर आपण प्राप्तीकराची रक्कम, हिशोबापेक्षा अधिक भरली असेल तर, अशा अतिरिक्त रकमेची आपणास परतफेड मिळू शकते.**

**विशेषतः जर,**

(१) आपली प्राप्ती खालील मार्गांनी झाली असेल,

(अ) डिव्हिडंड (लाभांश)

(आ) व्याज

(इ) अन्यमार्गाने झालेली प्राप्ती पण त्यातून प्राप्तीकर अगोदरच कापण्यात आला आहे.

आणि जर, आपली वर्षातील एकंदर प्राप्ती किमान करयोग्य प्राप्तीपेक्षा कमी असेल तर, आपण फॉर्म नंबर ३० वर आपले परतफेड हक्कपत्र अगोदरच कापण्यात आलेल्या रकमेच्या विवरणपत्रकासह दाखल करावयास पाहिजे.

तसेच ज्या आकारणी वर्षातील ही परतफेड असेल त्या आकारणी वर्षाच्या अखेरच्या दिवसापासून दोन वर्षांच्या आत हे हक्कपत्र दाखल करण्यात आले पाहिजे. १९८०-८१ (ज्या काळातील कर १९७९-८० सालात सुरुवातीलाच कापण्यात आला) या आकारणी वर्षातील परतफेडीसाठी, आपले हक्कपत्र ३१ मार्च १९८१ पर्यंत दाखल करण्यात आले पाहिजे.

**नोंद :** आपली प्राप्ती जर करयोग्य नसेल तर कर कपात न करता, मोबदला घेण्यास आवश्यक प्रमाणपत्रासाठी आपल्या प्राप्तीकर अधिकाऱ्याकडे विचारणा करू शकता.

☐ **निवेदक–**

**डायरेक्टर ऑफ इन्स्पेक्शन**

**(रिसर्च, स्टॅटिस्टिक्स अँड पब्लिकेशन)**

**इन्कमटॅक्स डिपार्टमेंट,**

**नवी दिल्ली ११० ००१**

DAVP 80/411